E-BOOK

सिनेमातील भन्नाट किस्से !

- धनंजय कुलकर्णी

"ई साहित्य प्रतिष्ठान"

सादर करीत आहे

"श्री. धनंजय कुलकर्णी"

लिखित

"सिनेमातील भन्नाट किस्से"

© - "श्री. धनंजय कुलकर्णी" (लेखक व चित्रपट विश्लेषक)

dhananjaykulkarni1106@gmail.com ९९२११९५९२६

हजारो दर्जेदार मराठी ई-पुस्तके!

फक्त 'एकच' क्लिक ..... आणि ई-पुस्तक हजर

For all 'ESahity' E-Books.. Visit/Log on

https://www.esahity.com

(पुस्तक वाचण्यासाठी कव्हरवर एक क्लिक करा-

एक मिनिट थांबा- बस्स)

तुमच्या आवडीची पन्नास पुस्तके डाऊनलोड करून मोबाईलवर ठेवा.

आरामात वाचा!, लोकांनाही फॉरवर्डा. चकटफू !

"सिनेमातील भन्नाट किस्से"
लेखक : श्री. धनंजय कुलकर्णी
प्रकाशन : १५ डिसेंबर, २०२५
© esahity Pratishthan®2025
प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान : Whatsapp - 9987737237
(फ्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे "ई बुक" वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी "ई साहित्य प्रतिष्ठान" ची लेखी परवानगी आवश्यक!

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

लक्षात घ्या. हे बोलके "ई बुक" आहे. या "ई बुक" मधील प्रत्येक "फोटो"वर तसेच "निळ्या रंगातील मजकूर", यावर सुद्धा "लिंक्स" दिलेल्या आहेत. फक्त "क्लिक" करा, आणि त्यावरील "ऑडिओ व व्हिडिओज" चा मनसोक्त आनंद घ्या.

♥ लेखकांविषयी थोडेसे ♥

धनंजय_कुलकर्णी

चित्रपट अभ्यासक आणि सिने पत्रकार

जन्म. ११ जून

धनंजय कुलकर्णी यांनी अभियांत्रिकी सोबतच मास्टर्स इन जर्नालिझमची पदवी प्राप्त केली असून त्यात विद्यापीठात त्यांनी पहिला क्रमांक मिळवित लोकमान्य टिळक पुरस्काराचे ते मानकरी होते. पुण्याच्या बलराज सहानी–साहीर लुधियानवी फौंडेशनच्या साहीर लुधियानवी पुरस्काराचे ते मानकरी

आहेत. तसेच नाशिकच्या दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या 'राष्ट्रीय दीपस्तंभ' पुरस्काराचे ते मानकरी आहेत. गेली तीस ते पस्तीस वर्षे धनंजय कुलकर्णी हे महाराष्ट्रातील विविध नियतकालिकांतून चित्रपट आणि चित्रपट संगीतावर लिखाण करीत आहेत. त्यांचे 'अनमोल रतन - दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते' हे पुस्तक जेष्ठ साहित्यिक डॉ यु म पठाण यांच्या हस्ते प्रकाशित झाले होते. तसेच 'किस्से सिनेमातले' या पुस्तकाचे प्रकाशन सुप्रसिध्द निवेदक प्रदीप भिडे यांच्या हस्ते प्रकाशित झाले होते. या पुस्तकाला 'साहित्य गौरव' हा पुरस्कार प्राप्त झाला होता.

भारतीय सिनेमाच्या शतक महोत्सवाच्या निमित्ताने व्ही. शांताराम प्रतिष्ठान मुंबईच्या वतीने प्रकाशित झालेल्या ग्रंथात त्यांचा सहभाग होता. 'अनुबंध प्रकाशन' पुणे च्या वतीने प्रकाशित केलेल्या 'भाव संगीत कोश' मध्ये त्यांनी लिखाण केले आहे. हिंदी सिनेमाचे जेष्ठ गीतकार साहीर लुधियानवी यांच्या जन्मशताब्दी निमित्त त्यांनी लिहिलेल्या 'ये दुनिया अगर मिल भी जाये तो क्या है...' या इ फ्लिप बुकला जगभरातून मोठा प्रतिसाद मिळाला. याच पुस्तकाचा हिंदी भाषेतील अनुवाद नुकताच प्रिंट स्वरूपात नुकताच प्रसिद्ध झाला आहे. 'हरवलेली गाणी ' हे त्यांचे नवीन पुस्तक प्रकाशनाच्या मार्गावर आहे!

'नवरंग रुपेरी' या चित्रपट विषयक दिवाळी अंकाचे ते निवासी संपादक आहेत. सध्या मुंबई सकाळ मध्ये 'यादों की बारात' हा कॉलम लिहित आहेत. धनंजय कुलकर्णी यांनी सकाळ, लोकसत्ता, पुढारी, लोकमत सोबतच प्रीमियर, तारांगण या अंकातून चित्रपट विषयी स्तंभ लेखन करीत असतात.

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

त्यांनी पुण्यातील अनेक सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्र संचालन व निवेदन केले आहे. तसेच खाजगी रेडिओ एफ. एम. वर अनेक चित्रपट विषयक कार्यक्रमाचे सादरीकरण केले आहे. पुण्यातील वसंत व्याख्यानमालेत त्यांचा सहभाग होता.

#संजीव_वेलणकर पुणे. ९४२२३०१७३३

♥

फिर वोही दिल लाया हूं.....

कोणतीही चांगली गोष्ट घडण्यासाठी योग असावे लागतात. 'सिनेमातील भन्नाट किस्से' हे पुस्तक प्रकाशित होण्याचा आज चांगला योग जुळून आला आहे. खरंतर २०१६ साली माझे 'सिनेमातील किस्से' हे पुस्तक पुण्याच्या 'प्रतीक प्रकाशन'ने प्रकाशित केले. हे पुस्तक वाचकांना प्रचंड आवडले. या पुस्तकाला काही पुरस्कार देखील मिळाले. त्यानंतर बऱ्याच वेब पोर्टल्स आणि वृत्तपत्रांनी माझ्याकडून अशाच प्रकारचे लिखाण करवून घेतले. यात प्रामुख्याने डोंबिवलीच्या 'कलाकृती मीडिया' या वेब-पोर्टलवर मी २०२० सालापासून सातत्याने लिहीत आहे. पुण्यातील 'बोल भिडू' या पोर्टलवरही वर्षभर लिखाण केले. त्याचबरोबर महाराष्ट्रातील अनेक वृत्तपत्रातून माझे लिखाण चालू आहे. जुने हिंदी चित्रपट आणि हिंदी सिनेमाच्या संगीताच्या सुवर्णकाळावर मला लिहायला आवडते. तो काळ, ती गाणी, ते कलावंत आजही रसिकांना आपलीशी वाटतात. याच कारणाने त्या सुरीला्या कालखंडा वरील लिखाण देखील रसिकांना आवडते. आपल्याकडे दुर्दैवाने सिनेमाचा इतिहास चांगल्या पद्धतीने जतन करून ठेवला गेला नाही. इतर देशांमध्ये ज्या पद्धतीने सिनेमा या कलेकडे पाहिले जाते तो दृष्टिकोन आपल्याकडे खूप उशिरा आला. त्यामुळे सिनेमाच्या मेकिंगच्या गोष्टी असतील किंवा एखादं गाणं बनतानाची काही स्टोरी असेल ती आपल्याला जशी जशीच्या तशी ऐकायला मिळत नाही किंवा वाचायला मिळत नाही. अलीकडे मात्र याबाबत बरेच चांगले बदल घडताना दिसत आहे. आजची तरुणाई जुनी गाणी, जुने चित्रपट आता आवडीने अभ्यासत आहेत. अनेक विद्यापीठांमधून सिनेमा हा

अभ्यासाचा विषय म्हणून निवडत आहेत. त्यातून अनेक गोष्टी, अनेक धागे, अनेक मिसिंग लिंक्स नव्याने सापडत आहेत या सर्वांना एकत्र करून त्या काळात काय घडले असावे याचा अंदाज आपण बांधू शकतो.

या 'ई बुक' मध्ये सिनेमाच्या गोल्डन इरा मधील पन्नास किस्से मी सांगितले आहेत. वाचकांना नम्रपणे सांगू इच्छितो की त्या किस्स्यामध्ये सांगितलेल्या घटना अगदी तशाच घडल्या असतील असा दावा मी मुळीच करणार नाही! पण हे किस्से अतार्किक, कपोलकल्पित नक्कीच नाहीत! हे किस्से मांडताना अनेक मान्यवरांनी लिहिलेल्या पुस्तकांचा, लेखांचा, त्या काळातील प्रकाशित वृत्तपत्रांचा, नियतकालिकांचा, रेडीओ वरील कार्यक्रमांचा आधार घेतला आहे. 'नवरंग रुपेरी' चित्रपट विषयक दिवाळी अंकाचा निवासी संपादक असल्याने सिनेमातील अनेक व्यक्तीमत्वाना भेटण्याचा योग आला. त्यातून ही खूप अननोन माहिती मिळत गेली. एक नक्की सांगतो हे किस्से खूप भन्नाट आहेत, मनोरंजक आहेत आणि वास्तवतेला धरून आहेत. त्यामुळे हे किस्से वाचताना तुम्हाला नक्कीच Nostalgic आनंद मिळेल याची शंभर टक्के खात्री देतो!

हे पुस्तक आपल्यासमोर येत आहे ते केवळ आणि केवळ आमचे संगीत प्रेमी मित्र, जेष्ठ सिने- पत्रकार, चित्रपट अभ्यासक आणि ज्यांच्या नावावर पंचवीसहून अधिक 'ई बुक्स' आहेत ते 'डॉ. अनंत पावसकर' यांच्यामुळे! त्यांनी अनेक दिवसापासून माझ्या पाठीमागे लागून हे पुस्तक पूर्ण रूपात आणण्याचा विडा उचलला, आणि आज हे पुस्तक आपल्यासमोर येते आहे. या पुस्तकाची संपूर्ण निर्मिती, डिझाईन, मुखपृष्ठ, ले-आऊट आणि संपादन हे 'डॉ. अनंत पावसकर' यांचे आहे. त्यामुळे हे देखणे पुस्तक आपल्यासमोर

आणण्याचे शंभर टक्के क्रेडिट हे पावसकर यांना आहे. कोरोना नंतर प्रिंट मीडिया आणि इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये आमुलाग्र बदल घडत आहे. 'ई-बुक्स' ची संख्या झपाट्याने वाढत आहे. डॉ. अनंत पावसकर यांची स्वतःची पंचवीस अधिक 'ई-बुक्स' प्रसिद्ध झालेली आहेत. एका सेकंदात जगभरातल्या वाचकांपर्यंत पोहोचण्याची ताकत या ई-बुक्स मध्ये आहे. 'ई-बुक्स'ची बलस्थाने वेगळी आणि युनिक आहेत. इथे पुस्तकात लेखाशी सलंग्न असलेल्या गाण्याच्या सिनेमाच्या 'लिंक्स' दिल्या आहेत. त्याला 'क्लिक' केले की तुम्ही तात्काळ त्या गाण्याचा/ सिनेमाचा/ प्रसंगाचा आस्वाद घेवू शकता. लेखातील सर्व 'लिंक्स', छायाचित्रे याकरीता त्या 'वेबसाईटस', 'यु-ट्यूब' आणि 'गुगल'चे मन:पूर्वक आभार!

माझ्या आधीच्या पुस्तकांप्रमाणेच आपण रसिक वाचक या पुस्तकाला देखील भरभरून प्रतिसाद द्याल याची खात्री आहे. या 'ई बुक'ला कोणतेही शुल्क नाही पण यातील माहिती अमूल्य आहे. तेंव्हा आपण हे 'ई बुक' नक्की वाचा. आपला अभिप्राय द्या. आणि आपल्या मित्र मैत्रीणीना शेअर करा!

शेवटी 'डॉ. अनंत पावसकर' यांचे शतशः आभार! अनंता, आपण जर मेहनत घेतली नसती तर हे पुस्तक बनलेच नसते. तसेच 'ई साहित्य' यांचे देखील मनःपूर्वक आभार! धन्यवाद!

धनंजय कुलकर्णी, पुणे ९९२११९५९२६

dhananjaykulkarni1106@gmail.com

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

अनुक्रमणिका

अ.क्र. लेखाचे शीर्षक

१ 'बॉम्बे टू गोवा' तील अमिताभचा रोल राजीव गांधीना मिळणार होता?

२ जेंव्हा पाकिस्तानी राष्ट्राध्याक्षांकडून फिरोज खान यांच्या सिनेमांवर बंदी घातली गेली!

३ देव आनंदच्या 'त्या' आश्वासक शब्दांनी सचिनदा मरणाच्या दारातून परत आले!

४ अभिनेता गोविंदाच्या उत्तराने संगीतकार नौशाद यांच्या डोळ्यात कां पाणी आले?

५ राजेश खन्ना या सुपरहिट सिनेमाचा तो First Choice नव्हता !

६ किशोरकुमार ने गायलेल्या या गाण्यावर बप्पी लाहिरी ने स्वत:च्या आवाजात चार ओळी का इम्पोज केल्या?

७ राजेश खन्ना जज समोर जावून कां म्हणाले "मुझे गिरफ्तार करके जेल में डाल दो"!

८ अभिनेता दिलीपकुमार यांना पुणे पोलिसांनी

बेड्या ठोकून येरवडा जेल मध्ये स्थानबध्द केले!

९ दिग्दर्शक महेश भट आपल्याच कृत्याने कां दु:खी झाले?

असं काय घडलं की 'त्या' अभिनेत्रीने

१० सिनेसृष्टीशी कायमचे नाते तोडून परदेशात जाणे पसंत केले?

११ जेंव्हा अमिताभ बच्चन स्क्रीन टेस्ट मध्ये फेल ठरले!

जेंव्हा एक दिग्दर्शक गोळ्या झाडून आपल्या

१२ कुटुंबियाना एका क्षणात संपवून स्वत: आत्महत्या करतो...कां?

१३ या सिनेमाचा फक्त क्लायमॅक्स शोमन सुभाष घई यांनी कां शूट केला?

१४ नव्वदच्या दशकात या 'अभिनेत्री' च्या टॉपलेस फोटो ने देशात उडाली होती मोठी खळबळ!

जेंव्हा बिग बी यांनी पन्नासच्या दशकातील सुपर

१५ स्टारला असहाय अवस्थेत बस स्टॉपवर पाहिले!

१६ एका चाहत्याच्या अतिप्रेमाने हेमा मालिनीच्या वडलांना गमवावे लागले प्राण!

१७ जेंव्हा जया भादुरी एकाच सिनेमातील दोन अभिनेत्रींसाठी डबिंग करते!

१८ तब्बल दोन महिन्याच्या अथक परिश्रमातून बनले हे अजरामर प्रार्थना गीत!

१९ सलग आठ वर्षे फिल्मफेयर पुरस्काराने कुणाला हुलकावणी दिली?

२० चार चौघात अमिताभ बच्चन यांच्या श्रीमुखात कोणी थप्पड लगावली ?

२१ रवीना टंडनला खंडणी खोरांचे फोन कां येवू लागले?

२२ जेंव्हा न्यूटनचा गतीविषयक नियम सिनेमात वापरला!

२३ फरहान अख्तर ने जीवाची बाजी लावून एकाचे प्राण वाचवले!

२४ कोणते संगीतकार किशोर कुमारच्या मागे छडी घेवून धावत गेले?

२५ आणि जेंव्हा प्रेम चोप्राला कुणीच ओळखले नाही!

२६ परपुरुषाचा स्पर्श नको म्हणून नायिकेच्या

भूमिका नाकारणारी अभिनेत्री कोण?

२७ आमिर खानला पत्नी किरण रावने कां ठेवले तीन आठवडे कोंडून?

२८ सचिन देव बर्मन यांच्या भजनाने झाली लॉकअप मधून सुटका!

२९ एका हत्ती साठी लहानग्या काजोलने केले आई सोबत भांडण!

३० रमेश सिप्पी च्या बायकोने त्यांच्याशी कां धरला सहा महिने अबोला?

३१ जेंव्हा अनिल कपूर ने आपल्या प्राणप्रिय 'मिशांचा' त्याग केला!

३२ लहानपणी शबाना आजमीने केला होता आत्महत्येचा प्रयत्न!

३३ आयकर खात्याच्या धाडीने अमिताभचा हा सिनेमा अद्याप प्रदर्शितच नाही

३४ अभिनेता गोविंदाने कसा घेतला शाहरुख खानचा बदला?

३५ अनिल कपूरने केली यश चोप्रांची पंचाईत!

चक्क सेटवर दिला काम करण्यास नकार...

३६ अंगात १०३ ताप असताना श्रीदेवीने शूट केलं हे सुपर हिट गाणं!

३७ जेंव्हा लहानग्या सैफ अली खानने केली शशी कपूरची गुंडा पासून सुटका!

३८ 'दे दे प्यार दे' गाण्याच्या चालीचे मूळ रुना लैला च्या गाण्यात होतं?

३९ तब्येत बरी नसताना रफीने गुलशन बावरासाठी केले पुन्हा रेकॉर्डिंग!

४० दिलीपकुमार ने बारसं केलेलं अनोखं 'कॉकटेल' एके काळी प्रचंड लोकप्रिय होते!

४१ ...आत्महत्या करायला निघालेला हा गायक परत फिरला आणि बनला सुपर सिंगर!

४२ जेंव्हा सिनेमाच्या शौकापायी लहानपणी धर्मेंद्र ने बसच्या टपावर बसून प्रवास केला!

४३ पायलट राजीव गांधीनी वाचवले डिंपल कपाडिया चे प्राण!

४४ वर्ण द्वेषाचा फटका स्मिता पाटीलला बसला....

तो ही भारतातच!

४५ शम्मी कपूरला 'किस' करण्याचे नर्गीसने केले होते 'प्रॉमिस'...पण!

४६ ... जेंव्हा पाच अभिनेत्रींनी यश चोप्रांच्या सिनेमात काम करायला चक्क नकार दिला होता !

४७ अमिताभ आणि डॅनी यांना एकत्र काम करण्याचा योग यायला तब्बल १८ वर्षे लागली!

४८ आशा पारेख का करत होती राजेश खन्नाचा सतत अपमान?

४९ शत्रुघ्न सिन्हा आणि रेखा यांच्यातील अबोला तब्बल तेवीस वर्षांनी मिटला!

५० ...जेंव्हा स्वाभिमानी फारुख शेख आणि शबानाने मिळालेले दहा रुपये पुन्हा कॉलेजला चक्क डोनेट करून टाकले!

लेख क्र. १

‘बॉम्बे टू गोवा’ तील अमिताभचा रोल राजीव गांधीना मिळणार होता?

बिग बी अमिताभ बच्चन यांना सिनेमात इस्टॅब्लिश होण्यासाठी मोठ्या संघर्षमय काळातून जावे लागले. ख्वाजा अहमद अब्बास यांच्या १९६९ सालच्या ‘सात हिंदुस्तानी’ या चित्रपटातून त्यांचा रूपेरी प्रवेश जरी झाला असला तरी त्यांना चित्रपटात भूमिका मिळणे खूप दुरापास्त झाले होते. तसेच त्यांच्या चित्रपटांना यश देखील मिळत नव्हते. बऱ्याचदा त्यांना चित्रपटासाठी साईन केले जायचे; परंतु काही काळानंतर त्यांना सिनेमातून काढून त्यांच्या जागी दुसरा नायक घेतला जायचा. सगळीकडून अपयश, अवहेलना आणि अपमान यांचा सामना ते करत होते. याच संघर्षमय काळातील अमिताभ बच्चन हा किस्सा आहे. ‘सात हिंदुस्तानी’ या चित्रपटात अन्वर अली या हास्य अभिनेता महमूदच्या भावाने देखील एका हिंदुस्तानी ची भूमिका केली होती.

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

मुंबईच्या संघर्षमय काळात अन्वर अली यांच्या घरीच अमिताभ राहत असे. अमिताभ बच्चन मुंबईमध्ये रोज निर्मात्यांचे दरवाजे खटकवत होते. आश्वासन मिळत होती. स्वप्न रचली जात होती पण काही दिवसात ती विस्कटली पण जात होती. अन्वर अली चा भाऊ महमूद त्या वेळी त्याच्या 'बॉम्बे टू गोवा' या सिनेमाच्या तयारीत होता. या सिनेमात भूमिका मिळावी म्हणून अन्वर आली कडून देखील तो प्रयत्न करीत होता.

अमिताभ बच्चन आणि राजीव गांधी यांची लहानपणापासूनची मैत्री होती. राजीव गांधी त्यावेळी राजकारणात नव्हते ते वैमानिक म्हणून Indian Airlines मध्ये कार्यरत होते. एकदा मुंबईत आले असता ते अमिताभ बच्चन यांना भेटायला आले. अन्वर अलीच्या छोट्या फ्लॅटमध्ये ते आले. दोन मित्रांची बऱ्याच दिवसांनी भेट झाली. गप्पाटप्पा झाल्या. आणि दोघे झोपी गेले. रात्री उशिरा मेहमूद अन्वर अली च्या फ्लॅटवर आले. त्यावेळी मेहमूदला ड्रग्ज घ्यायचे व्यसन लागले होते. ड्रिंक्स देखील खूप घ्यायचा. त्या मुळे अर्थातच ते शुद्धीत नव्हते. मेहमूद आपल्या आगामी 'बॉम्बे टू गोवा' या चित्रपटाची स्टारकास्ट त्या काळात फायनल करत होते. त्या वेळी अमिताभ बच्चन यांना ही भूमिका आपल्याला मिळावी असे खूप वाटत होते त्या पद्धतीने त्यानी अन्वर आलीच्या मार्फत महमूदच्या कानावर देखील ही गोष्ट घातली. त्या रात्री जेंव्हा मेहमूद अन्वर अलीच्या फ्लॅटवर आले त्यावेळी बेडरूममध्ये राजीव गांधी झोपले होते. मेहमूदने त्यांना बघितले आणि अन्वरला तिथल्या तिथे म्हणाले "..हा इथे झोपलेला तरुण माझ्या पुढच्या सिनेमाचा नायक असेल. त्याला पाच हजार रुपये ऍडव्हान्स देऊन त्याला बुक करून टाक." अमिताभ बच्चन यांच्यासमोर ही गोष्ट घडत होती. आपल्या डोळ्या देखत आपला ड्रीम

रोल निसटून चालला होता. मेहमूद ला अन्वर अली म्हणाले "..पण आपण हा रोल अमिताभ बच्चन यांना द्यायचे ठरवले आहे!" त्यावर महमूद म्हणाला "हो ठरवले आहे पण दिला कुठे? हा जो तरुण झोपला आहे तो किती हँडसम आहे गोरापान आहे! मी यालाच 'बॉम्बे टू गोवा' या चित्रपटातील हिरो भूमिका देणार आहे! मेरी अगली फिल्म का हिरो ये छोकरा होगा!"

त्यावर अन्वर आली मेहमूद यांना म्हणाले "आप जानते है ये लडका कौन है?" मेहमूदने नकारार्थी मान डोलावली" आपल्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा हा मुलगा आहे. राजीव गांधी! हा सिनेमा अजिबात काम करणार नाही. कारण तो वैमानिक म्हणून काम करीत आहे!" पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा मुलगा आपल्या फ्लॅटमध्ये झोपला आहे हे ऐकून मेहमूद यांची उतरली आणि त्याने सॉरी म्हणत ही भूमिका अमिताभला द्यायचे कबूल केले!

© धनंजय कुलकर्णी

♥

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

लेख क्र. २

जेंव्हा पाकिस्तानी राष्ट्राध्याक्षांकडून फिरोज खान यांच्या सिनेमांवर बंदी घातली गेली!

हिंदी सिनेमाच्या दुनियेत अजूनही ज्यांचा उल्लेख 'स्टायलिश खान' म्हणून होतो त्या फिरोज खान यांच्या चित्रपटांवर पाकिस्तानमध्ये बंदी घालण्यात आली होती. एवढेच नाही तर फिरोज खान यांना पाकिस्तान देशामध्ये प्रवेश बंदी देखील घालण्यात येवून त्यांना तत्काळ पाकिस्तान देश सोडण्याचा आदेश दिला होता! फिरोज खान त्या काळात जगभर जिथे जिथे हिंदी चित्रपट पोहोचतोय तिथे त्यांच्या 'स्टायलिश' अदाकारीने प्रेक्षकांमध्ये जबरदस्त फेमस होते. त्यांचे अपराध, धर्मात्मा, कुर्बानी, जांबाज, दयावान हे सिनेमे सर्वत्र प्रचंड लोकप्रिय ठरले होते. पाकिस्तानमध्ये देखील त्यांचा मोठा चाहता वर्ग होता. असे असतानाही पाकिस्तानच्या राष्ट्राध्यक्षांनी कडून त्यांच्या चित्रपटांवर बंदी घालण्यात आली होती. काय होता हा किस्सा???

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

२००५ साली फिरोज खान यांचे धाकटे बंधू अकबर खान यांनी 'ताजमहल: द इटरनल लव स्टोरी' हा सिनेमा बनवला होता. हा सिनेमा भारतात फारसा चालला नाही. पण या सिनेमाबाबत महत्त्वाची नोंद म्हणजे या सिनेमाला संगीतकार नौशाद यांनी स्वरबद्ध केले होते. नौशाद यांनी स्वरबद्ध केलेला हा शेवटचा चित्रपट ठरला. अतिशय भव्य आणि दिव्य अशा प्रमाणात अकबर खानने हा चित्रपट बनवला होता. जगभरातील सर्व मुस्लिम कंट्रीजमध्ये हा सिनेमा त्यांना रिलीज करायचा होता. त्याप्रमाणे पाकिस्तान मध्ये एप्रिल २००६ मध्ये त्यांनी हा सिनेमा प्रदर्शित करण्याचे ठरवले. त्यासाठी लाहोरला एक मोठा प्रीमियर शो देखील ठेवला गेला. यासाठी भारतातून ताजमहालची संपूर्ण टीम, तसेच अभिनेता फिरोज खान, फरदीन खान, शत्रुघ्न सिन्हा, मनिषा कोईराला आणि महेश भट हे देखील तिथे गेले.

लाहोरला मीडिया सोबत वार्तालाप करण्यासाठी ही सर्व मंडळी व्यासपीठावर विराजमान झाले. पाकिस्तानातील अनेक सिने शौकीन या कार्यक्रमाला उपस्थित होते. त्याचप्रमाणे या कार्यक्रमाचे पाकिस्तानच्या काही वाहिन्यांवरून याचे थेट प्रसारण देखील करण्यात आले. या कार्यक्रमात पाकिस्तानी पत्रकार या कलावंतांना काही प्रश्न विचारत होते. हे प्रश्न जोवर सिनेमाशी निगडीत होते तोवर हा सुसंवाद चांगला चालू होता. परंतु अचानक काही पत्रकारांनी राजकीय, धार्मिक प्रश्न विचारायला सुरुवात केली. त्यावेळी अभिनेता फिरोज खान यांचा पारा चढला. त्यांनी रागारागात उत्तर द्यायला सुरुवात केली. त्यांनी सांगितले "आमच्या भारत देशात मुस्लिम बांधव सर्वात सुरक्षित आहे. या देशात सर्वधर्मसमभाव, समता आणि शांततेचे वातावरण आहे. इथे राष्ट्रपती मुस्लिम होऊ शकतात. शीख धर्माची व्यक्ती पंतप्रधान होऊ

शकते. येथील सामान्य लोकांमध्ये चांगला 'भाईचारा' आहे. या उलट काही मुस्लीम देशांमध्ये मुस्लिम धर्मीयच परस्परांमध्ये वाद घालून एकमेकांचे मुडदे पाडत आहेत." या उत्तराने पाकिस्तानी मीडियातील काही पत्रकारांना मिरच्या झोंबल्या. नंतर एका पाकिस्तानी पत्रकाराने फकर-ए- आलम याने अभिनेत्री मनिषा कोईराला एक प्रश्न विचारला तो पूर्णपणे राजकीय प्रश्न होता. त्यावर उत्तर देताना मनिषा कोईराला गडबडून गेली. त्यावर तो पत्रकार गर्विष्ठपणे तिला म्हणाला "मॅडम, ऐसा लगता है मेरे सवाल से आप तो कांपने लगी है. ऐसा करता हूं मै सवाल ही बदल देता हूं!" मोठ्या उपरोधिकपणे त्याने हा टोमणा मनिषा कोईराला मारला. त्या पत्रकाराचा हा पवित्रा फिरोज खान यांना अजिबात आवडला नाही. ते अतिशय क्रुद्ध झाले आणि उठून जोरात ते पत्रकाराला म्हणाले "जनाब , अगर आप ने इसी वक्त ये मोहतरमा की माफी नही मांगी, तो मै नही जानता मै आपके साथ मैं क्या करुंगा!" त्या पत्रकाराने माफी मागायला नकार दिल्यानंतर फिरोजखान रागाने त्या पत्रकारावर धावून गेला. शत्रुघन सिन्हा आणि अकबर खान यांनी फिरोज खान यांना पकडले. त्यांचा राग शांत करण्याचा प्रयत्न केला. पण फिरोज खान प्रचंड चिडले होते. चूक पूर्णपणे त्या पत्रकाराची होती. त्याने मुद्दामहून फिरोज खानना डिवचण्याचा प्रयत्न केला. कशीबशी पत्रकार परिषद आटोपण्यात आली. हा मुद्दा खूप तापला. पाकिस्तानी जनतेला फिरोज खान यांनी आरसाच दाखवला होता. पाकिस्तानी मिडियाने याला वेगळा रंग दिला. मिडीयात असे छापून आले की त्या कार्यक्रमात फिरोज खान दारू पिऊन गेला होता व या नशेतच तो बरळत होता. त्याने आमच्या आदर सन्मानाचा अपमान केला. त्याने पत्रकारावर हात टाकला. वगैरे वगैरे! पुढे फिरोज खान यांची तक्रार थेट पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष

परवेझ मुशर्रफ यांच्यापर्यंत गेली. त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांशी सल्लामसलत करून चक्क फिरोज खान यांच्या चित्रपटांवर पाकिस्तानमध्ये बंदी घातली. तसेच फिरोज खानला ताबडतोब देश सोडून जाण्याचे फरमान काढले. महेश भट यांनी प्रकरणाची सारवासारव करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यावेळी देखील फिरोज खान यांनी असे सांगितले की "मी स्वतःहून या देशात आलेलो नाही मला इथे इन्व्हाईट केले आहे. असे असताना येथील मीडिया जाणून-बुजून असे प्रकार करत असेल तर चुकीचे आहे." या सर्व मंडळींना पाकिस्तानचा दौरा अर्धवट सोडून भारतात परतावे लागले. पाकिस्तानच्या वकिलातीत यावर खूप वातावरण तापले. दिल्लीला तसे कळविण्यात आले. फिरोज खान यांनी दिल्लीत येवून आपल्या सरकारकडे आपली बाजू स्पष्ट सांगितली. त्याने असेही सांगितले की "आमची सिने इंडस्ट्री आमची सिनेमे इतके जबरदस्त आहेत की कुठलाही देश फार काळ बंदी घालून आम्हाला रोकू शकत नाही." स्वाभिमानी फिरोज खान यांनी आपली बाजू मोठ्या बाणेदारपणे पाकिस्तान मध्ये मांडली होती त्याचप्रमाणे सोबत असलेल्या महिलेचा परक्या देशात होणारा अपमान देखील त्याने तिथल्या तिथे परतवून लावला होता!

© धनंजय कुलकर्णी

लेख क्र. 3

देव आनंदच्या 'त्या' आश्वासक शब्दांनी सचिनदा मरणाच्या दारातून परत आले!

हिंदी चित्रपट संगीताच्या इतिहासात नवकेतन या देवानंद यांच्या चित्रपट संस्थेचे आणि सचिन देव बर्मन यांचे अतिशय गहिरे नाते होते. नवकेतनच्या सर्व संगीत प्रधान चित्रपटांना सचिनदादाच्या संगीताने जान आणली होती. त्यामुळे देव आनंद हा कायम सचिन देव बर्मन यांचा ऋणी होता. साठच्या दशकाच्या मध्यावर ज्यावेळी देव आनंद यांनी आपल्या नवकेतन चित्र संस्थेच्या वतीने आर के नारायण यांच्या 'गाईड' या साहित्य अकादमी विजेत्या कलाकृतीवर चित्रपट बनवण्याचे ठरवले त्यावेळी त्यांच्यासमोर पहिले नाव सचिन देव बर्मन यांचेच होते!

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

खरंतर १९६१ सालच्या 'हम दोनो' या चित्रपटाला जयदेव यांनी सांगितले होते. हे संगीत देखील नवकेतन यांच्या संगीत परंपरेला साजेसं असं परिपूर्ण संगीत होतं. त्यामुळे यापुढे जयदेव यांना नवकेतनच्या आगामी चित्रपटाला संगीत देता येईल अशी अपेक्षा निर्माण झाली होती. तसे संकेत देखील त्यांना मिळाले होते. एक चित्रपट सचिन देव बर्मन आणि चित्रपट जयदेव असे ठरले गेल्याची वंदता त्या काळात होती. यातील खरे खोटे किती हे माहिती नाही पण असं त्या काळात बोललं जात होतं. त्यामुळे 'हम दोनो' नंतरचा 'तेरे घर के सामने' हा चित्रपट सचिनदा यांच्याकडे गेला. त्यानंतर 'गाईड' या चित्रपटाची निर्मिती सुरू झाली. या चित्रपटाला जयदेव यांची संगीत असेल असे सर्वांना वाटत होते. पण देव आनंद यांनी सचिन देव बर्मन यांच्याच नाव फायनल केले. सचिनदा यांनी त्याच्या संगीतावर काम देखील सुरू केले. एका गाण्याची धून देखील तयार झाली. परंतु त्याच वेळी सचिन देव बर्मन यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांना रुग्णालयात दाखल व्हावे लागले.

या काळात देव आनंद अमेरिकेत होता. जेव्हा त्याला सचिनदाच्या हार्ट अटॅक ची बातमी कळली तो ताबडतोब अमेरिकेतून भारतात परतला आणि सचिनदा यांना भेटायला रुग्णालयात गेला. सचिन देव बर्मन अशा अवस्थेत रुग्णालयात पडून होते हे पाहून त्याला खूप वाईट वाटले. सचिनदा यांना देखील देव आनंदला पाहून खूप बरे वाटले. दोघांच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. देव आनंद त्यांना "दादा, तुम्ही लवकरच बरे व्हाल!" असा विश्वास दिला. त्यावर सचिनदा म्हणाले, "मला माहित नाही पण एका गोष्टीचं नक्कीच वाईट वाटतं. तुझ्या 'गाईड'ला मात्र मी संगीत देऊ शकणार नाही. तू दुसरा कुठला तरी संगीतकार या चित्रपटासाठी पहा. माझ्याकडून हे काम पूर्ण होईल

असे मला वाटत नाही." त्यावर देव आनंद त्यांना म्हणाले , "दादा तुम्ही असे का म्हणता? तुम्हाला काहीही होणार नाही. मी संगीतकार बदलणार नाही." सचिनदा खचले होते. पैलतीर त्याना दिसत होता. ते खिन्न पणे म्हणाले, "आणि खरोखरच यातून मी बराच झालो नाही तर?" यावर देव आनंदचे शब्द होते, "तर सचिनदा मी शब्द देतो तुम्हाला. 'गाईड' चित्रपटात फक्त एकच गाणे असेल ज्याची धून तुम्ही आत्ता बनवली आहे. हा चित्रपट तुमचा होता. तुमचा आहे. तुमचाच राहील! तुम्ही स्वस्थ रहा. लवकर बरे व्हा, आणि लवकरच आपण पुन्हा त्यावर काम सुरू करू!"

देव आनंद यांच्या तोंडातून कदाचित देवच बोलत होता. त्या शब्दांनी जादू केली. सचिनदा लवकरच आजारातून बरे झाले आणि पुन्हा नव्या उत्साहाने कामाला लागले. आणि 'गाईड'ची उरलेली सगळी गाणी त्यांनी रेकॉर्ड केली. आज पन्नास वर्षाचा कालखंड उलटून जरी गेला असला तरी गाईड चित्रपटातील गाण्याची गोडी अद्याप तशीच आहे. पिया तोसे नैना लागे रे.., क्या से क्या हो गया बेवफा.., मोसे छल किये जाय सैया बेईमान.., गाता रहे मेरा दिल.., आज फिर जीने की तमन्ना है.., तेरे मेरे सपने अब एक रंग है.., दिन ढल जाये हाय रात ना जाये.., वहा कौन है तेरा मुसाफिर जायेगा कहा.., अल्ला मेघ दे पानी दे.... ही लता मंगेशकर, मोहम्मद रफी, किशोर कुमार आणि सचिन देव बर्मन यांच्या स्वरातील गाणी आजही रसिक मोठ्या आवडीने ऐकत असतात. चित्रपट सुपरहिट ठरला. सचिनदा यांच संगीत प्रचंड गाजलं.'गाईड' च्या वेळी हार्ट अटॅक ने खचलेले सचिनदादेव च्या त्या आश्वासनाने पुन्हा उभे राहिले आणि पुढची दहा वर्षे त्यांची गाणी आणि संगीत हिंदी सिनेमात गाजत

राहिले वाजत राहिले. ज्वेल थीफ, आराधना, तलाश, तेरे मेरे सपने, अभिमान.... ही यशाची नवी इनिंग ते खेळले!

© धनंजय कुलकर्णी

♥



♥

लेख क्र. 4

अभिनेता गोविंदाच्या उत्तराने संगीतकार नौशाद यांच्या डोळ्यात कां पाणी आले?

संगीतकार नौशाद यांनी हिंदी सिनेमामध्ये पासष्ट वर्षांहून अधिक कालावधी व्यतीत केला. (प्रेमनगर-१९४० ते ताजमहल-२००५) या पासष्ट वर्षाच्या त्यांनी ६४ चित्रपटांना संगीत दिले. यातील जवळपास पन्नास चित्रपट सुपर हिट ठरले. भारतीय अभिजात शास्त्रीय संगीताला तसेच लोकसंगीताला प्रामुख्याने आपल्या चित्रपट संगीतात आणून नौशाद यांनी हिंदी चित्रपट संगीताचे दालन आणखी समृद्ध केले. १९८२ साली त्यांनी संगीत दिलेला 'धरम कांटा' हा चित्रपट प्रदर्शित झाला. त्यानंतर १९८५ झाली त्यांचा चित्रपट 'लव अँड गॉड' रिलीज झाला. हा वस्तुत: रखडलेला सिनेमा होता, त्याचे संगीत वीस वर्षापूर्वीच बनले होते. यानंतर मात्र नौशाद यांना चित्रपट मिळेनासे

झाले. एक तर हिंदी चित्रपट संगीताचा ट्रेंड बदलला होता. नौशाद यांच्या संगीतात गुणवत्ता होती पण त्या गुणवत्तेला पारखी नजरेने पाहणारा प्रेक्षक वर्ग आता उरला नव्हता. साधारणत: १९९० च्या सुमारास नौशाद यांना आपल्या दोन्ही मुलांच्या करिअर असा प्रश्न देखील भेडसावत होता. पैकी एक मुलगा राजू नौशाद त्यांचा सहाय्यक होता. तर दुसरा रहमान नौशाद हा चित्रपट दिग्दर्शन करण्यासाठी उत्सुक होता. त्याच्यासाठी चांगला चित्रपट मिळावा, यासाठी नौशाद स्वतः प्रयत्न करत होते. आपल्या दोन्ही मुलांचे करीअर मार्गी लागावे यासाठी ते स्वत: प्रयत्नशील होते.

नौशाद यांचे एक चाहते होते प्रेम ललवाणी ! त्यांनी एक चित्रपट निर्माण करायचे ठरवले. तसे त्यांनी नौशाद यांच्या कानावर घातले. त्यांनी लगेच त्यांना स्वत:ची एक कथा ऐकवली. या कथेत संगीत/नृत्याला खूप मोठा वाव होता. नौशाद यांच्या याच कथेवर चित्रपट बनवण्याचे प्रेम ललवाणी यांनी ठरवले. या चित्रपटाला संगीत नौशाद यांचे असणार होते. तर दिग्दर्शन नौशाद यांचे सुपुत्र रहमान नौशाद करणार होते. चित्रपटातील कलाकारांचा शोध सुरू झाला. चित्रपटाची नायिका हे नृत्य निपुण असणे गरजेचे होते त्या मुळे मीनाक्षी शेषाद्रीची निवड झाली. आता नायक कुणाला घ्यायचे याचा शोध सुरू झाला. मीनाक्षी आणि जॅकी श्रॉफ ही जोडी लोकप्रिय असल्याने जॅकी श्रॉफला विचारले पण बिझी शेड्युलमुळे त्यांनी नकार दिला. आपल्या सिनेमात आमिर खान यांनी भूमिका करावी आणि म्हणून नौशाद यांनी स्वत: त्याचे वडील ताहीर हुसेन यांना फोन केला पण त्यांनी देखील विनंतीला सकारात्मक प्रतिक्रिया दिली नाही. सनीला विचारले तिकडून देखील नकार घंटा ऐकू आली. आपल्या मुलाच्या पहिल्याच चित्रपटाच्या दिग्दर्शनात अशा अनंत अडचणी येत होत्या.

चित्रपटाला नायकच मिळत नव्हता. नौशाद अली यांनी श्री दिलीप कुमार यांना विनंती करून अनिल कपूर यांनी आपल्या चित्रपटात काम करण्यासाठी सांगावे अशी विनंती केली. दिलीप कुमार यांनी नौशाद यांना सांगितले "मी अनिल कपूर नाही, पण त्यांच्या वडिलांना म्हणजे सुरेंद्र कपूर यांच्याशी बोलतो." परंतु दिलीप कुमार त्यांच्या 'सौदागर' या चित्रपटाच्या आउटडोर शूटिंगला गेल्याने संपर्क झालाच नाही आणि अनिल कपूर देखील चित्रपटात आला नाही!

सगळीकडून नकारघंटा येत असल्याने नौशाद आणि त्यांचे सुपुत्र रहमान खूप नाराज झाले. शेवटी नौशाद यांनी अभिनेता गोविंदाच्या आईला म्हणजे गायिका निर्मला देवी यांना फोन लावला आणि त्यांना सर्व परिस्थिती सांगितली. निर्मलादेवी त्यांना म्हणाल्या "नौशाद साब आपने मुझे फोन करते याद किया यही मेरे लिये बहुत कुछ है! मै कल ही मेरे बेटे को लेकर आपके ऑफिस आती हूं.." त्या काळात निर्मलादेवी यांची प्रकृती बरी नव्हती. त्यांना पाठ दुखीचा प्रचंड त्रास होत होता. तशा अवस्थेत त्या दुसऱ्या दिवशी गोविंदाला घेऊन नौशाद यांच्या ऑफिसमध्ये गेल्या. तिथे जाऊन त्यांनी गोविंदाला सांगितले "ये रहमान नौशाद तुम्हारे बडे भाई जैसा आहे और तुम्हे इन की फिल्म काम करना है" गोविंदा आपल्या आईच्या शब्दाबाहेर नव्हता. त्याने तिथल्या तिथे होकार दिला. त्याने स्टोरी ऐकली नाही किंवा कोण अभिनेत्री त्याच्यासोबत काम करणार हे देखील विचारले नाही. नौशाद त्यांनी मानधनाविषयी विचारले; त्यावेळी गोविंदा म्हणाला "बडे भाई से छोटा भाई कैसे पैसे ले सकता है?" हे उत्तर ऐकून नौशाद यांच्या डोळ्यात पाणी आले. निर्मला देवीच्या डोळ्याला धारा लागल्या. संपूर्ण हिंदी सिनेमाच्या दुनियेत आपल्या संगीताने जादू निर्माण करणाऱ्या नौशाद यांना मागच्या काही

दिवसांमध्ये अतिशय कटू अनुभव येत होते. या काळात त्यांना गोविंदाकडून हा मोठा अनपेक्षित आणि सुखद अनुभव मिळाला. पुढे हा चित्रपट तयार झाला. यातील गाणी खूप चांगली होती. लता मंगेशकर खूप वर्षांनी त्यांच्याकडे गायल्या. पण हा सिनेमा चुकीच्या काळात आला होता. आधी म्हटल्यासारखे नौशाद यांच्या गाण्याची पारख करणारा प्रेक्षक वर्ग आता राहिला नव्हता. त्यामुळे हा सिनेमा फ्लॉप झाला. २४ डिसेंबर १९९३ रोजी प्रदर्शित झालेल्या या सिनेमाचे टायटल होते 'तेरी पायल मेरे गीत'!

© धनंजय कुलकर्णी

♥

♥

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

लेख क्र. 5

राजेश खन्ना! या सुपरहिट सिनेमाचा

तो First Choice नव्हता !

आपल्याकडे समाजात पुरुषसत्ताक पध्दती सर्वमान्य असल्याने कदाचित पण हिंदी सिनेमा मध्ये नायकाचे महत्व सुरुवातीपासूनच सर्वाधिक आहे. खरंतर सिनेमा हे दिग्दर्शकाचं माध्यम असते पण आपल्याकडे 'हिरो ओरिएंटेड सिनेमा' असल्याने आणि तसाच प्रेक्षकवर्ग तयार झाल्यामुळे कायम आपण सिनेमाकडे नायकाचा सिनेमा म्हणूनच या माध्यमाकडे पाहतो. अर्थात चित्रपटाच्या नायक पदी कोणाची वर्णी लागेल आणि कोणाचा पत्ता कधी कट होईल हे सांगता येत नाही. बऱ्याचदा नायकाची चलती असेल तर त्याच्याकडे भूमिकांचा पाऊस पडतो पण कधीकधी परिस्थिती उलट देखील असू शकते! सुपरस्टार राजेश खन्ना याने सलग १७ सुपरहिट सिनेमे देण्याचा विक्रम केला आहे जो आजवर दुसऱ्या कुणालाही मोडता आला नाही.

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

याच राजेश खन्नाच्या बाबतीत अनेक किस्से आजही चवीने सांगितले जातात. आज आपण अशाच एका वेगळ्या पैलूवर नजर टाकणार आहोत. या लेखात समाविष्ट झालेले हे सर्व राजेश खन्ना नायक असलेले चित्रपट आहेत पण हे चित्रपट निर्माण होण्या पूर्वी किंवा निर्मिती अवस्थेत असताना या चित्रपटाचा नायक हा दुसराच कोणीतरी होता. म्हणजे राजेश त्यांचा First Choice नव्हता. नंतर तिथे राजेश खन्नाची वर्णी लागली. याचाच अर्थ या सिनेमांची पहिली पसंती राजेश खन्ना नव्हता. त्या काळी हरेक निर्मात्यांना राजेश खन्नाला आपल्या सिनेमात आणण्याचा आटोकाट प्रयत्न असायचा पण त्याचे मानधन, त्याच्या तारखा याचा मेल बसायचा नाही. त्या वेळी गमतीने म्हटले जायचे 'उपर आका नीचे काका!'.

त्याकाळात प्रसिध्द झालेल्या सिने नियतकालिकातून या सर्व बातम्यांचा खुलासा व्हायचा. अर्थात बरेच मासिके ही 'गॉसिप' टाईप असल्याने यात सत्यता प्रत्येक वेळी असेलच असेही नसायचे. पण आज चाळीस-पन्नास वर्षानंतर आपण जेंव्हा ही मासिके पाहतो, वाचतो त्या वेळी या बातम्या वाचून आश्चर्य वाटते, करमणूक ही होते आणि मनात मग "असं झालं असतं तर?" असे प्रश्न येवून आपण कल्पना रंजन करू शकतो!

या सिनेमांचा आपण शोध जेंव्हा घेऊ लागतो त्यात पहिल्यांदा डोळ्यापुढे येतो 1969 साली प्रदर्शित झालेला बी आर चोप्रा यांचा 'इत्तफाक'! या चित्रपटात राजेश खन्ना एका मनोरुग्णाची भूमिका केली आहे ज्याच्यावर त्याच्या पत्नीचा खून केल्याचा आरोप आहे! हा सिनेमा १९६५ साली आलेल्या 'साईन पोस्ट टू मर्डर' या अमेरिकन मूव्हीवर बेतला होता. याच कथानकावर आपल्या कडे श. ना. नवरे यांनी 'धुम्मस' हे नाटक लिहिले होते.

या सिनेमासाठी सुरुवातीला बी. आर. चोप्रा यांची पहिली पसंती 'राजकुमार' होता. परंतु राजकुमार या वेळी चेतन आनंद यांच्या 'हिर रांझा' या चित्रपटाच्या शूटिंगमध्ये असल्याने त्यांनी नकार दिला. नंतर चोप्रांनी शत्रुघ्न सिन्हा यांना या भूमिकेसाठी विचारले परंतु त्यांनी देखील या भूमिकाला पसंती दिली नाही. या नंतर राजेश खन्ना विचारले. तो या भूमिकेच्या प्रेमातच पडला! त्याने ती भूमिका परफेक्ट निभावली! या सिनेमाच्या शूटिंगच्या दरम्यान त्याचे 'दो रास्ते' चित्रपटाचे चित्रीकरण चालू होते. 'इत्तफाक' हा सिनेमा अवघ्या महिनाभरात पूर्ण करायचे ध्येय बी. आर. चोप्रा यांनी ठरवले होते. या संपूर्ण सिनेमात राजेश खन्ना दाढीत दाखवला आहे. याच दरम्यान दो रास्ते मधील 'ये रेशमी जुल्फे ये शरबती आंखे' गाण्याचे चित्रीकरण करायचे होते. 'इत्तफाक' मधील भूमिकेमध्ये कंटिन्युटीचा अडथळा येऊ नये म्हणून त्याने 'दो रास्ते' मधील या गाण्यात आपला 'इत्तफाक'चा 'लूक' तसाच ठेवला आणि गाणे चित्रीत केले. तुम्ही पहा 'दो रास्ते' या सिनेमामध्ये फक्त या गाण्यातच राजेश खन्नाला दाढी आहे. (तो 'इत्तफाक'च्या सेट वरून तसाचा आला होता!) यास वर्षी राजेश खन्नाचा राज खोसला दिग्दर्शित 'दो रास्ते' हा चित्रपट देखील प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात खरं तर राजेश खन्नाच्या जागी खोसला यांनी संजय खानला घेतले होते. पण संजय खान याने मानधनाची रक्कम जास्त सांगितल्याने त्याचा पत्ता कट होऊन तिथे राजेश खन्नाची एन्ट्री आली.

१९७० साली मनमोहन देसाई यांच्या 'सच्चा झूठा' या चित्रपटात राजेश खन्नाचा डबल रोल होता. या सिनेमाच्या निर्मितीच्या वेळी म्हणून देसाई यांच्या नजरेसमोर आधी शशी कपूर यांचे नाव होते. परंतु शशी कपूरला

ज्यावेळी या सिनेमाची नायिका मुमताज आहे हे कळले त्यावेळी त्याने नकार दिला. कारण तोवर मुमताजवर बी आणि सी ग्रेडच्या सिनेमाची नायिका असा शिक्का होता! गंमत म्हणजे मुमताज स्टार बनल्यानंतर श शशी कपूर ने तिच्या सोबत काही भूमिका केल्या होत्या. (प्रेम कहानी, चोर मचाये शोर). आज राजेश खन्ना शिवाय दुसऱ्या कुणाचा विचार आपण 'सच्चा झूठा' मधील चित्रपटासाठी करू शकत नाही. १९७१ साली एच. एस. रवैल यांचा 'मेहबूब की मेहंदी' हा मुस्लीम सोशल चित्रपट आला होता. हा चित्रपट सात-आठ वर्षांपूर्वीपासून निर्मिती अवस्थेत होता. सुरुवातीला त्यावेळी या सिनेमाचा नायक प्रदीप कुमार होता पण पुढे काही काळ सिनेमा डब्यात गेला. पुन्हा नव्याने सुरुवात झाली त्या वेळी या सिनेमाची संपूर्ण स्टारकास्ट बदलली गेली. आता नायक म्हणून राजेश खन्ना तर नायिका म्हणून लीना चंदावरकरचा समावेश झाला. आता ही चित्रपटात प्रदीप कुमारची भूमिका होती पण ते या सिनेमात चरित्र अभिनेते म्हणून झळकले.

ऋषिकेश मुखर्जी यांचा ऑल टाईम ग्रेट सिनेमा 'आनंद'! या सिनेमात खरं तर आधी राज कपूर प्रमुख भूमिकेमध्ये असणार होते परंतु नंतर त्यांनी स्वतः या सिनेमात काम करायला नकार दिला. त्यानंतर किशोर कुमार, धर्मेंद्र, उत्तम कुमार, शशि कपूर यांच्या नावाचा देखील विचार झाला होता पण म्हणतात ना 'दाने दाने पे लिखा है खानेवाले का नाम' ही भूमिका राजेश खन्नाचीच होती आणि त्याच्या आयुष्यातील सर्वोत्तम अभिनयाचा आविष्कार त्याने या सिनेमातून दाखवून दिला! याच वर्षी राजेश खन्नाचा आणखी एक चित्रपट आला होता या सिनेमाने राजेश खन्ना बच्चे कंपनी चा लाडका हिरो ठरला. हा चित्रपटाचा होता 'हाथी मेरे साथी'! दैवर चिन्नापा देवर यांनी

सुरुवातीला खरंतर संजय खान यांना घेण्याचे ठरवले होते पण पुढे चक्र फिरली आणि या सिनेमात राजेश खन्ना यांचा समावेश झाला.

१९७२ साली शक्ती सामंत यांचा 'अमरप्रेम' हा अप्रतिम चित्रपट आला होता. या चित्रपटात सुरुवातीला राजकुमार यांना घेण्याचे शक्ती सामंत यांनी ठरवले होते. पण ज्यावेळी राजेश खन्नाला ही बातमी कळाली त्यावेळी तो शक्ती सामंत यांना म्हणाला "आराधना आणि कटी पतंग हे दोन चित्रपट मी आपल्या सोबत केलेले आहेत. मग 'अमरप्रेम' सारख्या महत्त्वाच्या सिनेमात तुम्ही माझ्या नावाचा विचार का करत नाही?" त्यावेळी शक्ती सामंत यांनी राजेश खन्नाला सांगितले "जरा तुम्ही तुमची डायरी बघून सांगा पुढच्या सहा महिन्यात तुमच्याकडे एक तरी तारीख शिल्लक आहे का?" राजेश खन्नाने त्याच्या सेक्रेटरीला बोलावून डायरी चेक केली. त्यावेळी त्यांना शक्ती सामंत यांचे बोलणे पटले! परंतु 'अमर प्रेम' सारखा चांगला चित्रपट हातातून सोडणे त्यांना योग्य वाटले नाही. त्यांनी शक्ती सामंत यांना प्रॉमिस केले की पुढचे सहा महिने रोज चार तास मी या चित्रपटाच्या शूटिंगसाठी देईल. राजेश खन्नाने आपले बोलणे खरे केले आणि ही अप्रतिम कलाकृती आपण राजेश च्या रुपात पाहू शकलो. याच वर्षी 'अपना देश' या दाक्षिणात्य चित्रपटात देखील राजेश खन्ना चमकला होता. ही भूमिका देखील आधी राजेंद्र कुमार यांना ऑफर झाली होती परंतु त्यांनी या भूमिकेसाठी अधिक मानधन सांगितल्यामुळे ही भूमिका राजेश खन्नाच्या वाट्याला आली. १९७४ साली मनमोहन देसाई यांच्या 'रोटी' या चित्रपटात राजेश खन्नाची भूमिका होती. ही भूमिका खरंतर आधी शत्रुघ्न सिन्हा यांना मिळणार होती. एका फिल्मी मॅगझिन मध्ये त्यांनी याचा खुलासा केला होता. 'रामपूर का लक्ष्मण' या चित्रपटाचे शूटिंग चालू असताना,

मनमोहन देसाई यांनी शत्रुघ्न सिन्हाला प्रॉमिस केले होते की त्यांच्या पुढच्या सिनेमासाठी ते प्रमुख नायक असतील. परंतु ज्यावेळी 'रोटी' या चित्रपटाचे चित्रीकरण सुरू झाले त्यावेळी राजेश खन्ना प्रमुख नायक होताना दिसले. याचे कारण मनमोहन देसाई यांनी असे सांगितले की त्यावेळी डिस्ट्रीब्युटर्स यांनी मनमोहन देसाई यांच्यावर मोठा दबाव आणला होता आणि जर सिनेमाचा नायक राजेश खन्ना नसेल तर सिनेमाची खरेदी होणार नाही इतपत त्यांनी बोल सुनावले होते. त्यामुळे मनमोहन देसाई यांना राजेश खन्नाचा विचार करावाच लागला.

१९७६ साली शम्मी कपूर दिग्दर्शित 'बंडलबाज' या चित्रपटात देखील राजेश खन्नाच्या जागी आधी अमिताभ बच्चन यांचा विचार झाला होता परंतु अमिताभ बच्चन त्यावेळी बिझी स्टार असल्यामुळे ते डेट्स देऊ शकले नाही आणि तिथे राजेश खन्नाची वर्णी लागली. त्याप्रमाणे १९७९ साली प्रदर्शित झालेल्या 'जनता हवालदार' या सिनेमासाठी देखील मेहमूदला अमिताभ बच्चन हेच नायक म्हणून हवे होते परंतु त्यावेळी देखील डेटचा प्रॉब्लेम आल्यामुळे राजेश खन्नाला या सिनेमात नायक म्हणून घेण्यात आले. १९८० साली डॅनी डेंझोग्पा यांनी दिग्दर्शित केलेला सस्पेन्स चित्रपट 'फिर वही रात' या सिनेमासाठी आधी शशी कपूर यांचा विचार झाला होता. परंतु त्यावेळी ते होम प्रोडक्शन मध्ये बिझी असल्यामुळे राजेश खन्ना या चित्रपटात आले. १९८१ साली सोहनलाल कंवर यांचा 'धनवान' हा चित्रपट आला होता. या सिनेमात खरं तर सोहनलाल कंवर यांना त्यांचे लाडके अभिनेते मनोज कुमार यांना घ्यायचे होते. कारण मनोज कुमारसोबत त्यांनी पहचान, संन्यासी, दस नंबरी असे हिट सिनेमे दिले होते. पण चित्रपटाचे लेखक मिर्झा ब्रदर्स यांनी आवर्जून

राजेश खन्नाला या चित्रपटात भूमिका दिली. १९८४ साली दिग्दर्शक सुरेंद्र मोहन यांचा 'निशान' हा चित्रपट आला होता. या चित्रपटाची आधीची स्टारकास्ट सुनील दत्त आणि रीना रॉय हे होते परंतु पुन्हा एकदा डिस्ट्रीब्यूटरच्या आग्रहामुळे राजेश खन्नाला घ्यावे लागले, आणि राजेश खन्ना सोबत पूनम धिल्लन हिची या सिनेमात एन्ट्री झाली झाली! याचवर्षी सोहनलाल कंवर यांचा 'पापी पेट का सवाल है' हा सामाजिक चित्रपट आला होता. या चित्रपटाचे आधीची स्टारकास्ट मनोज कुमार, राजेश खन्ना आणि शत्रुघ्न सिन्हा अशी होती. परंतु मनोज कुमार याने हा चित्रपट सोडल्याने ती भूमिका राजेश खन्ना देण्यात आली. राजेश खन्नाची भूमिका शत्रुघ्न सिन्हा देण्यात आली. आणि शत्रुघ्न सिन्हाचा रोल कवलजीत या अभिनेत्याला देण्यात आला. याच वर्षी एक दाक्षिणात्य चित्रपट आला होता 'आज का एम एल ए राम अवतार' या चित्रपटातील या भूमिकेसाठी आधी दिलीप कुमार आणि अमिताभ बच्चन यांना विचारले गेले आणि दोघांच्या नकारानंतर ही भूमिका राजेश खन्ना यांना मिळाली. शक्ती सामंत यांचा १९८५ साली प्रदर्शित झालेल्या 'आवाज' या चित्रपटासाठी आधी दिलीप कुमार आणि मनोज कुमार यांना विचारले होते परंतु दोघांनी नकार दिल्यानंतर त्याजागी राजेश खन्ना आणि राकेश रोशन यांची वर्णी लागली. त्याच्याच पुढच्या वर्षी आलेल्या 'मास्टरजी' या साउथ इंडियन मूव्ही साठी निर्मात्याची पहिली पसंती खरतर अमिताभ बच्चन ही होती परंतु अमिताभ बच्चन त्याकाळात राजकारणात असल्याने त्यांनी भूमिका नाकारली. याच वर्षी 'नसीहत' हा चित्रपट देखील आला होता. या चित्रपटात सुरुवातीला शशी कपूर सोबत शबाना आजमी अशी स्टारकास्ट होती. परंतु शशी कपूर शबाना सोबत काम करायला नकार दिला आणि तिच्या ऐवजी

दुसरी हीरोइन घ्या असा सल्ला दिला परंतु निर्मात्याने शशी कपूर यांनाच वगळले आणि तिथे राजेश खन्नाला घेतले. नायिका मात्र शबाना आजमीच राहिली. राजेश खन्नाचा अप्रदर्शित चित्रपट 'जय शिवशंकर' हे त्याचे होम प्रोडक्शन होते. या चित्रपटात सुरुवातीला राजेश खन्ना काम करणार नव्हता. तिथे विनोद खन्ना, मिथुन चक्रवर्ती आणि जॅकी श्रॉफ अशी स्टारकास्ट होती. पण पुढे सिनेमा रेंगाळला आणि समीकरणे बदलली.आता तिथे राजेश खन्ना , जितेंद्र आणि चंकी पांडे यांची वर्णी लागली. हा चित्रपट पूर्ण होऊन देखील आजवर प्रदर्शित झालेला नाही.

सिनेमा निर्मिती ही मोठी गुंतागुंतीची प्रक्रिया असते. इथे उल्लेख केलेल्या सर्व घटना अशाच घडल्या असतील याची सुतराम शक्यता नाही पण जुनी फिल्मी मासिके चाळली की त्यातून अशी मनोरंजक माहिती हाती येते.

© धनंजय कुलकर्णी

♥

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

लेख क्र. 6

किशोरकुमारने गायलेल्या या गाण्यावर बप्पी लाहिरीने स्वत:च्या आवाजात चार ओळी का इम्पोज केल्या?

सिनेमा तयार होण्याच्या प्रक्रियेत कधीकधी गमतीशीर गोष्टी घडतात. ऐन वेळेला काही बदल करावे लागतात. ते बदल करताना जुन्या या गोष्टींना फार बदलता येत नाही पण तरीही बदल करावाच लागतो. एकदा असाच प्रसंग संगीतकार बप्पी लहरी यांच्या वाट्याला आला होता. १९८५ साली दिग्दर्शक के. बापय्या यांनी 'आज का दौर' नावाच्या एका चित्रपटाची निर्मिती केली. मूलतः हा चित्रपट एका दाक्षिणात्य सिनेमाचा रिमेक होता. आधी १९८१ साली तमिळमध्ये (कुदुमबम ओरु कदमबम) मग १९८३ साली कन्नड मध्ये (आनंद सागरा) आणि नंतर १९८४ साली तेलगू मध्ये (मनिशिको चरीतरा) असा प्रवास होत.. हा सिनेमा १९८५ झाली हिंदी भाषेत तयार झाला. या सिनेमाचे हे टायटल दुसऱ्या एका निर्मात्याने आधीच बुक करून ठेवले होते. त्याच्याकडून

निर्मात्याने रु. ३०,०००/- देवून हे टायटल स्वत:कडे घेतले. (त्या काळात ही रक्कम तशी खूप मोठी होती!) या सिनेमात जॅकी श्रॉफ, पद्मिनी कोल्हापुरे, राजकिरण, कादर खान यांच्या प्रमुख भूमिका होत्या. या चित्रपटातील गाणी हिंदी इंदीवर यांनी लिहिली होती तर संगीत बप्पी लहरी यांचे होते. या सिनेमाचा नायक जॅकी श्रॉफ एका पेट्रोल पंपावर सेल्समनचे काम करत असतो. या सिनेमात एक युगलगीत होते किशोर कुमार आणि अलका याज्ञिक यांच्या आवाजात! एका गाण्यात शब्द होते, 'पेट्रोल भरो जल्दी करो मेरी गाडी कबसे खडी है..' या सिनेमात सात-आठ मुली पेट्रोल पंपावर येऊन जॅकी श्रॉफ भोवती पिंगा घालत हे गाणं म्हणतात अशी सिच्युएशन होती. त्यावर जॅकी श्रॉफ चे उत्तर असते 'पानी भी देंगे, तेल भी देंगे, ढक्कन खोल के रखना, लाईन बहुत बडी है' किशोर कुमार आणि अलका याज्ञिक यांच्या स्वरात हे गाणे रेकॉर्ड सिनेमा पूर्ण झाला! सेन्सॉरकडे दाखल झाला सेन्सॉरने या गाण्यावर आक्षेप घेत जॅकी श्रॉफच्या तोंडी असलेल्या ओळी त्यांना अश्लील वाटल्या आणि त्यांनी या ओळी बदलण्यासाठी सांगितले. सेन्सॉर बोर्डाचे म्हणणे असे होते की 'तुम्ही पुन्हा रिशूट करू नका फक्त या ओळी बदला आम्हाला काहीही हरकत नाही..' आता गीतकाराला बोलावून त्या 'लीप-सिंक' नुसार काही नवीन ओळी टाकाव्या लागणार होत्या. इंदीवर यांना लगेच पाचारण करण्यात आले व त्यांनी ताबडतोब त्या ओळी बदलल्या. आता बप्पी लहरी यांनी किशोर कुमार यांना फोन करून सर्व किस्सा सांगितला आणि त्यांना सांगितले 'दादा आप जब भी मुंबई आओगे वो बदली हुई चार लाईन आपको फिर से गाना है.." त्यावेळी किशोर कुमार कलकत्त्याला शो करत होता. त्याने तिथूनच बप्पी लहरी उत्तर दिले. "अरे भप्पी तू मेरा भांजा है ना...! मेरे प्यारे भांजे तू ही वो लाईन गा देना!"

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

यावर बप्पी लहरी यांनी किशोर कुमारला सांगितले "दादा वो आपका गाना है मै कैसे गा सकता हूं?" त्यावर किशोर चे उत्तर होते "अरे बप्पी मै कहता हू ना तू गा ले! मेरे पास टाइम नही है. कल से मै विदेश जा रहा हूं!" आता पंचाईत निर्माण झाली. कारण सिनेमा पूर्ण तयार झाला होता. आता रिलीजसाठी तारखा डिक्लेअर झाल्या होत्या. त्या आक्षेपार्ह चार ओळी बदलल्याशिवाय सेन्सॉर सिनेमाला पास करत नव्हते. किशोर कुमारने या गाण्याच्या चार ओळी नव्याने रेकॉर्ड करायला असमर्थता दाखवली होती. करायचे काय? मग बप्पीने दिग्दर्शकाला सर्व प्रकार सांगितला. दिग्दर्शकाने देखील किशोरच्या मताची री ओढली आणि या चार ओळी तुमच्या आवाजातच रेकॉर्ड करा असे सांगितले. बप्पी लहरी यांनी दुसऱ्या दिवशी रेकॉर्डिंग स्टुडिओमध्ये जाऊन किशोरसारखा आवाज काढत त्या ओळी रेकॉर्ड केल्या! आता या गाण्याच्या 'पाणी भी देंगे, तेल भी देंगे, ढक्कन खोल के रखना, लाईन बहुत बडी है' च्या ऐवजी नवीन ओळी होत्या "जैसा कहेंगे, वैसा करेंगे, धीरज दिल में रखना, लाईन बहुत बडी है" या ओळी बप्पी लाहिरी यांनी किशोरचा आवाज करण्याचा आटोकाट प्रयत्न केला आणि गाण्यात त्या चार ओळी जिथे जिथे येतात तिथे तिथे त्या री-इम्पोज केल्या. ९०% प्रेक्षकांच्या आणि श्रोत्यांच्या हा बदल लक्षात देखील आला नाही! आता तुम्ही जेव्हा हे गाणं पुन्हा ऐकाल तेंव्हा बारकाईने ऐका! तुम्हाला त्या ओळीत बप्पी लहरीच्या आवाजात ऐकू येतील. बप्पीचा हा 'जुगाड' मोठा इंटरेस्टिंग ठरला.

© धनंजय कुलकर्णी

♥

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

AAJ KA DAUR
AUDIO
JUKEBOX
You / Venus / Venusentertainment / Venusmovies / +Venusmovies

♥

लेख क्र. 7

राजेशखन्ना जज समोर जावून कां म्हणाले "मुझे गिरफ्तार करके जेल में डाल दो"!

भारतात बऱ्याचदा चित्रपट कलावंतांना त्यांच्या 'स्टारडम' चा Atitude समाजात दाखवावा वाटत असतो. आपल्या जनमानसात असलेल्या प्रतिमेचा उपयोग (खरंतर दुरुपयोगच !) समोरच्या व्यक्तीवर किंवा संस्थेवर दबाव टाकण्यासाठी करणे सर्वार्थाने चुकीचे असते. पण लोकप्रियतेच्या नशेत आपण काय करतो हेच बऱ्याच वेळेला कलाकाराला कळत नाही. रील लाईफ आणि रियल लाईफ मध्ये फरक असतो हे समजावून घेतच नाहीत. सुपरस्टार राजेश खन्ना याच्या बाबतीतला हा किस्सा आपल्याला हेच सांगून जातो.

एकोणीशे त्र्याऐंशी साली राजेश खन्नाने त्याच्या मुंबईतील 'आशीर्वाद' या बंगल्यामध्ये एका मिनी थिएटरची निर्मिती केली होती. यासाठी लागणारा पैसा त्याने कुठून मिळाला होता याची नोंद त्याने इन्कम टॅक्स रिटर्न फाईल करताना केली नव्हती. तसेच महापालिकेला देखील याची कल्पना दिली नव्हती. त्यादृष्टीने ती बेनामी प्रॉपर्टी झाली होती. कारण महापालिकेची ही कुठलीही परवानगी राजेश खन्नाने घेतली नव्हती. इन्कम टॅक्स डिपार्टमेंटने राजेश खन्ना वर कोर्टात केस दाखल केली. कोर्टाकडून राजेश खन्ना यांना तीन वॉरंट पाठवले गेले. तिन्ही वेळी राजेश खन्ना किंवा त्याचे वकील कोर्टाकडे फिरकलेच नाहीत. कोर्टाला हा अपमान वाटला आणि त्यांनी फायनल वॉरंट राजेश खन्नाच्या नावाने काढला. यावेळी राजेश खन्ना ला कोर्टात उपस्थित राहणे गरजेचे होते. आपण स्टार आहोत, सुपरस्टार आहोत आपल्याला वेगळी 'ट्रीटमेंट' मिळायला पाहिजे असं राजेश खन्नाला वाटले! त्यामुळे तो रागातच तावातावाने सीएसटी जवळच्या कोर्टामध्ये गेला. कोर्टात अर्थातच खूप गर्दी होती. दुसरी एक केसची सुनावणी चालू होती. त्या वेळी राजेश खन्ना गर्दीतून जोरजोराने बडबड करत, जज साहेबांच्या समोर उभा राहिला आणि हातवारे करीत जोरात म्हणाला "माय लॉर्ड, मै गुनहगार हूं! मुझे गिरफ्तार कर लो. मुझे जेल के सलाखो के पीछे डाल दो.." त्याचे हे फिल्मी डायलॉग तेथील आम जनतेचे करमणूक करून गेले असले तरी जज साहेबांना हा प्रकार अजिबात आवडला नाही. दुसरी केस चालू असताना उपटसुंभासारखे येवून पुन्हा जजला अक्कल शिकवणे न्यायाधीश महोदयांना अजिबात आवडले नाही. त्यांनी तिथल्या तिथे सुपरस्टार राजेश खन्ना ला खडसावले आणि "यापुढे तुम्ही आणि तुमचे वकील मला या 'अवतारात' आणि या 'Attitude' मध्ये दिसता कामा

नये आणि तसे झाले तर कोर्टाचा अवमान समजून तुमच्यावर योग्य ती कार्यवाही केली जाईल" असे सांगितले. "आपली पहिली वेळ म्हणून आज मी तुम्हाला केवळ समज देत आहे!" अशी जाणीव पण करून दिली! राजेश खन्ना जज साहेबांचे खडे बोल ऐकून भानावर आले आणि कोर्टाची माफी मागून तो निघून गेले. न्यायमूर्ती व्ही एस पाटील यांचा त्या कोर्टातील तो शेवटचा दिवस होता दुसऱ्या दिवशी पासून ते कुर्ला कोर्टमध्ये जॉईन होणार होते. जाता जाता त्यांनी चांगलाच 'डोस' राजेश खन्ना यांना दिला. जज साहेबांनी म्हटल्या प्रमाणे राजेश खन्ना ला पुन्हा या जजसाहेबांसमोर जाण्याचा प्रसंगच आला नाही कारण न्या. पाटील साहेब कुर्ला कोर्टात जॉईन झाले. पुढे या कोर्टात ही केस काही वर्षे चालू राहिली, आणि राजेश खन्ना यांना ३,६१,५०६ रु. दंड भरायला लागलाच आणि नंतरच त्यांची या केसमधून मुक्तता करण्यात आली.

© धनंजय कुलकर्णी

♥

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

लेख क्र. 8

अभिनेता दिलीपकुमार यांना पुणे पोलिसांनी बेड्या ठोकून येरवडा जेल मध्ये स्थानबध्द केले!

हिंदी सिनेमातील महान अभिनेता दिलीप कुमार! अभिनयाची एक मोठी इनिंग त्यांनी रुपेरी पडद्यावर खेळली. प्रत्येक पिढीतील आघाडीच्या अभिनेत्यासोबत त्यांनी रुपेरी पडद्यावर मुकाबला केला. अशोक कुमार, बलराज सहानी, प्राण, संजीव कुमार, अमिताभ बच्चन या सोबत तोडीस तोड अभिनय करून त्यांनी रसिकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले. काही वर्षांपूर्वी त्यांचे आत्मचरित्र Dilip Kumar: Substance and shadow प्रसिद्ध झाले. या पुस्तकात त्यांनी रसिकाना अनभिज्ञ अशा बऱ्याच गोष्टींचा खुलासा केला. दिलीप कुमार यांना एकदा पुणे पोलिसांनी जेरबंद करून येरवडा जेलमध्ये स्थानबद्ध केले होते. एक रात्र त्यांनी येरवडा जेलमध्ये काढली होती! पण या घटनेचा अभिमान त्याना आयुष्यभर वाटत होता. काय होता हा किस्सा? दिलीप कुमार अभिनयाच्या क्षेत्रात येण्यापूर्वी चाळीसच्या दशकाच्या आरंभी, पुण्यात वायुदलाच्या कॅन्टीनमध्ये नोकरी करत होते. त्यापूर्वी दिलीपकुमार आणि त्यांचे कुटुंबिय नाशिकला देवळाली कॅम्पमध्ये फळांचा वापर करत होते. मोठे कुटुंब असल्यामुळे अर्थातच त्यांच्यावर जबाबदारी देखील मोठी होती.

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

त्यामुळे लहानपणापासूनच ते अर्थार्जनासाठी घराच्या बाहेर पडत होते. हा किस्सा स्वातंत्र्यकाळाच्या पूर्वीचा आहे.! दिलीपचे उर्दू बोलणे समोरच्यावर छाप पडणारे होते. त्यांचे वत्कृत्व चांगले होते. याची जाणीव कॅन्टीनमधील त्यांच्या वरिष्ठांना होती. एकदा पुण्याच्या वायुदलाच्या कॅन्टीनमधील काही अधिकाऱ्यानी दिलीप कुमार यांना "भारतातील स्वातंत्र्य चळवळ" यावर आपले विचार मांडायला सांगितले. दिलीप कुमार यांनी उर्दू प्रचूर हिंदीमध्ये छान विचार मांडले! त्यात त्यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा विस्तृत आढावा तर घेतलाच, शिवाय भारताला स्वातंत्र्य मिळणे किती गरजेचे आहे आहे हे देखील सांगितले. सर्व लष्करी अधिकाऱ्यांना त्यांचे भाषण खूप आवडले आणि सर्वांनी त्यांचे खूप कौतुक केले. परंतु दिलीपकुमार यांच्यासाठी हा आनंदाचा क्षण काही क्षणच टिकला. कारण काही तासातच ब्रिटिश पोलीस तिथे पोहोचले आणि त्यांनी दिलीपकुमार यांना चक्क हातकड्या ठोकल्या व स्थानबध्द केले!

ब्रिटिश राजवटीच्या विरुद्ध भाषण केल्याचा आरोप त्यांच्यावर लावण्यात आला. दिलीपकुमार यांना हे सर्व नवीनच होते! केले काय आणि झाले काय? काय घडत आहे हे त्यांना कळालेच नाही! पोलिसांनी बेड्या ठोकून त्यांना येरवडा जेलमध्ये आणले. 'ये और एक गांधीवाला है!..' असे म्हणत पोलिसांनी त्यांना जेलरच्या हवाली केले! आपला उल्लेख 'गांधीवाला' कां केला? हे त्यांना सुरुवातीला कळलेच नाही! त्यांच्यावरील आरोप बघून तुरुंगातील इतर सत्याग्रहीसोबत दिलीपकुमार यांना ठेवले. त्यावेळी ब्रिटीशांच्या विरुध्द महात्मा गांधी यांचा निर्वाणीचा मोठा लढा चालू होता! १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनाची सुरुवात होती. महात्मा गांधीनी आमरण उपोषण सुरु केले होते! या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी पुण्यातील

अनेक गांधीजींचे अनुयायी ब्रिटिशांच्या विरुध्द नारे देत आंदोलन करत होते. या सर्व सत्याग्रहींना येरवडा जेलमध्ये आणले जात होते. त्या रात्री या सर्व सत्याग्रहीनी 'अन्नत्याग' करून जेलमधील जेवणावर बहिष्कार टाकला!

ते पाहून दिलीप कुमार यांनी देखील "मी आज अन्न ग्रहण करणार नाही!.." असे सांगितले. याच येरवडा जेलमध्ये त्यावेळी सरदार वल्लभभाई पटेल हे देखील आहेत आणि त्यांनी देखील उपोषण चालू केले आहे असे त्यांना कळाले! अवघ्या विशीतील दिलीपकुमार यांना या सर्व प्रकाराने खूप आनंद वाटला. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात आपला छोटा का होईना पण वाटा आहे याचे समाधान वाटले. रात्री जेवण न केल्यामुळे दिलीपकुमार यांना अजिबात झोप लागली नाही पण इतर सत्याग्रही सोबत त्यांनी संवाद साधला आणि देश आता 'आजादी'च्या उंबरठ्यावर आहे याची सुखद जाणीव त्यांना झाली.

दुसऱ्या दिवशी सकाळी दिलीप कुमार काम करीत असलेल्या वायुदलाच्या कॅन्टीनमधील एक मेजर त्यांना सोडवण्यासाठी जेलमध्ये पोहोचले. त्यांनी दिलीपकुमार यांना जेल मधून बाहेर काढले. एक रात्र स्वातंत्र्य सैनिकांसोबत जेलमध्ये काढल्यामुळे दिलीप कुमार यांची लोकप्रियता एका रात्रीत वाढली. कॅन्टीनमध्ये गेल्यानंतर सर्वांनी घोळका करून दिलीप कुमार यांच्याशी संवाद साधला. अनपेक्षीतपणे एका रात्रीत दिलीप कुमार सर्वांचे हिरो बनले!

© धनंजय कुलकर्णी

लेख क्र. 9

दिग्दर्शक महेश भट आपल्याच कृत्याने का दु:खी झाले?

कधी कधी कळत-नकळतपणे हातून झालेली चूक आपल्याला आयुष्यभर सलत राहते. ही सल वेदनादायक तर असतेच पण त्याहून अधिक अपराधीपणाची भावना, मनाला गडद करणारी असते. दिग्दर्शक महेश भट यांच्या बाबतीतला हा किस्सा हीच भावना अधोरेखित करणारा होता. अशी कोणती चूक महेश भट्ट यांच्याकडून झाली होती की त्या चुकीचा सल त्यांना पुढे अनेक दिवस मनाला छळत राहिला?

१९७१ साली राज खोसला यांचा सुपरहिट 'मेरा गाव मेरा देश' हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. या सिनेमात अभिनेता विनोद खन्ना यांनी रंगवलेला खलनायक जब्बर सिंग जबरदस्त होता. (याच सिनेमाचा मोठा इम्पॅक्ट रमेश सिप्पी यांच्यावर 'शोले' चित्रपटाच्या वेळी होता असे म्हणतात!) 'मेरा गाव मेरा देश' या चित्रपटाचे दिग्दर्शक राज खोसला यांचे सहाय्यक म्हणून महेश भट्ट होते. या चित्रपटाच्या सेटवर महेश भट्ट आणि अभिनेता विनोद

खन्ना यांची चांगली मैत्री झाली. त्यावेळी दोघांचा तो उमेदीचा आणि संघर्षाचा कालखंड होता! काळ पुढे गेला! पुढच्या पाच-सात वर्षात विनोद खन्ना अभिनयाच्या क्षेत्रात सुपरस्टार पदापर्यंत जाऊन पोहोचले! सत्तरच्या दशकात सुरुवातीला महेश भट यांचे 'मंजिले और भी है', 'विश्वास घात' आणि 'नया दौर' हे त्यांनी दिग्दर्शित केलेले चित्रपट प्रदर्शित झाले. परंतु या चित्रपटाना व्यवसायिक यश अजिबात मिळाले नाही.

याच काळात महेश भट यांचे लग्न झाले. एक मुलगी देखील झाली. (पूजा भट्ट) घरातील खर्च वाढत गेले पण महेश भट यांचे आर्थिक उत्पन्न मात्र दिवसेंदिवस कमी होत गेले! फ्लॉपचा शिक्का माथ्यावर बसल्याने त्यांना चित्रपट मिळणे देखील कमी झाले. ही बातमी त्यांचे मित्र विनोद खन्ना यांना समजली. आपल्या जुन्या मित्राला महेश भट्टला मदत करायला पाहिजे या जाणिवेतून त्यांनी अनेक निर्मात्यांची संपर्क साधला. याच काळात त्यांची भेट निर्माता सिरू दरयानानी यांच्या सोबत झाली. ते एक चित्रपट विनोद खन्नाला घेऊन बनवणार होते. विनोद खन्ना देखील त्यांच्या चित्रपटात काम करण्यासाठी तयार झाले. फक्त त्यांनी त्यासाठी दोन अटी घातल्या. पहिली अट या चित्रपटाचे दिग्दर्शन महेश भट्ट करतील आणि दुसरी अट माझ्यामुळे महेश भट्ट यांना चित्रपट दिग्दर्शनासाठी मिळाला हे त्यांना अजिबात कळता कामा नये!

निर्मात्याने अर्थातच दोन्ही अटी मान्य केल्या आणि आणि चित्रपटाचे शूटिंग सुरू झाले. चित्रीकरणाच्या दरम्यान एका प्रसंगाच्या वेळी विनोद खन्ना आणि महेश भट्ट यांच्यात मतभेद झाले. (याच काळात विनोद खन्ना यांच्या आईचे निधन झाल्यामुळे ते थोडे डिस्टर्ब होते!) या मतभेदांमुळे दोघांमध्ये 'तू

तू मै मै' सुरू झाली. शेवटी दिग्दर्शक महेश भट्ट यांनी निर्मात्याला बोलावून विनोद खन्नाला चित्रपटातून काढून टाका अशी मागणी केली, नाहीतर मी सिनेमाचे दिग्दर्शन सोडतो अशी धमकीच दिली. निर्माते सिरू दरयानानी यांनी महेश भट यांना विनंती केली "भट साब, आप ऐसा मत किजीये! विनोद बहुत अच्छा कलाकार है.." परंतु महेश भट ऐकायला तयारच नव्हते. त्यांनी विनोद खन्नाला सिनेमातून काढून टाका हा हट्ट कायम ठेवला! शेवटी निर्माते सिरू दरयानानी यांना विनोद खन्नाने घातलेली दुसरी अट नाईलाजाने मोडावी लागली. आणि त्यांनी त्या सेटवरच महेश भट यांना सांगितले "भट साब, शायद आप ये बात नही जानते... आपको ये फिल्म सिर्फ विनोद खन्ना की सिफारिश पर मिली है और आप उनको ही फिल्म से निकल वाना चाहते है?.." हे ऐकताच महेश भट यांचे डोळे खाडकन उघडले. ते भानावर आले! मागच्या सात आठ वर्षातील अपयश, बेरोजगारी त्यांच्या डोळ्यापुढे आली. कुणालाही कळू न देता मित्र म्हणून विनोद खन्नाने केलेली मदत त्यांचे काळीज पाणी पाणी करून गेली! स्वत:च्या कृतघ्नपणाची त्याना लाज वाटली. ते विनोद खन्नाच्या गळ्यात पडले आणि गलबलून रडायला लागले. "अरे यार मुझसे बहुत बडी गलती हो गयी.." असे म्हणू लागले. विनोद खन्नाने त्यांचे सांत्वन केले पण महेश भट यांना ही गोष्ट कायम सलत राहीली. पुढे विनोद खन्नाला ओशोकडे नेण्याचे काम ही महेश भट यांनीच केले होते.

© धनंजय कुलकर्णी

लेख क्र. 10

असं काय घडलं की 'त्या' अभिनेत्रीने सिनेसृष्टीशी कायमचे नाते तोडून परदेशात जाणे पसंत केले?

साठच्या दशकातील एका अभिनेत्रीला अशा एका 'लाजिरवाण्या प्रसंगाचा' सामना करावा लागेल की त्यामुळे तिने फिल्म इंडस्ट्रीला रामराम ठोकला! काय घडलं होतं? तिच्या बाबतीत नेमकी अशी कोणती गोष्ट तिला सिनेमाच्या क्षेत्रातून बाहेर पडण्यासाठी मजबूर करणारी घडली? हा किस्सा जितका त्या अभिनेत्रीच्या बाबत झालेल्या अन्यायाचा आहे तितकाच अभिनेत्रीकडे 'कलावंत' म्हणून न पाहता एक स्त्री म्हणून, एक उपभोग्य वस्तू म्हणून पाहणे या पुरुषसत्ताक मानसिकतेतून घडलेल्या प्रमादाचा देखील आहे! आपल्या हिंदी सिनेमात नायिकेसोबतच सहनायिका, खलनायिका हा ट्रेंड

सुरुवातीपासूनच आहे. पन्नासच्या दशकात हेलन, कुक्कू या अभिनेत्री 'व्हॅम्प' म्हणून सिनेमाच्या दुनियेत आल्या. त्या उत्तम नर्तिका होत्या! त्या काळात कॅबरे डान्सची लाट आली होती. काहीशा खलनायकी टाईपच्या भूमिका असलेला प्रकार, त्या काळात कमालीचा लोकप्रिय होत होता. खलनायकाच्या सोबत असलेली मदालसा असा या भूमिकेचा आवाका असायचा! हेलन असल्या भूमिकात माहीर होती. पुढे बिंदू, अरुणा इराणी, पद्मा खन्ना, कल्पना अय्यर अनेक नायिका व्हॅम्प म्हणून पडद्यावर आल्या. अर्थात यातील काहींनी पुढे मेन स्ट्रीम मध्ये येवून नायिकेच्या भूमिका देखील केल्या!

साठच्या दशकाच्या मध्यावर फरियाल नावाची एक अभिनेत्री हिंदी सिनेमामध्ये आली! तिचा पहिला चित्रपट होता! १९६५ साली आलेला 'जिंदगी और मौत'! यात तिचा नायक अभिनेता प्रदीप कुमार होता! संगीतकार सी. रामचंद्र यांचे अप्रतिम संगीत या चित्रपटाला लाभले होते! 'दिल लगाकर हम न समझे जिंदगी क्या चीज है इश्क कहते है किसे आशिकी क्या चीज है..' ही अप्रतिम गझल या चित्रपटात होती. आणि ती फरियालवर चित्रीत झाली होती! पण सिनेमा फ्लॉप ठरला! नंतर ती 'बिरादरी' या चित्रपटात शशि कपूरची नायिका बनली. त्याकाळात सात्विक सोज्वळ चेहऱ्याच्या अनेक नायिका रुपेरी पडद्यावर असल्याने, फरीयाल सारखी काहीशा तिखट सौंदर्याची युवती नायिका म्हणून यश मिळवू शकली नाही! त्यामुळे तिने सिनेमात व्हॅम्पच्या भूमिका स्वीकारायला सुरुवात केली1 नवकेतनच्या १९६७ सालच्या 'ज्वेल थीफ' मधील एक हॉट कॅबरे तिला करायला मिळाला. या डान्सनंबर नंतर तिच्याकडे अशाच प्रकारच्या भूमिकांची रांग लागली! खरंतर 'जॉनी मेरा नाम' या चित्रपटातील कॅब्रे देखील तिलाच मिळणार होता असे तिने एका

मुलाखतीत सांगितलं होतं! तिचे अनेक कॅब्रे डान्स सिनेमा दिसू लागल हळूहळू या क्षेत्रात तिचे नाव व्हायला लागले. याच काळात १९६८ साली दिग्दर्शक रवी नागाईच यांनी 'द गोल्ड मेडल' या सिनेमाची घोषणा केली! ही एक 'स्पाय मूवी' होती. यात फरीयालला भूमिका मिळाली. तिच्यावर एक डान्स नंबर देखील या सिनेमात चित्रित झाला होता. या सिनेमात जितेंद्र, प्रेमनाथ, राखी यांच्या देखील भूमिका होत्या!

या सिनेमाचे चित्रीकरण चालू असताना एक शॉट मध्ये प्रेमनाथ फरियालवर जबरदस्ती करतो असा प्रसंग होता. तिला बाहुपाशात घेऊन एका सोफासेटवर तिच्यावर जबरदस्ती करतो असा तो शॉट होता. प्रेमनाथ रंगेल गडी होता. ('जॉनी मेरा नाम' या चित्रपटातील 'हुस्न के लाखो रंग..' या कॅब्रे मधील पद्मा खन्ना सोबतचा त्याचा जबरा अभिनय रसिकाना आठवत असेलच!) 'गोल्ड मेडल' या चित्रपटातील हा शॉट चित्रित होत असताना अभिनेता प्रेमनाथ त्याच्या भावनांवर आवर घालू शकला नाही आणि आणि अभिनेत्री फरियालला बाहुपाशात घेऊन तो सोडायला तयारच होईना. सोफासेटवरून तो तिला घेऊन खाली कार्पेट वर आला आणि तिच्याशी बाहुपाशात घेऊन लगट करू लागला. फरीयाल कमालीची घाबरली. कारण शॉट सांगताना दिग्दर्शकाने असे काहीच सांगितले नव्हते. प्रेमनाथची बळजबरी चालूच होती. सेटवरील आंबट शौकीन लोक त्या दृश्याची मजा घेत होते. शेवटी तिने प्रेमनाथच्या तावडीतून कशी बशी सुटका करून दिग्दर्शकाकडे पहात ती म्हणाली "क्या कोई कट बोलेगा?

दिग्दर्शक रवि नागाइच, तो भानावर आला! आणि त्याने 'कट' म्हटले! सेटवरच फरियाल रडायला लागली! प्रेमनाथचा चित्रिकरणाच्या वेळचा अविर्भाव आणि Attitude तिला अस्वस्थ करून गेला! सेटवरून तडक ती घरी गेली आणि तिने निर्णय घेऊन टाकला की यापुढे मी सिनेमात काम करणार नाही! दिग्दर्शकाने तिला समजावून सांगितले. प्रेमनाथनेदेखील तिची माफी मागितली पण फरियाल आपल्या भूमिकेवर कायम राहीली. 'गोल्ड मेडल' सिनेमातील राहिलेलं थोडसं शूटिंग पूर्ण करून ही सिनेसृष्टीला बाय बाय करून कायमची परदेशात निघून गेली! हा 'द गोल्ड मेडल' सिनेमा पुढे खूप रखडला. आणि १९८४ साली कसाबसा पूर्ण होवून रिलीज झाला आणि फ्लॉप झाला! आज फरीयाल 'इजराइल' या देशात मायानगरी पासून कोसो दूर आपल्या कुटुंबासोबत राहत आहे!

© धनंजय कुलकर्णी

♥

लेख क्र. 11

जेंव्हा अमिताभ बच्चन स्क्रीन टेस्ट मध्ये फेल ठरले!

मागच्या शतकातील महानायक बिग बी अमिताभ बच्चन यांनी हिंदी सिनेमाला मोठ्या उंचीवर नेऊन ठेवले. पण तुम्हाला माहित आहे का याच अमिताभ बच्चन यांना हिंदी सिनेमात प्रवेश करताना फार मोठा संघर्ष करावा लागला होता. कलकत्त्याला नोकरी करत असताना बिग बी मुंबईमध्ये अभिनयाच्या क्षेत्रांमध्ये मुशाफिरी करण्यासाठी आले होते. तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी आणि बच्चन परिवार यांचे चांगले घरगुती संबंध होते. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी अमिताभ बच्चन यांना एक पत्र देऊन मुंबईला पाठवले. हे पत्र अमिताभ बच्चन यांनी अभिनेता मनोज कुमार यांना दिले. मनोज कुमार आणि पंतप्रधान यांच्यात देखील चांगले संबंध होते. त्यावेळी मनोज कुमार मोहन सैगल यांच्या 'साजन' चित्रपटाचे चित्रीकरण करत होते. रूपतारा स्टुडिओ येथे या सिनेमाचे चित्रीकरण चालू होते. मनोजकुमार यांनी दिग्दर्शक मोहन सैगल यांना अमिताभची स्क्रीन-टेस्ट घेण्याची विनंती केली. मोहन सैगल यांनी त्यांचे

सहाय्यक ग्रोवर यांना अमिताभ बच्चन यांची स्क्रीन टेस्ट घेण्याचे विनंती केली. त्या वेळी मोहन सैगल यांचे ते सहाय्यक होते.

दुसऱ्या दिवशी अमिताभ बच्चन आल्यानंतर त्यांना एक डायलॉग ग्रोवर यांनी दिला. हा डायलॉग कुठल्याही सिनेमातला नव्हता. ग्रोवर यांनी त्यांच्या प्रेयसीला लिहिलेले ते एक पत्र होते. हा डायलॉग असा होता.. "निम्मो, जब भी मै तुम्हे देखता हूँ, सब कुछ भूल जाता है. क्या हुआ, कैसे हुआ, कुछ समझ नही आता! नजारा पूनम के चांद का हो या संगेमरमर के ताज महल का..! खुदा जानता है तुमसे बढकर और कोई नजारा है ही नही...!" अमिताभ बच्चन यांनी अतिशय धीर गंभीर आणि भावस्पर्शी स्वरात आणि चेहऱ्यावर रोमँटिक भाव दाखवत स्क्रीन टेस्ट दिली. त्यानंतर या संवादाची रेकॉर्डिंग टेप मोहन सैगल यांच्याकडे पाठवण्यात आली. मोहन सैगल यांनी ते फुटेज पाहिल्यानंतर नाराजी व्यक्त करत "या मुलाने माझा वेळ आणि फिल्म वाया घातली घातली आहे" असे म्हणत अमिताभला स्क्रीन-टेस्ट मध्ये रिजेक्ट केले!

अमिताभ बच्चन निराश होऊन पुन्हा दिल्लीला रवाना झाले. मनोजकुमार यांनी त्यांना 'यादगार' चित्रपटात एक छोटी भूमिका देवू केली पण अमिताभचे मन उडाले होते. कारण याच काळात अमिताभ बच्चन ऑल इंडिया रेडिओवर देखील असेच रिजेक्ट झाले होते. त्यांचा आवाज तिथल्या अधिकाऱ्यांना अजिबात आवडला नाही. संकट आली की समूहाने येतात असं म्हणतात! किमान पक्षी रेडीओवरील जाहिरातीत तरी आपला आवाज यावा असे अमिताभला वाटत होते. त्या आवाजाची टेस्ट साठी ते अमीन सायानी यांच्या ऑफिसमध्ये गेले होते. टेस्ट दिली होती पण अमीन सायानी

यांच्याकडून नकळतपणे त्यांच्याकडे दुर्लक्ष केले! सगळीकडून नकारघंटा आल्यामुळे अमिताभ बच्चन नाराज होऊन दिल्लीला निघून गेले.

याच वर्षी दिग्दर्शक ख्वाजा अहमद अब्बास त्यांच्या 'सात हिंदुस्तानी' या सिनेमाची जुळवाजुळव करत होते. यातील एक भूमिका टिनू आनंद यांना मिळाली होती. आनंद यांनीच अमिताभ बच्चन यांचे एक छायाचित्र दिग्दर्शक के. अब्बास यांना दिले होते. अब्बास यांना प्रथम दर्शिनी अमिताभ यांचा चेहरा तेवढा काही आवडला नव्हता. या चित्रपटाच्या निर्मितीच्या वेळी टिनू आनंद यांना ख्यातनाम दिग्दर्शक सत्यजित रे यांच्या सोबत काम करण्याची संधी मिळाली. (पुढे पाच वर्षे ते रे यांच्या सोबत ते सहायक दिग्दर्शक होते.) त्यामुळे त्यांनी 'सात हिंदुस्तानी' मधील भूमिका सोडून कलकत्त्याला प्रयाण केले. आता त्यांच्या भूमिकेसाठी कुणाला घ्यावे हा पेच के. ए. अब्बास यांना पडला. त्यांच्याकडे अमिताभचे एक छायाचित्र टिनू आनंद यांनी दिले होते, ते आठवले. त्यांनी अमिताभला बोलावले. त्याचे नाव विचारले. बच्चन नाव म्हटल्यावर लगेच हरीवंशराय यांच्या बाबत विचारले. अमिताभने ते आपले वडील असल्याचे सांगितल्यावर लगेच अब्बास यांनी विचारले "सिनेमात काम करायला त्यांनी परवानगी दिलीय का?" अमिताभने होकारार्थी मान डोलावल्यावर देखील त्यांचे समाधान झाले नाही. त्यांनी त्याला दोन दिवसांनी भेटायला यायला सांगितले. या दरम्यान त्यांनी हरिवंशराय बच्चन याना टेलिग्राम करून खात्री करून घेतली आंनी मगच आपल्या चित्रपटात भूमिका दिली!

© धनंजय कुलकर्णी

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

♥

अमिताभ बच्चन की पहली फिल्म
SAAT HINDUSTANI

♥

लेख क्र. 12

जेंव्हा एक दिग्दर्शक गोळ्या झाडून आपल्या कुटुंबियाना एका क्षणात संपवून स्वत: आत्महत्या करतो... कां?

माया नगरी मधील झगमगाटात काही जीव अक्षरश: दबून जातात. इथल्या 'चकाचौंध रोशनी' मध्ये त्यांचे दु:ख, अपयश, अवमान कधीच कुणाला दिसत नाही. आणि मग याच दु:खातून, नैराश्यातून काहीजण टोकाचा निर्णय घेतात. अपयशाच्यानंतर आलेल्या यशाच्या काळात माणूस अपयशाच्या आठवणी 'एन्जॉय' करतो. आपला संघर्ष सार्थकी लागला याचे समाधान असते! पण हीच बाब उलट झाली तर ? यशानंतर आलेलं अपयश जास्त कडवट असतं. जास्त क्लेशकारक असतं! या अपयशाने भले भले कोसळतात. दिग्दर्शक ब्रिज यांनी अशाच एका कसोटीच्या क्षणी स्वत:ला आणि स्वत:च्या कुटुंबाला बंदुकीतून गोळ्या घालून पूर्णपणे संपवून टाकले.

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

२१ ऑक्टोबर १९९० हा बॉलिवुडच्या इतिहासातील हा एक काळा दिवस होता. काय होता हा किस्सा? अशी कोणती गोष्ट घडली की ज्याने दिग्दर्शक 'ब्रिज' यांना असे टोकाचे पाऊल उचलून आपल्या स्वत:च्या कुटुंबाचा सर्वनाश करुन घेतला?

दिग्दर्शक ब्रिजमोहन सदानाह साठच्या दशकामध्ये बॉलिवूडमध्ये आले. 'सस्पेन्स थ्रिलर' या जॉनर सोबत त्यांनी साठ आणि सत्तरच्या दशकात अनेक उत्तम आणि यशस्वी चित्रपट दिले. त्यांचा हिट ठरलेला पहिला चित्रपट होता १९६३ साली प्रदर्शित झालेला 'उस्तादो के उस्ताद' यात रफीचे 'सौ बार जनम लेंगे सौ बार फना होंगे..' हे अप्रतिम गाणे होते! यानंतर 'ये रात फिर ना आयेगी', 'नाईट इन लंडन', 'यकीन', 'दो भाई' असे सिनेमे दिले! सत्तरच्या दशकाच्या सुरुवातीला त्यांनी एक बंपर हिट सिनेमा दिला. हा सिनेमा होता 'व्हिक्टोरिया नंबर 203'! या चित्रपटात नवीन निश्चल-सायरा बानो यांच्या प्रमुख भूमिका असल्या तरी प्राण आणि अशोक कुमार यांनी धमाल केली होती. 'दो बेचारे बिना सहारे देखो पूछ पूछ कर हारे..' हे गाणे या चित्रपटात होते. या चित्रपटानंतर 'चोरी मेरा काम', 'प्रोफेसर प्यारेलाल' हे यशस्वी चित्रपट ब्रीज यांनी दिग्दर्शित केले होते! ब्रिज यांनी साठच्या दशकातील अभिनेत्री 'सईदा खान' (किशोर कुमार सोबतच्या 'अपना हाथ जगन्नाथ' फेम)) तिच्यासोबत लग्न केले होते नम्रता आणि कमल ही दोन अपत्ये झाली!

ऐंशीच्या दशकात देखील त्यांच्या नावाचा दबदबा कायम होता. पण बॉम्बे 405 मील, उंचे लोग, मगरूर हे त्यांचे सिनेमे बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरले. आर्थिक विवंचना वाढू लागल्या! ऐषारामात जगण्याची सवय झाल्यामुळे आता पदोपदी पैशाचा प्रश्न निर्माण होऊ लागला! त्याचबरोबर

सिनेमाच्या दुनियेत फ्लॉप चा शिक्का कपाळी घेऊन 'अपमानीत' जगणं आणखी कठीण होवू लागलं! याच काळात कुटुंबात वादविवादाला सुरुवात झाली. सर्व व्यवस्थित चालू असताना अपयशाचा फेरा त्यांच्या वाट्याला आला. ब्रिज हे अतिशय शीघ्रकोपी होते. बायकोसोबत त्यांचे वारंवार खटके उडत होते. बेकारी आणि अपयशाने कुटुंबातील बेबनाव वाढतच गेला!

२१ ऑक्टोबर १९९० या दिवशी त्यांच्या मुलाचा कमल सदानाहचा वाढदिवस होता. कमल विसाव्या वर्षात पदार्पण करत होता! सहाजिकच मित्रांसोबत पार्टी करून तो घरी आला. घरी देखील पार्टीची तयारी केली होती. वाढदिवसाचा केक आणून ठेवला होता. बंगल्यामध्ये वाढदिवस तयारी चालू होती. मित्रांसमवेत कमल मध्यरात्री घरी परतला. सर्वत्र उत्साहाचे वातावरण असताना नियती मात्र काही वेगळाच विचार करत होती. अचानक त्यांना बंदुकीच्या गोळी चालवण्याचा आवाज आला. कमल धावत धावत वडिलांच्या रूमकडे गेला. वडिलांनी त्याच्या आईवर सईदा खानवर आणि बहीण नम्रता वर गोळ्या झाडल्या होत्या आणि त्या दोघी रक्ताच्या थारोळ्यात पडल्या होत्या. ब्रिज यांनी कमलच्या दिशेने देखील एक गोळी झाडली. पण तो वाकल्यामुळे त्याच्या मानेला चाटून ती गोळी गेली. मित्रांनी लगेच पोलिसांना फोन केला आणि कमलला दवाखान्यात ऍडमिट केले. इकडे तोवर ब्रिज यांनी स्वतःवर गोळ्या झाडून आत्महत्या केली. आपल्या वाढदिवसाच्या दिवशीच कमलला आपल्या कुटुंबाचा असा दुर्दैवी अंत पहावा लागला. ब्रिज यांनी असा पराकोटीचा निर्णय का घेतला यावर त्या काळात मिडियात चर्चा चालू होती. ब्रिज यांची मुलगी नम्रता हिने ज्या मुलाशी लग्न ठरवले होते ते स्थळ ब्रिज यांना पसंत नव्हते. त्यातून रोज वाद होत होते. सततच्या अपयशाने ते नैराश्यग्रस्त

झाले होते. कर्जाचा डोंगर वाढत होता. या सर्वातून मुक्तता केवळ मृत्युनेच होऊ शकते हा साक्षात्कार कदाचित ब्रिज यांना झाला असावा! आपल्या नंतर कुटुंबाची वाताहात होवू नये म्हणूनच त्यांनी आपल्या कुटुंबियांवर गोळीबार केला व स्वत: देखील आत्महत्या केली! कमल सदानाह छोट्याशा ऑपरेशननतर बरा झाला. काळ कुणासाठी थांबत नाही. दोन वर्षानंतर कमल सदानाहने काजोल सोबत 'बेखुदी' या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये आगमन केले. पहिल्याच सिनेमाने त्याची चॉकलेट बॉय ही इमेज तयार झाली. पण या इमेजवर तो फार काळ गाजवू शकला नाही. रंग, बाली उमर को सलाम, हम सब चोर है, अंगारा या सिनेमातून तो दर्शन देत होता पण यापैकी एकाही सिनेमाने तिकीटबारीवर तग धरला नाही! नव्वदच्या दशकाच्या अखेरीस एक फ्लॉप स्टार म्हणून अडगळीत पडला. २००७ साली त्याने आपल्या वडिलांच्या 'व्हिक्टोरिया नंबर 203' या चित्रपटाचा त्याच नावाने रिमेक बनवला. पण त्याला देखील फारसा प्रतिसाद मिळाला नाही! कमल कधीच त्याचा वाढदिवस साजरा करीत नाही, कारण २१ ऑक्टोबर १९९० चा दिवस तो आयुष्यभर विसरणार नाही!

© धनंजय कुलकर्णी

लेख क्र. 13

या सिनेमाचा फक्त क्लायमॅक्स शोमन सुभाष घई यांनी का शूट केला?

माणूस किती जरी मोठा झाला, किती जरी उंचीवर पोचला तरी त्याने पायरीचा दगड विसरू नये असं म्हणतात. कारण याच 'स्टेपिंग स्टोन' वरून त्याचा उंचीचा प्रवास सुरू झालेला असतो. समाजात आणि सिनेमाच्या दुनियेत दोन्ही प्रकारची माणसं तुम्हाला पाहायला मिळतील. काहींच्याकडे कृतज्ञतेची भावना असते तर काही जण कमालीचे कृतघ्न देखील असतात! दिग्दर्शक सुभाष घई यांनी मात्र आपल्या संघर्षाच्या काळात साथ दिलेल्या मित्र मंडळीना कधीच विसरले नाहीत. त्यांच्याबाबत ते कायमच कृतज्ञ राहिले! त्याचाच हा किस्सा! सुभाष घई.. हिंदी सिनेमाच्या दुनियेत साठच्या दशकाच्या उत्तरार्धात आले. एफ टी आय पुण्यातून त्यांनी आपला अभ्यासक्रम पूर्ण केला. राजेश खन्नाच्या 'आराधना' चित्रपटात त्यांनी एक छोटी भूमिका मिळाली होती. पुढे काही चित्रपटातून ते सहनायक (उमंग , दो बच्चे दस हाथ, धमकी) म्हणून देखील सिनेमात आले व यशस्वी होऊ शकले नाहीत!

नंतर त्यांनी कथा लेखन सुरू केले. अनेक निर्मात्यांना ते आपल्या कथा ऐकवू लागले. एकदा एन एन सिप्पी यांना त्यांनी एक कथा ऐकवली. सिप्पी

यांना कथा खूपच आवडली आणि त्यांनी त्या कथेवर चित्रपट बनवायचे ठरवले. त्यावेळी सुभाष घई यांनी घाबरत घाबरतच सिप्पीना या चित्रपटाचे दिग्दर्शन करू देण्याची परवानगी मागितली. सिप्पी यांनी सुभाष घई यांना हा चित्रपट दिग्दर्शित करण्याची परवानगी दिली. सुभाष घई यांच्या आयुष्याला नवी दिशा देणारी ही घटना होती. हा चित्रपट होता १९७६ साली प्रदर्शित झालेला 'कालीचरण'! सिनेमा बम्पर हिट ठरला. या चित्रपटातील शत्रुघ्न सिन्हा, रीना रॉय, प्रेमनाथ, अजित यांच्यासोबतच नाव झाले सुभाष घई यांचे! यातील LION आणि NO17 हा अफलातून प्रकार प्रेक्षकांना सर्वस्वी नवीन होता. देशभर सिनेमा प्रचंड हिट झाला! आता सुभाष घई यांच्याकडे प्रेक्षक आणि चित्रपट सृष्टी आशेने बघू लागली. त्यानंतर विश्वनाथ, गौतम गोविंदा, कर्ज, हिरो, विधाता, मेरी जंग अशा हिट चित्रपटांची मालिकाच सुभाष घई यांनी साकारली. नव्वदच्या दशकात तर त्यांना 'शोमन' ही उपाधी मिळाली. ऐंशीच्या दशकाच्या अखेरीस एन एन सिप्पी यांचे चिरंजीव प्रवेश सिप्पी यांनी एक चित्रपट बनवायला सुरुवात केली होती. या सिनेमाचे नाव होते, 'आग से खेलेंगे'! जितेंद्र, अनिल कपूर, मीनाक्षी शेषाद्री, किमी काटकर यांच्या या चित्रपटात प्रमुख भूमिका होत्या. या चित्रपटाचे दिग्दर्शन भास्कर शेट्टी यांना देण्यात आले होते. हा सिनेमा निर्मिती अवस्थेत जास्त काळ राहिला. या चित्रपटाच्या दरम्यान अनिल कपूरचे 'तेजाब' आणि 'राम लखन' हे चित्रपट प्रदर्शित झाले आणि सुपरहिट ठरले! त्याचा भाव वधारला. त्यामुळे सहाजिकच त्याचे 'आग से खेलेंगे' या चित्रपटाकडे दुर्लक्ष लागले! चित्रपटाच्या शूटिंगला यायचे तो टाळू लागला! याचे आणखी एक कारण होते. कारण या चित्रपटात मुख्य भूमिकेत जितेंद्र होते तर अनिल कपूर यांना सहनायकाची भूमिका ऑफर

झाली होती. आता मार्केटमध्ये अनिल कपूरचा भाव वधारला होता. त्याला अशी सेकंड लीडची भूमिका नको वाटत होती. या चित्रपटाचा क्लायमॅक्स शूट होणे बाकी होते. याच काळात आणखी एक घटना घडली. या चित्रपटाचे दिग्दर्शक भास्कर शेट्टी यांचे दुर्दैवाने अपघाती निधन झाले झाले! अनिल कपूरचे चित्रपटाकडे होणारे दुर्लक्ष आणि दिग्दर्शकाचा मृत्यू यामुळे सिप्पी चांगलेच अडचणीत आले. सिनेमात खूप पैसा अडकला होता आणि सिनेमा अर्धवट राहतो की काय ही काळजी त्याना वाटू लागली. त्यावेळी त्यांना आठवण झाली सुभाष घई यांची! त्यांनी सुभाष घई यांना फोन करून आपली अडचण सांगितली. सुभाष घई यांना दिग्दर्शक म्हणून पहिला ब्रेक देणारे सिप्पी स्वतःहून फोन करून अडचण सांगतात हे पाहून घई यांनी त्यांना सर्वतोपरी मदत करण्याचे ठरवले. त्यांनी अनिल कपूर यांची 'समजूत' काढली. त्याला शूटिंगसाठी तयार केले! (अनिलच्या 'मेरी जंग' आणि 'राम लखन' या सिनेमाचे दिग्दर्शक घई होते!) चित्रपटाची उरलेले शूट तसेच क्लायमॅक्स सुभाष घई यांनी शूट केला. दुसऱ्याचा अर्धवट सिनेमा शूट करायला ते खरं तर अजिबात बांधील नव्हते, पण त्यांनी एन एन सिप्पी यांनी करीयरच्या सुरुवातीला आपल्यावर केलेल्या उपकाराची जाणीव ठेवली. सिनेमा पूर्ण झाला आणि १५ सप्टेंबर १९८९ या दिवशी रिलीज झाला. सिनेमा निर्मिती बराच काळ झाल्यामुळे सिनेमाला अपेक्षित यश मिळू शकले नाही. पण सिप्पी यांच्यावर आलेले आर्थिक संकट काही प्रमाणात नक्की कमी झाले ते केवळ सुभाष घई यांच्यामुळे!

© धनंजय कुलकर्णी

लेख क्र. १४

नव्वदच्या दशकात या 'अभिनेत्री' च्या टॉपलेस फोटो ने देशात उडाली होती मोठी खळबळ!

नव्वदच्या दशकात एका अभिनेत्रीने टॉपलेस फोटो शूट करून मोठी खळबळ उडवून दिली होती. हा टॉपलेस फोटो एका सिने मॅक्झिनच्या कव्हरवर झळकला. आणि देशभर व्हायरल झाला. (लक्षात घ्या तो काळ मोबाईलच्या आगमनापूर्वीचा होता.) त्या दिवशी देशभर त्या फोटोने प्रचंड मोठी खळबळ उडवून दिली. पंधरा रुपये किमतीच्या या मॅगझीनला त्यादिवशी चक्क शंभर रुपये भाव आला होता. म्हणजेच या फोटोमुळे हे मॅगझीन त्या दिवशी तब्बल सहा ते सातपट ब्लॅक मध्ये विकले गेले! या टॉपलेस फोटोचा पुढे या अभिनेत्रीला कितपत फायदा झाला हा संशोधनाचा विषय आहे पण त्याकाळी

या अभिनेत्रीने मोठे सेन्सेशन निर्माण केले होते हे नक्की! हा किस्सा आहे वीस-बावीस वर्षापूर्वीचा! १९९३ सालचा!

स्टारडस्ट या मॅगझीनला काही तरी वेगळी आणि खळबळ उडवून देणारी स्टोरी करायची होती. विदेशातील मॅगझीनच्या कव्हर पेजवर अभिनेत्रींचे जसे टॉपलेस फोटो असतात तसा टॉपलेस फोटो आपल्या बॉलीवूड अभिनेत्रीचा हवा होता. या मॅगझिनचे फोटोग्राफर जयेश सेठ यांनी त्याकाळातील आघाडीच्या अभिनेत्रीकडे माधुरी दीक्षित, जुही चावला जेंव्हा हा प्रस्ताव ठेवला तेंव्हा त्यांनी या प्रकाराला साफ नकार दिला. त्यानंतर कुणी 'न्यू कमर एक्ट्रेस' असे फोटोशूट करेल का याची चाचपणी करण्यात आली. यातूनच अभिनेत्री ममता कुलकर्णी हिला विचारणा करण्यात आली.. ममता कुलकर्णी १९९३ सालच्या 'तिरंगा' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये आली होती. सुरुवातीला सैफ अली खान, अक्षय कुमार, सुनील शेट्टी यांच्यासोबत तिला भूमिका मिळत होत्या पण तिला टॉपची अभिनेत्री व्हायची घाई लागली होती. टॉपच्या अभिनेत्यांसोबत (सलमान खान, आमिर खान, संजय दत्त) तिला हिंदी सिनेमाचा स्क्रीन शेअर करायचा होता. सुरूवातीला तिने देखील असल्या फोटो शूटला नाहीच म्हटले पण मॅगझीनकडून तिचे व्यवस्थित 'काउन्सिलिंग' करण्यात आले. परदेशातल्या अभिनेत्री डेमी मूर चा दाखला दिला गेला. या फोटोमुळे तुझ्या करिअरला चांगले दिवस येतील असे सांगितले गेले!

१९९३ हे वर्ष भारतासाठी मोठं उलाढालीचे वर्ष होते. मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारून दोनच वर्ष झाली होती. जग एक मोठी बाजारपेठ बनत होते. आता प्रत्येक गोष्टीला एक सेलेबल कॉस्ट आली होती. परदेशातील टीव्ही वाहिन्या भारतात दिसू लागल्या होत्या. 'एम टीव्ही'च्या

माध्यमातून भारतीयांची 'नजर' तयार होवू लागली होती! हे सर्व विस्ताराने सांगायचे कारण या संक्रमणावस्थेत भारतीय मिडिया देखील 'बोल्ड' होत चालला होता. पारंपरिक विचारांना छेद मिळत होता. या टप्प्यावर हे टॉपलेस शूट प्रकरण आले! ममताला काहीतरी 'सेन्सेशनल' करून प्रेक्षकांपुढे यायचे होतेच आणि तशी आयती संधी तिला 'स्टारडस्ट'च्या माध्यमातून आली होती. ममता सुरुवातीला या फोटोशूटबद्दल साशंक होती पण छायाचित्रकार जयेश शेठ यांनी तिला हा फोटो अजिबात अश्लील न वाटता तिचे सौंदर्य आणखी खुलविणारा असेल असे सांगितले. हो नाही हो नाही करत करत शेवटी ममताने फोटोशूट केले. फक्त जीन्स पॅन्ट आणि वर अनावृत्त अशा अविर्भावात तिचा फोटो तयार झाला. तिने आपल्या सेक्रेटरीला तसेच आपल्या पालकांना या असल्या फोटो-शूटची काहीही कल्पना दिली नाही. सप्टेंबर १९९३ च्या अंकात कव्हर-पेज वर तिचा टॉपलेस फोटो झळकला आणि एकच खळबळ उडाली. देशभरातल्या बुक स्टॉलवर लोकांची प्रचंड गर्दी झाली आली आणि पंधरा रुपये किमतीचा स्टारडस्ट त्या दिवशी चक्क सहा-सात पट किमतीत म्हणजे शंभर रुपयाला विकला गेला. सर्व अंक दिवसभरात संपून गेले! त्या दिवशी दिवसभर ममताच्या टॉपलेस फोटोची चर्चा चालू होती. परदेशातील मिडीयाने देखील ममताच्या टॉपलेस फोटो ची दखल घेतली! इकडे भारतात मात्र तिचे निर्माते या फोटोबाबत नाराजी व्यक्त करू लागले. कोरियोग्राफर सरोजखान देखील ममताच्या या फोटो शूटवर नाराज होवून "तू तुझ्या करीयरची वाट लावत आहेस!.." असे सांगितले. (त्यावेळी वातावरण किती सोवळे होते बघा!!) सिने निर्माते ममताच्या येणाऱ्या चित्रपटाना प्रेक्षक कसा प्रतिसाद देतात याची काळजी वाटू लागली कारण देशभर ममताच्या विरुद्ध निदर्शने सुरू झाले.

अश्लील फोटो सेशन केल्याबद्दल तिच्यावर देशभर खटले दाखल होवू लागले. तिच्या घरच्यांनी देखील या फोटो बाबत नाराजी व्यक्त केली. ममता देखील नर्व्हस झाली. ठरवले काय होते आणि झाले काय असं तिला वाटलं!

पण काही दिवसांनी चमत्कार घडला. दिग्दर्शक रिक्कू राकेश नाथ यांनी एकदा ममता कुलकर्णीला माधुरी दीक्षितच्या 'दिल तेरा आशिक' च्या प्रीमियरला बोलावले. नैराश्यात असलेली ममता घाबरतच प्रीमियरला पोचली. आणि मागच्या रांगेत जावून बसली. पण राकेश नाथ यांनी तिला स्टेजवर बोलावले. त्यावेळी तिथे उपस्थित असलेल्या युवावर्गाने एकच जल्लोष केला. तिच्या दिशेने गुलाबाची फुले फेकून "ममता वुई लव यु, ममता वुई लव यु!" असे नारे द्यायला सुरुवात केली. ममताला हे सर्व नवीन होते. कालपर्यंत नैराश्यात असलेली ममता एकदम मूड मध्ये आली. बऱ्याचदा आपण चुकीचाच विचार करून दु:खी होत असतो. प्रत्यक्षात वेगळेच घडणार असते! त्या बोल्ड फोटोशूटमुळे देशातील तरुण वर्गात ती भयंकर फेमस झाली होती. आजच्या भाषेत सांगायचे तर ती तरुणाईची 'क्रश' बनली होती! दुसऱ्या दिवशीपासून तिने आपला एटीट्यूड बदलला आणि नव्या जोमाने ती कामाला लागली. या तिच्या बोल्ड अदेने तिला सिनेमे मिळाले पण करीयर घडवू शकली नाही! २०१६ साली तर तिचे नाव अंमली पदार्थाच्या तस्करीत आले! मध्यंतरी कुंभमेळ्यात जावून तिने हलचल निर्माण केली होती!

© धनंजय कुलकर्णी

♥

लेख क्र. 15



जेंव्हा बिग बी यांनी पन्नासच्या दशकातील सुपरस्टारला असहाय अवस्थेत बसस्टॉप वर पाहिले!

कोणत्याही कलाकाराला रुपेरी पडद्यावर मिळालेले यश हे काही चिरंतन असत नाही. यश आणि अपयशाचा हा उन सावलीचा खेळ अनेक कलावंतांचे वाट्याला येतो. सतत लाईमलाईटच्या प्रकाशात उजळून जाणारे रुपेरी आयुष्य क्षणार्धात अंधाराच्या गर्तेत फेकले जाते आणि मग सुरु होतो जीवन संघर्ष. कैफी आजमी यांनी 'कागज के फूल' या चित्रपटात एक फार सुंदर गाणं लिहिलं आहे. 'वक्त ने किया क्या हसी सितम, तुम रहे ना तुम हम रहे ना हम' त्या सिनेमाच्या संदर्भात हे प्रेमाचं गाणं जरी असलं तरी व्यावहारिक

जीवनात १००% लागू पडते! यशाची हुलकावणी कलावंताला खूप वेदनादायी असते. यशाच्या, प्रसिद्धीच्या लाटेवर स्वार असणाऱ्याला पुन्हा संघर्षाचे क्षण वाट्याला आल्यावर होणारी जीवाची तगमग भयंकर असते! 'उगवत्या सूर्याला नमस्कार!' करण्याची रीत असलेल्या समाजात हे कलाकार मग क्षणार्धात आपली ओळख हरवून बसतात. जिथे लाखोंचा चाहता वर्ग असायचा तिथे आता चिटपाखरूही फिरकत नाही ही खंत मनाला पोखरणारी असते. पण आयुष्य जगावेच लागते. ते कुणासाठी कधी थांबते? पन्नासच्या दशकातील लोकप्रिय कलावंत भारत भूषण यांना याच यशापयशाच्या खेळाच्या कटू अनुभवाला सामोरे जावे लागले. याबाबत असा एक किस्सा अमिताभ बच्चन यांनी त्यांच्या ब्लॉग मध्ये लिहिला आहे! पन्नासच्या दशकात भारत भूषण यांची गणना टॉपच्या अभिनेत्यांत होत होती. बैजू बावरा, मिर्झा गालिब, बसंत बहार, फागुन, गेट वे ऑफ इंडिया या आणि अशा यशस्वी सिनेमाचे ते नायक होते. त्यांच्या चित्रपटाना तुफान यश मिळत होते. त्यांचा 'बरसात की रात' हा साठ सालचा सिनेमा प्रचंड गाजला. त्या काळातील आघाडीच्या नायिका नर्गीस, मीना कुमारी, मधुबाला, माला सिन्हा यांच्या सोबत भारत भूषण नायक म्हणून चमकत होते. अनेक दिग्गज दिग्दर्शकांसोबत त्यांनी काम केले.

साठच्या दशकात त्यांनी नंतर चित्रपट निर्मितीमध्ये लक्ष घातले. 'दूज का चांद' हा एक चित्रपट बनवला. यात राजकुमार, अशोक कुमार, भारत भूषण, बी सरोजा देवी यांच्या भूमिका होत्या. नितीन बोस हे बुजुर्ग दिग्दर्शक लाभले होते. लाखो रुपये खर्चून बनवलेला या चित्रपटाला अजिबात व्यवसायात यश मिळाले नाही. कर्जाचा डोंगर उभा राहिला आणि इथूनच भूषण यांच्या

अधोगतीला सुरुवात झाली. साठच्या दशकाच्या अखेरीस त्यांनी चरित्र अभिनेत्याची भूमिका करायला सुरुवात केली. सत्तरच्या दशकात त्यांनी अनेक लहान सहान चित्रपटातून भूमिका केल्या. पण नंतर त्यावर देखील मर्यादा येऊ लागली. ऐंशीच्या दशकात तर त्यांना डेली पेड आर्टिस्ट म्हणून कामे मिळू लागली. डेली पॅड आर्टिस्ट या कॅटेगिरीत ते केव्हा गेले याचे त्यांनाच कळले नाही. यशाची मोठी इनिंग खेळलेला हा कलाकार आता छोट्या भूमिकेसाठी तरसू लागला. पण भारत भूषण यांची कामावरची श्रद्धा अजिबात कमी आली नाही. स्टारडम गेला. वैभव गेले. बंगला गेला. (त्यांचा पुण्यातही युनिव्हर्सिटी रोडवर शानदार बंगला होता.) एकेकाळी दहा दहा गाड्यांचा ताफा असलेला हा कलाकार खऱ्या अर्थाने बे-कार झाला. मुंबईत अनेकदा ते पब्लिक ट्रान्सपोर्टच्या बस मधून प्रवास करीत. याच काळातील एक आठवण अमिताभ बच्चन यांनी त्यांच्या ब्लॉगमध्ये लिहिली आहे. एकदा अमिताभ बच्चन त्यांच्या कारमधून सांताक्रुज भागातून एका स्टुडिओमध्ये चालले होते. सकाळची वेळ होती. रस्त्यावर भरपूर रहदारी होती. बसेस पूर्ण गर्दीने वाहत होत्या. अमिताभ बच्चन यांचे लक्ष सहज एका बस स्टॉपवर गेले. आणि त्यांना हादराच बसला. कारण त्या बसस्टॉपवर पन्नासच्या दशकातील एक सुपरस्टार भारत भूषण सामान्य नागरिकाप्रमाणे बसची वाट पहात उभे होते. या स्टॉप अनेक लोक होते. पण कुणालाही कल्पना नव्हती की गोल्डन इरा मधील एक कलाकार ज्याच्यावर 'तू गंगा की मौज मै जमुना का धारा', 'दो घडी वो जो पास आ बैठे हम जमानेसे दूर जा बैठे', 'तेरी आंख के आंसू पी जाऊ ऐसी मेरी तकदीर कहां', 'इक परदेसी मेरा दिल ले गया', 'फिर वही शाम वही गम वही तन्हाई है' ही अप्रतिम गाणी चित्रित झाली आहेत!

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

अमिताभ बच्चन यांच्या काळजात चर्र झाले. भारत भूषण यांचा वैभवाचा काळ त्यांच्या डोळ्यापुढे आला. 'खून पसीना', 'शराबी', 'याराना', 'नास्तिक' हे सिनेमे दोघांनी एकत्र केले होते. त्यांनी ड्रायव्हरला गाडी साईडला घ्यायला सांगितली. एका क्षणी त्यांना वाटलं की भारत भूषण यांना गाडीत घ्यावे, त्यांची विचारपूस करावी, त्यांना गंतव्य स्थानावर सोडावे. पण नंतर लगेच त्यांनी असा विचार केला की आपल्या या कृतीने भारत भूषण यांच्या स्वाभिमानाला धक्का पोहोचेल. त्यांना आता बस-स्टॉप वरून कुणी ओळखत नाही पण त्यांना जर आपण तिथून गाडीत घेतले तर त्यांना खूप लाजिरवाण्यासारखे वाटेल. त्यांचं अपयश, त्यांची गरीबी, त्यांना आणखी प्रकर्षाने जाणवू लागेल! त्यांना या क्षणी, या पद्धतीने दुखावणे योग्य नाही असा 'समंजस' विचार करून जड मनाने अमिताभ बच्चन भारत भूषण यांना आपल्या गाडीत न घेता निघून गेले! पण ते दृश्य त्यांचा पिच्छा सोडायला तयार नव्हते. त्यांनी ब्लॉग मध्ये याबाबत असे लिहिले की "असा प्रसंग कुणावर ही येऊ शकतो. यशाच्या शिखरावर प्रेक्षक तुम्हाला घेवून जातात आणि तिथून तुम्हाला ते उतरवू देखील शकतात. त्यामुळे प्रत्येकाने मानसिकरित्या अशा कठीण प्रसंगी खंबीर राहण्याची तयारी ठेवली पाहिजे. Nothing is permanent in the life! हेच अंतिम सत्य आहे!" भारत भूषण यांनी या कटू काळाला देखील स्वीकारले आणि कलेप्रति असलेली आपली श्रद्धा कायम ठेवून ते शेवटपर्यंत काम करीत राहिले.

© धनंजय कुलकर्णी

♥

लेख क्र. 16



एका चाहत्याच्या अतिप्रेमाने हेमा मालिनीच्या वडलांना गमवावे लागले प्राण!

कलाकारांना त्यांच्या चाहत्यांकडून मिळालेलं प्रेम हवेच असते. फॅन फॉलोअर्स त्यांच्यासाठी 'उर्जा केंद्र' असते, टॉनिक असते! पण कधीकधी चाहत्यांकडून प्रेमाचा अतिरेक होतो आणि त्यातून भयंकर अशा घटना घडतात. अभिनेत्री हेमा मालिनी यांना याबाबत आलेला हा अनुभव खूप काही सांगून जाणारा आहे. हा अनुभव त्यांच्यासाठी इतका कटू होता की त्यातून हेमा मालिनीला आपल्या जवळच्या व्यक्तीला कायमचे गमवावे लागेल! काय होता हा किस्सा?

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

राज कपूर सोबत १९६८ साली महेश कौल दिग्दर्शित 'सपनोंका सौदागर' या चित्रपटातून हेमामालिनीने रुपेरी पडद्यावर पदार्पण केले. ड्रीमगर्ल अशी तिची मीडियाने ओळख करून दिली. खरोखरच हेमा मालिनीने हिंदी सिनेमाचा रुपेरी पडदा आणखी देखणा करून टाकला. लोभस रूप, सुंदर भाव मुद्रा, टप्पोरे डोळे, नृत्य निपुणता आणि घायाळ करणारे सौंदर्य! त्या काळातील प्रत्येक हिरोला आपली हीरोइन हेमा मालिनी असावी असे वाटायचे. जॉनी मेरा नाम, सीता और गीता, नया जमाना या चित्रपटातून हेमा रसिकांना अभिनयाच्या माध्यमातून आपलंसं करत होती. या काळातील तिचा फॅन फॉलोईंग प्रचंड होता. असंख्य रसिक दिवाने हेमाचे दर्शन घडावे म्हणून तिच्या स्टुडिओ भोवती, बंगल्याभोवती कायम जमा झाले दिसायचे. हेमाने संपूर्ण हिंदुस्थानात आपल्या सौंदर्याने एक जादू निर्माण केली.

हा किस्सा साधारणतः १९७८ सालचा आहे. त्या काळी हेमामालिनी लोकप्रियतेच्या शिखरावर होती. तिच्या चाहत्यांमध्ये भारताप्रमाणेच इतर देशातील खूप दिवाने होते. तिचा एक चाहता तिला एकदा भेटण्यासाठी भारतात आला होता. हा तिचा डायहार्ड फॅन होता. हा चाहता रोज हेमामालिनीच्या बंगल्या भोवती घुटमळत असायचा. एकदा तरी हेमा मालिनी आपल्याला दिसेल या आशेने तो तिथे कायम असायचा. तिथल्या सिक्युरिटीने त्याला बऱ्याचदा हटकले पण हा कम्प्लीट नादखुळा होता. रोज सकाळी हेमा तिच्या कार मधून त्याच्या डोळ्यासमोरून निघून जायची पण कारच्या काळ्या ग्लासमुळे हेमामालिनी त्याला दिसत नव्हती. हा चाहता रोज तळमळायचा. एकदा त्याने तिच्या कारच्या जवळ जाण्याचा प्रयत्न केला पण सिक्युरिटीने

त्याला पकडून चांगलाच चोप दिला. त्यामुळे चिडून त्याने 'आज रात्री काही करून तिच्या बंगल्यात शिरण्याचा' निर्णय घेतला!

रात्री बंगल्यातील सर्व दिवे मालवल्यानंतर मध्यरात्री हा चाहता कंपाऊंड वॉलवरून उडी मारून हेमामालिनीच्या बंगल्याच्या आवारात शिरला. हेमामालिनीची बेडरूम वरच्या मजल्यावर असेल असे समजून तो वरच्या मजल्यावर गेला. पण ती बेडरूम हेमामालिनीची नव्हती तर तिच्या भावाची होती. तिच्या भावाच्या छोट्या मुलाला घरातील मोलकरीण झोपवत होती. तिला बंगल्याच्या आवारात काहीतरी हालचाल जाणवली. तिने पटकन लाईट लावले. पाहिले तर व्हरांड्यात तिला हा चाहता दिसला. या मोलकरणीने आरडाओरडा करून सर्व नोकरांना उठवले. नोकरांनी झडप मारून त्या व्यक्तीला पकडले. हा चाहता ओरडून ओरडून सांगत होता "मी चोर नाही मला फक्त हेमामालिनीला भेटायचे आहे!" परंतु नोकरांनी त्याला चोप द्यायला सुरुवात केली. मग या व्यक्तीने तिथे टेबलवर पडलेला एक चाकू हातात घेऊन तो पुन्हा पुन्हा जोरात सांगू लागला "मी चोर नाही मला फक्त एकदा भेटु द्या. मी निघून जातो!" नोकरांनी त्याला बदडणे चालू ठेवले!

या सर्व गोंधळाने हेमामालिनीचे वडील (व्ही एस आर चक्रवर्ती) यांना जाग आली. नोकरांनी एका व्यक्तीला पकडले असून त्या व्यक्तीच्या हातात चाकू आहे हे पाहून ते प्रचंड घाबरून गेले. ते थरथर कापू लागले. आणि पोलिसांना फोन करण्यासाठी ते फोनकडे जाऊ लागले. आधीच अर्धवट झोपेत त्यात प्रचंड भीती आणि बीपी शुगरचा त्रास असल्यामुळे ते फोन जवळ जाण्या आधीच त्यांना हार्ट अटॅक आला आणि तेथेच कोसळले. ताबडतोब त्यांना हॉस्पिटलमध्ये हलवले आणि त्या चाहत्याला पोलिसांच्या हवाली केले. हेमा

मालिनीच्या वडिलांनी मोठा धसका घेतला होता आणि त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली! तिकडे पोलिसांनी त्या चाहत्याला काही फटके देऊन सोडून दिले कारण त्याने तसा काहीच गुन्हा केला नव्हता!

पण या सर्व प्रकाराची शिक्षा कुटुंबाला झाली. हेमा मालिनीच्या पित्याला प्राण गमवावे लागले!

© धनंजय कुलकर्णी

♥

लेख क्र. 17

जेंव्हा जया भादुरी एकाच सिनेमातील दोन अभिनेत्रींसाठी डबिंग करते!

सत्तर आणि ऐंशीच्या दशकातील व्यावसायिक हिंदी सिनेमात बऱ्याचदा अतार्किक, न पटणाऱ्या अशा गोष्टींचा बोलबाला असायचा. काहीतरी चमत्कारीक, अवैज्ञानिक आणि केवळ प्रेक्षकांच्या मनोरंजना-साठी नसते उपद्व्याप करण्याची चढाओढच धंदेवाईक, मसाला सिनेमात लागलेली होती. यामुळे हिंदी सिनेमा पहायचा तर डोके बाजूला ठेवून पहा असं म्हणण्याची पद्धत सुरु झाली. मनोरंजनाच्या नावाखाली काहीच्या काही खपवण्याची जणू स्पर्धाच लागली होती. पण अशा ही वातावरणात काही अभिनव प्रयोग केल्याचे लक्षात येते. हे चित्रपट व्यावसायिक दृष्ट्या जरी चालले नसले तरी त्यांच्यातील या प्रयोगाचं कौतुक करायला हवे. कौतुक यासाठी कुणीतरी मिनिंग फुल एक्सपेरिमेंट केला असेल तर त्याची दखल घ्यायला हवी.

आज तांत्रिक दृष्टीने सिनेमा बहरला आहे पण ही परिस्थिती तीस चाळीस वर्षापूर्वी नव्हती. त्यामुळे लॉजिकल थिंकिंग करून त्याचा वापर सिनेमात झाला याची दखल घ्यायला हवी. १९८२ साली रमेश बहल यांनी 'ये वादा रहा' हा चित्रपट बनविला होता. या चित्रपटाचे दिग्दर्शन रमेश बहल यांचे सहाय्यक कपिल कपूर यांनी केले होते. हा सिनेमा डॅनियल स्टील्स यांच्या 'द प्रॉमिस' या कादंबरीवर आधारित होता. याच कथानकावरील याच नावाचा एक अमेरिकन चित्रपट १९७९ साली प्रदर्शित झाला होता. 'ये वादा रहा' या सिनेमाचे कथानकातील ट्विस्ट भारतीय सिनेमा प्रेक्षकांसाठी नवीन होता! यातील नायिका एका मोठ्या अपघातात जायबंदी होते. तिचा चेहरा जखमांनी भरून जातो. नंतर तिच्यावर प्लास्टिक सर्जरी केली जाते. प्लास्टिक सर्जरी केल्यानंतर तिच्या चेहऱ्यात आमूलाग्र बदल होतो. त्यामुळे या सिनेमात अपघातानंतरची नायिका बदलली गेली! या सिनेमाचा नायक ऋषी कपूर असतो. त्याचे प्रेम पूनम धिल्लनवर असते. पुनम एका अपघातात जखमी होते. प्लास्टिक सर्जन (शम्मी कपूर) तिच्यावर शस्त्रक्रिया करतात. तिचे प्राण तर वाचतातच पण तिच्या चेहऱ्याला नवे रंग रुप मिळते. चित्रपटात अपघातानंतर मेक ओव्हर झालेली अभिनेत्री रंगवली आहे टीना मुनीमने! त्यामुळे रुपेरी पडद्यावर एकाच चित्रपटात एकच कॅरेक्टर दोन विभिन्न अभिनेत्रींनी साकार केले. चित्रपट तयार झाला त्याचा प्रीव्ह्यू देखील झाला. त्यावेळी एक गोष्ट खटकली. प्लास्टिक सर्जरी नंतर चेहऱ्यामध्ये बदल होतो ही गोष्ट प्रेक्षकांच्या पचनी पडू शकते परंतु त्या कॅरेक्टरचा आवाज कसा काय बदलतो? हा प्रश्न प्रेक्षक विचारू शकतात. कारण अभिनेत्री पूनम धिल्लन आणि टीना मुनीम यांची संवादाची शैली आणि आवाज 'टोटली डिफरंट' होता. मुद्दा बरोबर होता! इथे लॉजिकली विचार

करण्यात आला. यावर उपाय काय? याची चर्चा सुरू झाली. आणि त्यातून एक सोलुशन असे निघाले ती चित्रपटात पूनम धिल्लन आणि टीना मुनीम या दोघींसाठी एक तिसरी अभिनेत्री डबिंग करेल! म्हणजे चित्रपटात दोन्ही अभिनेत्रींचा आवाज सारखाच राहील. तिसऱ्या अभिनेत्रीचा शोध सुरू झाला. बहल आणि बच्चन परिवाराचे चांगले संबंध होते. त्यांनी जया भादुरीला याबाबात विचारले. जयाने आनंदाने हे काम स्वीकारले आणि या चित्रपटातील दोन्ही अभिनेत्रींना तिने स्वतःचा आवाज दिला. म्हणजेच तिच्या आवाजात डबिंग करण्यात आले. हा प्रकार भारतीय सिनेमासाठी सर्वस्वी नवीन होता! अर्थात एवढे सायास करूनही ह्या चित्रपटाला फारसे यश मिळाले नाही. परंतु आर. डी. बर्मन यांनी संगीतबद्ध केलेली गाणी आणि अलीकडच्या रिमिक्सच्या काळात प्रचंड गाजली. यातील 'तू तू है वही दिल ने जिसे अपना कहा..' हे टायटल सॉंग तर प्रचंड गाजले. त्याचप्रमाणे 'इश्क मेरा बंदगी है..' हे गाणे देखील खुप गाजले. जया भादुरीने त्यानंतर (स्मिता पाटीलच्या अकाली निधनानंतर) 'वारीस' या चित्रपटातील स्मिता पाटील करिता डबिंग केले. 'ये वादा रहा' हा सिनेमा यु- ट्यूब वर उपलब्ध आहे!

© धनंजय कुलकर्णी

♥

लेख क्र. 18

तब्बल दोन महिन्याच्या अथक परिश्रमातून बनले हे अजरामर प्रार्थना गीत!

कलावंताची प्रतिभा कधी रुसेल आणि कधी जागृत होईल याचा काही नेम नसतो. त्यामुळे बऱ्याचदा एखादी कलाकृती साकार होण्यासाठी काही क्षणांपासून कित्येक वर्षांचा कालावधी लागू शकतो. गीतकार अभिलाष यांना एका गाण्यासाठी असेच तरसावे लागले! तब्बल दीड ते दोन महिना रोज एकाच सिच्युएशन वरील गाणे लिहीत होते. पण त्यांना हवे तसे शब्द सापडत नव्हते. अखेर दोन महिन्याच्या प्रदीर्घ तपश्चर्येनंतर त्यांच्या मनासारखे गाणे तयार झाले. आज चाळीस पंचेचाळीस वर्षांनंतर देखील हे गाणे भारतातील अनेक शाळांमधून महाविद्यालमधून प्रार्थना गीत म्हणून गाजत आहे! कोणते होते हे गीत ? काय होता हा किस्सा?

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

हा किस्सा सांगण्यापूर्वी गीतकार अभिलाष यांच्याबाबत थोडीशी माहिती घेणे गरजेचे आहे. अत्यंत प्रतिभावान पण कमनशीबी गीतकार असे त्यांचे वर्णन करावे लागेल. गीतकार अभिलाष यांचे खरे नाव ओम प्रकाश होते. १३ मार्च १९४६ चा जन्म! दिल्लीचे रहिवासी! वयाच्या बाराव्या तेराव्या वर्षापासूनच त्यांनी काव्यलेखन, गजललेखनाचा प्रारंभ केला गीतकार साहिर लुधियानवी यांच्या काव्याचा त्यांच्यावर खूप प्रभाव होता! एकदा दिल्लीत एका मुशायरा मध्ये त्यांनी साहीर साहेबांना आपल्या कवितांची वही दाखवली. साहीर यांनी त्यांच्या या शायरीचे कौतुक केले आणि त्यांना आणखी मेहनत करण्याचा आणि भरपूर वाचन करण्याचा सल्ला दिला. गीतकार अभिलाष यांनी मग उर्दू हिंदी साहित्य वाचायचा सपाटाच लावला. साहीर यांनी त्यांना सल्ला दिला होता "जादा पढो.. कम लिखो" त्याप्रमाणे त्याने सर्व साहित्य बारकाईने वाचायला सुरुवात केली.

काही वर्षानंतर ते मुंबईला आले. साहीर यांची त्यांनी भेट घेतली. काही निर्मात्यांची ओळख करून दिली. पण मुंबईचा संघर्ष मोठा होता. तो प्रत्येकाच्या वाट्याला येतो तसा त्यांच्या वाट्याला आला. साहीर यांनी सांगितले "माझ्यामुळे तुम्हाला पहिले काम नक्की मिळेल पण नंतर मात्र तुमच्या कर्तुत्वाने तुम्हाला पुढे जावे लागेल..." मुंबईत त्यांनी गीत लेखनासाठी 'अभिलाष' हे नाव घेतले. गीतकार अभिलाष यांना पहिला ब्रेक के. महावीर यांनी दिला. ही गाणी लता मंगेशकर यांनी गायली होती. सलील चौधरी यांच्यासोबत काम केले. १९७५ साली 'रफ्तार' या चित्रपटातील त्यांच्या गाण्यांनी प्रचंड लोकप्रियता मिळाली. हे गाणे होते 'संसार है एक नदिया सुख

दुख दो किनारे है.' गाणे गाजले पण चित्रपट फारसा न चालल्यामुळे अभिलाष यांचा संघर्ष चालूच राहिला.

१९८४ साली त्यांना एन. चंद्रा यांनी 'अंकुश' या चित्रपटातील गाणी लिहिण्यासाठी बोलावले. त्यांचा हा पहिलाच चित्रपट होता. तसेच नाना पाटेकर यांचा देखील हा पहिलाच चित्रपट होता! यातील बाकी गाणी लिहिली फक्त एक प्रार्थना गीत राहिले होते! एन चंद्रा यांनी सिच्युएशन सांगितली. या गाण्याने मात्र अभिलाष यांना खूप तरसवले. ते जंग जंग पछाडले. रोज तीन-चार गाणी लिहून म्युझिक-रूम मध्ये जात असत. तेथे नाना पाटेकर, संगीतकार कुलवंत सिंग तसेच दिग्दर्शक एन चंद्रा उपस्थित असायचे. त्यांना काही केल्या अभिलाष यांनी लिहून आणलेले गाणे पसंत पडत नव्हते. जवळ जवळपास दीड-दोनशे गाणे लिहिल्यानंतर आणि दीड-दोन महिना उलटल्यानंतर शेवटी गीतकार अभिलाष कंटाळले. आणि हात जोडून त्यांना विनंती केली "कृपया आपण हे प्रार्थना गीत दुसऱ्या कोणाकडून तरी लिहून घ्या, हे माझ्याकडून आता जमणार नाही! शिवाय आता माझा आत्मविश्वासदेखील कमी होत चालला आहे". असे म्हणून ते उदास मनाने स्टुडीओ बाहेर पडले. ते स्वत: वरच चिडले होते. कां साजेसे शब्द सुचत नाहीत? कां जमत नाही?

संगीतकार कुलवंत सिंग त्यांच्या पाठोपाठ बाहेर आले. त्यांनी गाडीत अभिलाष यांना सांगितले "अरे यार अभिलाष, तुम अपना विश्वास क्यू खो रहे हो? तुम्हारी काबिलीयत को मै जानता हूं. बहुत अच्छी है. तुम्हारी शब्दो में 'शक्ती' है. 'मन' मे दुबारा 'विश्वास' पैदा करो और गीत लिखो" अभिलाष संगीतकार कुलवंतचे एक एक शब्द ऐकत होते. त्याच वेळेला त्यांनी गाडी थांबवायला सांगितली. खिशातून डायरी काढली. आत्ता संगीतकाराने

सांगितलेल्या शब्दातूनच त्यांना प्रार्थना गीताच्या ओळी सुचल्या! "इतनी शक्ती हमे दे न दाता मन का विश्वास कमजोर हो ना...!" त्यांनी लगेच त्या ओळी कुलवंत सिंगला सांगितल्या. कुलवंतला खूपच आवडल्या! त्यांनी गाडी वळवुन परत म्युझिकरूम कडे नेली. एन चंद्रा आणि नाना पाटेकर ही मंडळी तिथे बसली होती त्यांनाही या ओळी आवडल्या. सर्वांनी अभिलाष चे कौतुक केले. "हेच तर आपल्याला हवे होते!" असे म्हणत लवकर गाणे पूर्ण करायला सांगितले. त्या रात्रीच अभिलाश ते संपूर्ण गाणे लिहून काढले. दीड-दोन महिन्या पासून चाललेली तळमळ, संघर्ष अखेर संपला. प्रतिभा पुन्हा जागृत झाली. 'अंकुश' चित्रपटातील हे प्रार्थना गीत पुष्पा पागधरे , सुषमा श्रेष्ठ , मुरलीधर रोडे यांनी गायले. प्रार्थना गीत म्हणून भारतातील अनेक शाळा, कॉलेज मधून हे गीत आजही मोठ्या भक्ती भावाने गायले जाते. २७ सप्टेंबर २००० या दिवशी अभिलाष यांचे निधन झाले!

© धनंजय कुलकर्णी

♥

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

लेख क्र. 19

सलग आठ वर्षे फिल्मफेयर पुरस्काराने कुणाला हुलकावणी दिली?

हिंदी सिनेमाच्या दुनियेत ज्याला 'मिस्टर परफेक्शनिस्ट' म्हणून ओळखले जाते त्या आमिर खान यांनी आजवर अनेक पुरस्कारांवर आपली मोहर उमटवली आहे. पण गंमत म्हणजे फिल्मफेअर पुरस्कार, 'ज्याला आपण भारताचे ऑस्कर म्हणतो' त्या फिल्मफेअरच्या सर्वोत्कृष्ट अभिनेता या पुरस्काराने मात्र आमिर खान एक-दोन नाही ही तर चक्क आठ वर्ष सलग हुलकावणी दिली होती! (तेंव्हा पासून आमिरचा पुरस्कार सोहळ्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला आणि तो या सोहळ्याला गैरहजर राहू लागला.) नवव्या वर्षी मात्र त्याला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला. त्या

आधीची सलग आठ वर्षे त्याला सर्वोत्कृष्ट अभिनयाचे केवळ नामांकन मिळत होते. त्यामुळे आमीर खान खूपच वैतागला होता. सलग आठ वर्ष या पुरस्कारासाठी त्याला वाट पाहावी लागली!

याची सुरुवात १९८८ सालच्या ३४ फिल्मफेअर पुरस्काराच्या वेळी झाली. त्यावर्षी सर्वोत्कृष्ट अभिननेत्याच्या पुरस्कारासाठी तिघांना नामांकन मिळाले होते. यात 'शहेनशहा' या चित्रपटासाठी अमिताभ बच्चन यांना, 'तेजाब' या चित्रपटासाठी अनिल कपूर यांना आणि 'कयामत से कयामत तक' या चित्रपटासाठी आमिर खान यांना हे नामांकन मिळाले. पण पुरस्कार मात्र अनिल कपूरला 'तेजाब' करिता मिळाला. यावर्षी आमीर खानला पदार्पणाचा पुरस्कार मात्र मिळाला होता! १९८९ सालच्या फिल्मफेअर सोहळ्यात सर्वोत्कृष्ट अभिनेत्यासाठी 'राख' चित्रपटासाठी आमिर खान, 'ईश्वर' चित्रपटासाठी अनिल कपूर, 'परिंदा' या चित्रपटासाठी जॅकी श्रॉफ, 'चांदनी' या चित्रपटासाठी ऋषी कपूर आणि 'मैने प्यार किया' या चित्रपटासाठी सलमान खान यांना नामांकन मिळाले होते या वर्षीचा सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मात्र जॅकी श्रॉफ यांना त्यांच्या 'परिंदा' या चित्रपटातील भूमिकेसाठी मिळाला. १९९० सालच्या फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यामध्ये सर्वोत्कृष्ट अभिनयासाठी नामांकन मिळालेले कलाकार पुढील होते, आमिर खान 'दिल' चित्रपटासाठी, अमिताभ बच्चन 'अग्निपथ' या चित्रपटासाठी, चिरंजीवी 'प्रतिबंध' या चित्रपटासाठी, सनी देओल यांना 'घायल' या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनयाचे नामांकन मिळाले होते! या वर्षीचा पुरस्कार देखील आमिर खानला हुलकावणी देत सनी देवल यांना त्यांच्या 'घायल' या चित्रपटातील भूमिकेसाठी मिळाला! १९९१ सालच्या फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्या मध्ये

अमिताभ बच्चन यांना 'हम' चित्रपटासाठी, अनिल कपूर यांना 'लम्हे' चित्रपटासाठी, दिलीप कुमार यांना 'सौदागर' या चित्रपटासाठी, संजय दत्त यांना 'साजन' या चित्रपटासाठी तर आमिर खानला 'दिल है के मानता नही' या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याच्या पुरस्कारासाठी नामांकन मिळाले. यावर्षीची फाईट खरोखरच खूप तगडी होती आणि ही फाईट जिंकली अमिताभ बच्चन यांनी त्यांच्या 'हम' या चित्रपटातील भूमिकेने!

१९९२ सालच्या फिल्मफेअर पुरस्कारांच्या सोहळ्यात सर्वोत्कृष्ट अभिनयासाठी, अमिताभ बच्चन 'खुदा गवाह' या सिनेमासाठी, अनिल कपूर 'बेटा' या चित्रपटासाठी, आमिर खान 'जो जीता वही सिकंदर' या चित्रपटासाठी नामांकित झालेले दिसतात! पण पुरस्कार पुन्हा एकदा आमिर खान यांना खो घालत अनिल कपूर यांना त्यांच्या 'बेटा' चित्रपटातील भूमिकेसाठी मिळाला! १९९३ सालच्या फिल्म पुरस्कार सोहळ्यामध्ये आमिर खान यांना 'हम है राही प्यार के' या चित्रपटासाठी, गोविंदा यांना 'आंखे' या सिनेमासाठी, जॅकी श्रॉफ यांना 'गर्दिश' या चित्रपटासाठी, शाहरुख खानला 'बाजीगर' या चित्रपटासाठी, तर संजय दत्त यांना 'खलनायक' या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनयाचे नामांकन मिळाले होते! पण हा पुरस्कार पटकावला शाहरुख खान यांनी 'बाजीगर' या चित्रपटासाठी! १९९४ साली ४० व्या फिल्मफेअर पुरस्कार प्रदान समारंभात सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचे नामांकन आमिर खान यांना 'अंदाज अपना अपना' या चित्रपटासाठी, अक्षय कुमार यांना 'ये दिल्लगी' या चित्रपटासाठी, अनिल कपूर यांना '१९४२ ए लव स्टोरी' या सिनेमासाठी, नाना पाटेकर यांना 'क्रांतिवीर' या सिनेमासाठी तर शाहरुख खान यांना 'कभी हां कभी ना' या चित्रपटासाठी मिळाले होते. पण पुरस्कार

पटकावला नाना पाटेकर यांनी 'क्रांतिवीर' या चित्रपटातील भूमिकेसाठी! म्हणजे आमिर खानला या वर्षी देखील पुरस्कारापासून वंचित राहावे लागले!

१९९५च्या ४१ व्या फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यामध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचे नामांकन होते आमिर खान यांना 'रंगीला' या चित्रपटासाठी, अजय देवगन यांना 'नाजायज' या चित्रपटासाठी, गोविंदा यांना 'कुली नंबर १' या चित्रपटासाठी, सलमान खान यांना 'करण अर्जुन' या चित्रपटासाठी तर शाहरुख खान यांना 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे' या सिनेमासाठी! या वर्षीचा सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार शाहरुख खान यांना 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे' या चित्रपटासाठी मिळविला! या वर्षी 'रंगीला' करीता आपल्याला नक्की पुरस्कार मिळेल असे आमिरला वाटत होते. त्यातील त्याने साकारलेली टप्पोरी मुन्नाची भूमिका त्याच्यासाठी खास होती. इथे देखील त्याला पुरस्कारापासून वंचित राहावे लागले. याचे त्याला खूप वाईट वाटले. आणि त्याचा पुरस्काराकडे बघण्याचा दृष्टीकोनच बदलला. हे सर्व पुरस्कार म्हणजे 'जुगाड' असतो असे त्याचे मत बनले!

सलग आठ वर्ष सर्वोत्कृष्ट अभिनेता या पुरस्कारापासून वंचित राहिलेल्या आमिर खान यांना १९९६ साली झालेल्या ४२ व्या फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यामध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला! त्यावेळी नामांकन मिळालेले कलाकार होते नाना पाटेकर यांना 'अग्निसाक्षी' या चित्रपटासाठी! सनी देओल यांना 'घातक' या चित्रपटासाठी तर आमिर खान यांना 'राजा हिंदुस्तानी' या चित्रपटासाठी! सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार आमिर खान यांनी 'राजा हिंदुस्तानी' या चित्रपटासाठी मिळविला आणि सलग आठ वर्षे हुलकावणी देणाऱ्या या पुरस्काराला अखेर आमिरने जिंकले!

© धनंजय कुलकर्णी

♥

♥

लेख क्र. 20

चार चौघात अमिताभ बच्चन यांच्या श्रीमुखात कोणी थप्पड लगावली ?

भारतीय सिनेमाचे महानायक बिग बी अमिताभ बच्चन यांच्या अभिनय कारकिर्दीकडे आणि एकूणच त्यांच्या व्यक्तिमत्वाकडे संपूर्ण जगभरात मोठ्या आदराने आणि कौतुकाने पाहिले जाते. संपूर्ण दुनियेतील चित्रपट शौकिनांमध्ये हे त्यांच्या सिनेमाबद्दल मोठे कुतूहल असते. अनेक पुरस्कारांनी ते सन्मानित झाले आहेत. सोशल मीडियावर त्यांचा या वयातील वावर देखील कौतुकास्पद आहे. त्यांच्या ब्लॉगचे करोडो फॉलोअर आहेत. या ब्लॉग मधून कधीकधी अतिशय मनोरंजक अशी माहिती देखील त्यांच्या चाहत्यांना वाचायला मिळते. अशा या 'हायली रिस्पेक्ट' असलेल्या व्यक्तीला देखील एकेकाळी कुणाकडून तरी चक्क श्रीमुखात खायला मिळाली होती! ही थप्पड रुपेरी पडद्यावरची नव्हती, तर प्रत्यक्ष चार चौघात त्यांना हा प्रसाद मिळाला होता!

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

कुणी केली होती हिम्मत अमिताभ बच्चन यांना थप्पड मारण्याची? काय होता हा किस्सा?

हा किस्सा आहे सत्तरच्या दशकातील. त्यावेळी अमिताभ बच्चन सुलतान अहमद यांच्या 'गंगा की सौगंध' या चित्रपटाचे चित्रीकरण हरिद्वारला करत होते. या चित्रपटात त्यांच्यासोबत रेखा, अमजद खान, प्राण, जीवन आणि सुलोचना यांच्या भूमिका होत्या. या चित्रपटाचे बरेचसे चित्रीकरण हरिद्वार आणि त्याच्या सभोवती असलेल्या लक्ष्मण झूला या परिसरात झाले आहे. एकदा चित्रीकरण संपल्यानंतर याच लक्ष्मण झूला वरून अमिताभ बच्चन आपल्या हॉटेलकडे चालले होते. त्यावेळी त्यांच्या कार भोवती माकडांनी गराडा घातला. या माकडांना तिकडे 'लंगूर' असे म्हणतात. पांढरेशुभ्र तोंड आणि ब्राऊनिश कलर असलेल्या या लंगूर ची शेपटी भली मोठी असते आणि त्यांच्यात ताकद देखील खूप जास्त असते. अमिताभ बच्चन यांच्या कारमध्ये काही केळी होत्या. त्याकडे पाहून त्या लंगूरांनी गोंधळ झालेला सुरुवात केली. त्यांना ती केळी खायची होती. अमिताभ बच्चन यांनी आपली कार बाजूला घेऊन ते खाली उतरले. एका छोट्या लंगूरला त्यांनी आपल्या हाताने केळी खाऊ घालायला सुरुवात केली. हा सगळा प्रकार पाहून आणखी काही लंगूर देखील तिथे गोळा झाले. त्यांना देखील अमिताभ केळी खाऊ घालले. समोरून एक लंगूर रागाने त्यांच्याकडे येत होता. अमिताभ बच्चन यांचे त्याच्याकडे अजिबात लक्ष नव्हते. कदाचित तो या लंगूरांचा 'सिनियर' असावा. अमिताभचे त्याच्याकडे अजिबात लक्ष नव्हते. अमिताभ त्या छोट्या लंगूराना केळी खिलवण्यात मशगुल होते. त्या 'सिनियर' लंगूर ला आपल्याकडे अमिताभ बच्चन दुर्लक्ष करीत आहेत हे अजिबात आवडले नाही.

त्याचा 'इगो' कदाचित दुखावला आणि त्याने सरळ समोर येऊन अमिताभ बच्चन यांच्या श्रीमुखात लगावली! हा प्रकार इतका अनपेक्षित आणि अचानक झाल्याने क्षणभर कुणालाच काहीच कळले नाही! अमिताभ बच्चन देखील बावरून गेले आणि दुसऱ्या क्षणी त्यांच्या तोंडातून हसू आले. त्यांनी त्याला देखील केळी दिली. अमिताभचे मेकअप दीपक सावंत यांनी पटकन बिग बी याना कारमध्ये घातले आणि ते हॉटेलच्या दिशेने निघून गेले. या थप्पड सोहळ्याच्या काही क्षण पूर्वीचा एक फोटो अमिताभ बच्चन यांनी त्यांच्या ब्लॉगवर मध्यंतरी शेअर केला होता, आणि त्यांनी हा मजेदार घटनाक्रम वाचकांना विदित केला होता!

© धनंजय कुलकर्णी

♥

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

लेख क्र. 21

रवीना टंडन ला खंडणी खोरांचे फोन कां येवू लागले?

हिंदी सिनेमातील नायक नायिका आणि त्यांचे पाळीव प्राणी यांच्याबद्दल अनेक किस्से ऐकायला मिळतात. जसपाल भट्टी यांचा पूर्वी एक दूरदर्शन वर कॉमेडी शो असायचा त्यात एका भागात त्यांच्या बायकोचे लाडके कुत्रे एकदा हरवते आणि त्यांची बायकोची 'बोलती'च बंद होते! कुत्रा हरवल्याचे तिला एवढे दुःख होते किती इतरांशी बोलावं च वाटत नाही. ती

नवऱ्याला कुत्रा शोधण्यासाठी पिटाळते. त्यावेळी जसपाल भट्टी पोलीस स्टेशन कुत्रा हरवल्याची तक्रार देण्यासाठी जातात. तिथे पोलीस अधिकाऱ्याला सांगतात "देखो भाई , ये तो बडी अच्छी बात है की मेरी बिवी की 'बोलती' बंद हो गई. लेकिन उसका कारण अगर आपने सोल्व्ह कर दिया तो फिरसे बोलने लगेगी!" पोलीस ऑफीसर चक्रावून जातो. त्यावर जसपाल भट्टी म्हणतात "उसका प्यारा कुत्ता गुम हो गया है इसकी वजह से बिवी की बोलती बंद हो गई है! आराम से कुत्तेको खोजो. मेरी तरफ से कोई जल्दी नही....!"

अभिनेत्री रविना टंडन हिच्याकडे एक छोटा पामेरियन कुत्रा होता. घरातील सर्वांचा प्रचंड लाडका. घरातील प्रत्येक जण त्याचे लाड करत. रेम्बो असं त्याचं नाव असतं. रवीनाचा नोकर रोज सकाळी त्याला बाहेर फिरायला घेऊन जात असे. एकदा दोन बदमाश चोरांनी या पामेरियन कुत्र्याला पळवून नेले. रेम्बो ला कुणी तरी पळवून नेले म्हटल्यावर घरातल्या सर्वांनी सर्व भडास आधी नोकरावर काढली. घरातील लोकांचे चित्त हरवले. रवीना च्या आईने तर अन्नपाण्याचा त्याग केला. सर्व घरावर एक दुःखाची छाया पसरली. शेवटी रवीना टंडन ने पोलीस कम्प्लेंट केली. शिवाय तिने वर्तमानपत्रात जाहिरात देखील दिली. जो कोणी तिच्या रेम्बोला शोधून आले त्याला इनाम देखील जाहीर केले. त्याखाली तिने तिचा पत्ता आणि फोन नंबर दिला. याचा उलटाच परिणाम झाला. रवीनाच्या चहात्यांचे तिला अहोरात्र फोन यायला लागले. त्याचबरोबर काही खंडणीखोर लोकांचे देखील तिला फोन यायला लागले "तुम्हारा रेम्बो हमारे कब्जे मे है अगर उसे जिंदा चाहते हो तो दस लाख रुपये काली कोठी के पीछे लाके दो. पुलीस मे जाने की गलती नही करना वरना रेम्बो कुत्ते की मौत मरेगा!" रविना चा कुत्रा काही मिळत नव्हता त्यामुळे घरात

कोणाला अन्नपाणी गोड लागत नाही. एके दिवशी बक्षिसाच्या आमिषाने एकाने वेगळाच कुत्रा आणून दिला!

पण या रेम्बोचा शोध अचानकपणे लागला. झालं असं त्या दोन चोरांनी या पामेरियन कुत्र्याला एका वर्सोव्याच्या एका पाळीव प्राणी विकणाऱ्या दुकानदाराला विकले. त्या मालकाने या कुत्र्याला वेगवेगळ्या नावाने बोलवायला सुरुवात केली. बॉबी, टॉमी, मोती... पण तो काही रिस्पॉन्स देत नव्हता. शेवटी त्याने वर्तमानपत्रातील रविनाची बातमी वाचून 'रेम्बो' म्हणून त्याला आवाज दिला त्याने पटकन कान उभे केले. दुकानदाराला लगेच लक्षात आले की हा रविनाचा कुत्रा आहे! त्याने रविना ला फोन केल आणि तिचा लाडका पामेरियन तिच्या हवाली केला!

© धनंजय कुलकर्णी

♥

लेख क्र. 22

जेंव्हा न्यूटनचा गतीविषयक नियम सिनेमात वापरला!

कधीकधी छोट्याशा गोष्टीतून देखील विज्ञान समजावून सांगता येतं, समजून घेता येतं. याचा प्रत्यय राज खोसला यांना त्यांच्या एका चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या दरम्यान आला. १९८२ साली राज खोसला त्यांच्या 'तेरी मांग सितारो से भर दू' या चित्रपटाचे चित्रीकरण करत होते. या चित्रपटात नूतन, पद्मिनी कोल्हापुरे, राजकिरण , अमजद खान यांच्या प्रमुख भूमिका होत्या. यात नूतन आणि पद्मिनी कोल्हापुरी या आई आणि मुलीच्या भूमिकेत होत्या. चित्रपटातील एका प्रसंगात नूतन, पद्मिनी कोल्हापूरच्या श्रीमुखात थप्पड लगावते. असा शॉट चित्रित करायचा होता. या प्रसंगात त्यांच्यासोबत अमजद

खान देखील उपस्थित होते. त्यामुळे एका फ्रेम मध्ये एका बाजूला पद्मिनी कोल्हापुरे मध्ये अमजद खान आणि त्यांच्या बाजूला नूतन अशी सेटींग लावली होती. अत्यंत रागारागात आई मुलीच्या तोंडात मारते अशी सिच्युएशन होती. 'लाईट कॅमेरा अँक्शन' असं म्हटल्यानंतर नूतनने पद्मिनीच्या तोंडावर थप्पड मारली. राज खोसला यांनी लगेच 'कट' म्हटले! तो शॉट काही बरोबर झाला नाही पुन्हा रिटेक केला. नंतर देखील राज खोसला पुन्हा कट कट म्हटले. त्यांच्या मनाप्रमाणे शॉट आला नाही. असं तब्बल आठ वेळा झालं! आता मात्र पद्मिनी कोल्हापुरेच्या डोळ्यातून धारा वाहू लागल्या. आठ थपडा खाल्ल्यानंतर देखील शॉट ओके होत नाही म्हणून राज खोसला यांना देखील आश्चर्य वाटले. नूतनसारखी अभिनेत्री असून देखील तिला आठ आठ रिटेक कसे घ्यावे लागत आहेत त्यांना प्रश्न पडला! या विचारात असतानाच त्यांचे कॅमेरामन प्रताप सिन्हा, राज खोसला यांच्या जवळ आले आणि त्यांना म्हणाले "हा शॉट बरोबर न येण्याचे कारण या दोघींमध्ये उभा असलेला अमजद खान आहे!" राज खोसला यांना आश्चर्य वाटले. त्यांनी कारण विचारले असता त्यांनी सांगितले.. "अमजद खान खूप जाडजूड, लठ्ठ असल्यामुळे नूतनकरीता पद्मिनीला थप्पड मारता येत नाही. तिच्या हातात फोर्सच येत नाही. कारण नूतनला हात खूप लांब करून पद्मिनीला थप्पड मारावी लागते. "राज खोसला तरी गप्पच होते. त्यांना काही समजत नव्हते. तेंव्हा कॅमेरामन प्रताप सिन्हा यांनी त्यांना "मी फिजिक्सच्या भाषेत सांगतो. न्यूटन यांचा गतिविषयक दुसरा नियम असा आहे संवेग परिवर्तनाचा दर हा त्याच्यावर लावलेल्या बलाशी समाणुपाती असतो. याचा अर्थ गती आणि बल यांना जर व्यवस्थित दिशा मिळाली तरच कृती घडू शकते.." राज खोसला यांना सुरुवातीला काहीच कळाले नाही.

त्यावर कॅमेरामन प्रताप सिन्हा यांनी सांगितले "आता सोप्या भाषेत सांगतो.. तुम्ही अमजद खान यांची शॉट मधील जागा बदला!" आता पद्मिनी कोल्हापुरे आणि नूतन या शेजारी-शेजारी उभ्या राहिल्या आणि पलीकडे अमजद खान उभे राहीले. आता नूतनच्या हाताच्या आवाक्यात पद्मिनी आली! आणि तिला थप्पड व्यवस्थित बसली. शॉट ओके झाला! न्युटनचा गतीविषयक दुसरा नियम इथे कामी आला!

© धनंजय कुलकर्णी

♥

लेख क्र. 23

फरहान अख्तर ने जीवाची बाजी लावून एकाचे प्राण वाचवले!

रुपेरी पडद्यावर साहसाची, मर्दुमकीची कामे करणाऱ्या कलावंताला रियल लाईफ मध्ये देखील कधी कधी अशा प्रसंगांना सामोरं जावं लागतं. सिनेमातील अशक्य अतार्किक गोष्टी म्हणजे एकाच वेळी दहा-दहा गुंडांना लोळवणे, आगीच्या ज्वाळेतून नायिकेची सुटका करणे,महापुराच्या लाटेत घुसून कुणाला वाचविणे... अशी कर्तबगारी पाहताना प्रेक्षक टाळ्या वाजवत असतात. पण अशाच अचाट गोष्टी वास्तविक आयुष्यात सामोऱ्या आल्या तर? अभिनेता फरहान अखतर याला एकदा अशाच एका प्रसंगाला सामोरं जावं लागलं होतं. ५ जून २०१५ रोजी प्रदर्शित झालेल्या 'दिल धडकने दो' या सिनेमाच्या चित्रीकरणाच्या या वेळचा हा प्रसंग आहे.

झोया अख्तर दिग्दर्शित हा चित्रपट एक मल्टिस्टारर सिनेमा होता. रणवीर सिंग, प्रियांका चोप्रा, फरहान अख्तर, अनुष्का शर्मा , अनिल कपूर अशी

मोठी स्टार कास्ट होती. या चित्रपटाचे चित्रीकरण 'टर्की'मध्ये झाले होते. काही मजेदार प्रसंग देखील चित्रिकरणाच्या दरम्यान आले! इस्तंबूल येथील सोफिया म्युझियममध्ये एक प्रसंग चित्रित करायचा होता. तिथे पर्यटकांची मोठी गर्दी होती. शूटिंग करणे गरजेचे होते. झोया ने कुणालाही व्यत्यय न आणता सर्व कलाकारांसोबत शूट उरकून घेतले. इतर पर्यटकांना देखील शूटमध्ये आयत्या वेळी सामावून घेतले! समुद्रावर शूट चालू असताना शेकडो सीगल पक्षी तिथे येत असत. फरहान त्यांना खाद्य देत असल्याने त्याच्याशी या पक्षांची चांगली मैत्री झाली होती. सबंध शूट मध्ये त्यांना डॉल्फिनचे दर्शन मात्र अजिबात होत नव्हते त्यामुळे सर्वजण नाराज होते पण शेवटच्या दिवशी अनपेक्षित पणे पन्नास हून अधिक डॉल्फिन त्यांना दिसले! अनेकांनी मस्त व्हिडीओ शूट केले.

या सिनेमाचे शूटिंग Anatolia च्या समुद्रकिनाऱ्यावर चालू होते. निसर्गरम्य निळाशार समुद्र पाहून सर्व क्रू मेंबर्स खुशीत होते. झोया अख्तरने पॅकअप म्हटल्यानंतर सर्वजण आनंदाने बीच वर खेळायला गेले. सर्व काही एन्जॉयमेंट बीच वर चालू असताना त्यांच्यातील एक मेंबर समुद्राच्या आत गेला. हा होता रणवीर सिंग याचा हेअर ड्रेसर धर्मेश. त्याला पाण्याचा अंदाज आला नाही. तो समुद्राच्या आत आत गेला. आणि एका मोठ्या समुद्राच्या लाटेने तो आणखी आत फेकला गेला. बीच वर असलेल्या काही जणांनी ते दृश्य बघून आरडाओरडा केला. तिकडे धर्मेश समुद्राच्या आत खेचला जात होता. आता तर तो गटांगळ्या खात होता. अभिनेता फरहान अख्तर ने त्याला पाहिले आणि पुढचा मागचा काही विचार न करता तो समुद्रात घुसला. वेगाने तो धर्मेश च्या जवळ जाऊन पोहोचला. त्याला खांद्यावर घेतले आणि जीवाची बाजी लावत फरहान अखतर किनाऱ्यावर आला. धर्मेश नाका तोंडात पाणी

गेल्यामुळे प्रचंड घाबरला होता. त्याला प्रथमोपचार दिल्यानंतर तो शुद्धीवर आला. फरहान अख्तरने जीवावर उदार होऊन त्याचे प्राण वाचवले. रिल लाइफ पराक्रम गाजविणाऱ्या मधील हिरोने रियल लाईफ मध्ये देखील हिरोगिरी करून नाव सार्थ केले!

© धनंजय कुलकर्णी

लेख क्र. 24



कोणते संगीतकार किशोर कुमारच्या मागे छडी घेवून धावत गेले?

संगीतकार सलील चौधरी आणि किशोर कुमार हे तसं रेअर कॉम्बिनेशन होतं! अगदी या दोघांची लोकप्रिय गाणी काढायला गेलं तर दोन्ही हाताची बोटे पुरे पडतील. पण ज्या ज्या वेळी एकत्र आले त्या त्या वेळी त्यांनी अप्रतिम गाणी रसिकांना सादर केली. छोटा सा घर होगा (नौकरी) मुन्ना बडा प्यारा अम्मी का दुलारा (मुसाफिर) चिल चिल चिल्लाके (हाफ तिकीट) हि गाणी पटकन आठवतात. किशोरकुमारने सलीलदा कडे काही बंगाली गाणी देखील गायली. या दोघांच्या एका गाण्याचा किस्सा खूप मजेदार आहे. १९७२ साली 'अन्नदाता' नावाचा एक चित्रपट आला होता. या चित्रपटाचे दिग्दर्शन असित सेन यांनी केले होते. गाणी योगेश यांनी लिहिली होती. तर संगीत सलील चौधरी

यांच्या होते. (याच काळात सलील चौधरी आणि योगेश हेच कॉम्बिनेशन ऋषिकेश मुखर्जी यांच्या 'आनंद' करीता देखील होते. असीत सेन आणि ऋषिकेश मुखर्जी दोघेही 'बिमल रॉय'' स्कूल चे विद्यार्थी! त्या मुळे अन्नदाता चित्रपटातील आणखी एका गाण्याचा भन्नाट किस्सा आहे. तो पुन्हा कधीतरी!)

या चित्रपटातील एका गाण्यासाठी किशोर कुमार यांना सलीलदा यांनी बोलावले.आधी किशोरच्या खास शैली मधील 'ओ मेरी प्राण सजनी चंपावती आजा' हे गाणं रेकॉर्ड झालं. नंतर सलीलदा म्हणाले " किशोरदा, आपको इस फिल्म का और एक गाना गाना है" दुसऱ्या दिवशी जेव्हा किशोर कुमार रेकॉर्डिंग स्टुडिओ मध्ये आला, त्यावेळी सलील चौधरींनी त्यांच्या दुसऱ्या गाण्याची धून त्याला ऐकून दाखवली. ही धून ऐकता ऐकता एकदम किशोर कुमार पटकन एका खुर्चीमध्ये बसला आणि ज्यावेळी धून संपली त्यावेळी डोक्याला हात लावून तो चक्क जमिनीवर खाली बसला! संगीतकार सलीलने विचारले "किशोरदा, ये अचानक क्या हुआ?" त्यावर किशोर कुमार म्हणाला.. "सलीलदा आपकी ये धून बहुत कठिन है ये गाना नही गा सकूंगा1" सलीलदाला किशोरचे नखरे माहित असल्याने ते म्हणाले.. "दादा तुमने इससे कठीण धूनवाले गाने बडी अच्छी तरह से गाये है. ये तो बहुत आसान है!" पण किशोर कुमार का ऐकायला तयार नव्हता!

तरी त्यांनी दुसऱ्या दिवशी रेकॉर्डिंगला यायला सांगितले. दुसऱ्या दिवशी सकाळी किशोर रेकॉर्डिंग स्टुडिओमध्ये आला आणि सलील चौधरी ना म्हणाला.. "दादा कल रात मैने एक सपना देखा. जानते हो क्या देखा?" सलीलदासोबत आता इतर वादक देखील त्याची स्टोरी ऐकायला आले. किशोर कुमार म्हणाला, "मैने सपने मे देखा तुम्हारे गाने की कल की धून मेरा

पीछा कर रही है और मै जान बचा कर उससे दूर भाग रहा हूं. मै आगे धून पीछे मै आगे धून पीछे! मैने तंग आकर कहा मै ये गाना नही गा सकता. बहुत कठीन है. फिर भी तुम्हारे धून मेरा पीछा नही छोड रही थी. इसलिये मै कल सपनेमे भाग रहा था!" सलीदाना किशोरची ही स्टाईल माहीत होती. रात्रीच्या स्वप्नाची गोष्ट सांगता सांगता किशोर कुमार खरोखरच तिथून पळून जाऊ लागला! सलीलदानी त्याला पकडले. पळत पळत तो म्हणाला "दादा मै आपका गाना नही गा सकता." त्यावर सलील चौधरी त्यांच्याकडची छडी घेतली व किशोरच्या मागे रेकॉर्डिंग स्टुडिओ मध्ये धावू लागले! दोघांचा लपाछपीचा खेळ सुरू झाला. या वादकाच्या पाठीमागे तर कधी त्या वादकाच्या पाठीमागे जाऊन किशोर कुमार लपू लागला! व सारखे सारखे ओरडून सांगत होता "मै गाना नही सकता !" त्यावर सलील दा देखील हट्टाला पेटले " आज मै तुझसे ये गाना गाकर हि दम लुंगा!" अखेर किशोर ला पकडले , उभे केले आणि गाणे गाऊन घेतले. चित्रपटात हे गाणे नायक अनिल धवन सायकलवर बसून जातो म्हणून तो फिल यावा म्हणून किशोर कुमार ने एका बाकावर बसून व्यवस्थित सायकलचा फिल आणत गाणे गायले. ते गाणे होते 'गुजर जाये दिन....'

© धनंजय कुलकर्णी

♥

लेख क्र. 25

... आणि जेंव्हा प्रेम चोप्राला कुणीच ओळखले नाही!

आज काल माध्यमाची दुनिया खूप विस्तारित झाली आहे. वर्तमानपत्र, मासिके, सोशल मीडिया, टी व्ही वरील चित्रपट वाहिन्या, ओटीटी....! या सर्वांमधून कलावंत ठळकपणे प्रेक्षकांपर्यंत पोहोचत आहेत. पण एके काळी मीडिया मर्यादित असल्यामुळे कलाकारांना चटकन ओळखणं कठीण जात होतं! त्याचाच हा किस्सा आहे! १९६७ साली 'आमने सामने' या नावाचा एक चित्रपट आला होता. सुरज प्रकाश यांचे या चित्रपटाला दिग्दर्शन होते तर कल्याणजी-आनंदजी यांचे संगीत होते! या चित्रपटात शशी कपूर, शर्मिला टागोर, प्रेम चोप्रा यांच्या प्रमुख भूमिका होत्या. या चित्रपटाचे शूटिंग पहेलगाम इथे चालू होते. शशी कपूर आणि शर्मिला टागोर यांच्या अनेक चित्रपट घेऊन

गेल्यामुळे प्रेक्षक त्यांना चांगलेच ओळखत होते. अनेक सिनेमासिकावर या दोघांची छायाचित्र प्रकाशित होत होती. थोडक्यात हे दोघे लोकप्रिय कलावंत होते. त्यामुळे या दोघांना पाहायला आणि त्यांचे ऑटोग्राफ घ्यायला प्रेक्षकांनी मोठी गर्दी केली होती!

शूटिंगच्या दरम्यान ब्रेक झाला की चाहते आपले ऑटोग्राफ बुक घेवून यायचे व या दोघांच्या सह्या घ्यायचे. हे सर्व प्रेम चोप्रा मोठ्या कुतूहलाने पहात राहायचा! खरं तर त्याचे देखील तोवर आठ सिनेमे रिलीज झाले होते! पण त्याला कोणीच ओळखत नव्हते त्यामुळे त्याचा ऑटोग्राफ घ्यायला कोणीही येत नव्हते. त्याला मनोमन वाटत होते; माझा सुद्धा कोणीतरी ऑटोग्राफ घ्यावा. एकदा मात्र नवल घडले. एका व्यक्तीने शशी कपूर आणि शर्मिलाचा ऑटोग्राफ घेतल्यावर त्याने आपले बुक प्रेम चोप्रा ला दिले. त्याला प्रचंड आनंद झाला पण लवकरच या आनंदावर विरजण पडले. शशी कपूरने प्रेम चोप्राला चिडवण्यासाठी ऑटोग्राफ बुक आपल्याकडे घेतले आणि त्या व्यक्तीला विचारले "तू आता ज्यांची सही घेत आहेस तो कलाकार कोण आहे तुला माहित आहे का?" त्यावर ती व्यक्ती विचार करून म्हणाली "हो माहिती आहे नं, हे सुनील दत्त आहेत!". त्यावर शशी त्या व्यक्तीला म्हणाला "जा बेटा आणखी थोडा अभ्यास करून ये....!" थोड्या वेळाने आणखी एक चहाता आला. त्याने शशी कपूर शर्मिलाची सही घेतल्यानंतर प्रेम चोप्रा कडे बुक दिले. त्याला पुन्हा शशी कपूरने बुक हातात घेऊन विचारलं "तू ज्याचा ऑटोग्राफ घेता आहेस तो कोण कलाकार आहे? माहित आहे कां?" यावर तो चाहता विचार करून म्हणाला "मेहमूद!"

शशी कपूरने त्यालाही परत पाठवले. इकडे प्रेम चोप्रा खूपच नाराज झाला! आपल्याला कुणीच ओळखत नाही ही खंत त्याच्या चेहऱ्यावर दिसू लागली! तितक्यात एक रसिक आला. शशी कपूरने बुक हाती घेईपर्यंत त्याने त्याच्या हातातून बुक घेतले. आणि आयुष्यातील पहिला ऑटोग्राफ दिला आणि त्यावर लिहिले.....

“विथ लव्ह फ्रॉम प्रेम चोप्रा.....”

© धनंजय कुलकर्णी

♥

लेख क्र. 26

परपुरुषाचा स्पर्श नको म्हणून नायिकेच्या भूमिका नाकारणारी अभिनेत्री कोण?

रुपेरी पडद्यावरील अभिनेत्रीचे बदललेले स्वरूप पाहून अचंबा वाटतो. एकेकाळी सिनेमातील स्त्री पात्र सादर करण्यासाठी स्त्रिया मिळत नसत. त्यामुळे पुरुषांनाच स्त्रीपात्र करावे लागायचे. दादासाहेब फाळके यांच्या चित्रपटात तर वेश्यांनी देखील काम करायला नकार दिला होता! सिनेमामध्ये काम करणे म्हणजे पाप करणे अशीच भावना महिला गटात झाली होती. त्यामुळे ख्रिश्चन किंवा ऑग्लो इंडियन मुली सिनेमात काम करायला तयार व्हायच्या. त्यांना

भरपूर मानधन मिळत असे. सुलोचना तथा रूबी मायर्स हिला तर त्याकाळी मुंबईच्या गव्हर्नरपेक्षा जास्त पगार होता!

याच काळात उत्तर प्रदेशातून राम प्रसाद मिश्रा नावाचे एक अभिनेते चित्रपटात काम करण्यासाठी मुंबईला आले होते. नाटकांमध्ये काम करण्याचा अनुभव त्यांच्या पाठीशी होता. नंतर त्यांनी त्यांच्या पत्नीला देखील मुंबईला आणले. दादासाहेब फाळके चित्रपट संस्थेच्या मामा शिंदे यांनी एकदा राम प्रसाद मिश्रा यांना विचारले "तुमच्या पत्नी आपल्या चित्रपटात काम करतील का?" त्यासाठी त्यांनी पाचशे रुपये प्रती महिना पगार देखील सांगितला. फाळके चित्र संस्थेत रामप्रसाद मिश्रा यांना १५० रू. प्रति माह पगार होता. त्यांनी पत्नीला चित्रपटात काम करण्यासाठी उद्युक्त केले. चित्रपट होता 'सती सुलोचना' या चित्रपटात रामप्रसाद मिश्रा रावणाची भूमिका करत होते. तर त्यांच्या पत्नी मंदोदरीची भूमिका करणार होत्या. शूटिंगच्या पहिल्या दिवशी आहेत मिश्रा पती-पत्नी शूटिंगला आले. मेकअपमन पुढे आला आणि मिश्रा यांच्या पत्नीला तयार करू लागला. परपुरुष आपल्या गालाला रंग लावतो आहे; या भावनेने त्या भयंकर चिडल्या! आणि त्यानी सगळा राग त्या मेकअपमन वर काढला तसेच आपल्या पतीवर देखील काढला. "या सेटवर मी एक मिनिट देखील रहाणार नाही कारण एक परपुरुष माझ्या गालाला रंग लावत आहे !" पतीने हर तऱ्हेने समजावून सांगितले "सिनेमात काम करायचं असेल तर चेहऱ्याचे रंगरंगोटी करणे गरजेचे आहे.." परंतु मिश्रा यांच्या पत्नीला असला प्रकार अजिबात आवडला नाही. आणि त्या तडक घरी निघून गेल्या. निर्मात्यांनी मिश्रा आणि त्यांच्या पत्नीला सिनेमातून काढून टाकले. पुढे कोल्हापूरच्या एका चित्रपट संस्थेने या दोघांना चित्रीकरणासाठी तिकडे

बोलावले. तिथे मास्टर विनायक यांची नायिका म्हणून मिश्रा यांच्या पत्नीला घेतले. एका प्रसंगात नायिकेला नायकाच्या गळ्यात हात टाकून प्रेमालाप करायचा होता. पुन्हा मिश्रा यांच्या पत्नीचे मस्तक भडकले आणि परपुरुषाच्या बाहुपाशात मी कसे हात टाकू? असे म्हणून चित्रपटातून बाहेर पडल्या. मिश्रा यांच्या पत्नीने नायिकांच्या अशा दोन सुवर्ण संधी सोडल्या!

आता मिश्रा यांनी पत्नीच्या भावना ओळखल्या.
परपुरुषाचा स्पर्श देखील होणार नाही अशाच भूमिका ते शोधू लागले. चित्रपट मिळाला! १९३६ सालचा हा चित्रपट होता. 'होनहार'! यात मिश्रा यांच्या पत्नीने वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी आईची भूमिका केली. या चित्रपटात त्यांचा मुलगा होता शाहू मोडक! बस! या भूमिकेपासून आईच्या भूमिकेचा त्यांच्यावर शिक्का बसला व पुढची पन्नास वर्षे त्या फक्त आई, मावशी, काकू, आजी अशाच भूमिका करू लागल्या. त्यांनी अडीचशेहून अधिक भूमिका केल्या. यात त्यांची ब्लॉकबस्टर शोले चित्रपटातील मौसीची भूमिका प्रचंड गाजली!

आता तुमच्या लक्षात आलेच असेल या अभिनेत्री होत्या लीला मिश्रा! यांचा जन्म १ जानेवारी १९०८ ला उत्तर प्रदेशात रायबरेली जवळील खेड्यात झाला. वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी त्यांचे लग्न झाले. सतराव्या वर्षी त्या दोन मुलींच्या आई झाल्या. त्यांच्या आयुष्यात सगळ्याच गोष्टी पटापट होतं होत गेल्या. रुपेरी पडद्यावरील त्यांच्या भूमिकांनी मात्र त्यांनी चांगलीच छाप पाडली. बातो बातो में, गीत गाता चल, चष्मेबद्दूर, दुल्हन वही जो पिया मन भाये, किनारा, लीडर, महबूबा, अमर प्रेम, नदिया के पार, कथा, पहेली, अबोध... मधील त्यांच्या भूमिका विशेष गाजल्या. वयाच्या ७३ व्या वर्षी

'नानी मां' या चित्रपटातील भूमिकेसाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचे मास्को फिल्म फेस्टीव्हल मध्ये पारितोषिक पटकावले. काही भोजपुरी सिनेमात त्यांनी काम केले. सत्यजित रे यांच्या 'शतरंज के खिलाडी' या सिनेमात त्यांची भूमिका होती. १७ जानेवारी १९८८ रोजी लीला मिश्रा यांचे निधन झाले.

© धनंजय कुलकर्णी

♥

लेख क्र. २७



आमिर खानला पत्नी किरण रावने कां ठेवले तीन आठवडे कोंडून?

मिस्टर परफेक्शनिस्ट अशी आमिर खान यांची ओळख बॉलीवूड मध्ये आहे. मोजकेच चित्रपट करून आमिर खान यांनी आपली स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. कमर्शियल चित्रपट करताना त्यांनी 'पिपली लाईव्ह' सारखा कलात्मक चित्रपट देखील बनवला. व्यवसायिक चित्रपटातून देखील चांगल्या पध्दतीने सामाजिक संदेश देता येतो हेदेखील त्यांनी त्यांच्या अनेक चित्रपटातून दाखवून दिले आहे. २०११ साली आमिर खान खान यांनी 'धोबी घाट' हा वेगळ्या जॉनरचा चित्रपट निर्माण केला होता. आमिर खान यांच्या पत्नी किरण राव यांनी हा चित्रपट दिग्दर्शित केला होता. किरण राव यांनी दिग्दर्शित केलेला पहिलाच चित्रपट होता! या चित्रपटाने समीक्षकांची चांगलेच

लक्ष वेधून घेतले. या चित्रपटाचे वैशिष्ट्य म्हणजे याचे चित्रीकरण कुठेही स्टुडिओत न होता थेट लोकेशनवर जाऊन केले.

मुंबईमध्ये महालक्ष्मी जवळचा धोबीघाट, वरळी, चौपाटी, मोहम्मद अली रोड या भागात या चित्रपटाचे शूटिंग झाले. या सिनेमासाठी कोणतेही सेट्स उभारले नाहीत. मध्यंतर न घेता सलग १०० मिनिटांचा हा चित्रपट चित्रपटगृहात दाखवला गेला! असा पॅटर्न असलेला हा भारतातील पहिलाच सिनेमा होता. किरण राव यांनी हा सिनेमा "Guerilla" टेक्निकने बनवला. ज्यात मर्यादित साधनांचा वापर करीत वास्तव चित्रीकरण थेट लोकेशन्स वर जावून केले जाते. यातील मॉब सीन्स कुणाला डिस्टर्ब न करता (किंवा कल्पना न देता) थेट चित्रित केले जातात. या सिनेमाला संगीत ॲकॅडमी ॲवॉर्ड विनर Gustavo Santaolalla यांनी दिले होते. तसेच या सिनेमात बेगम अख्तर यांनी तिलक कमोद रागात गायलेली 'अब के सावन घर आजा..' ही ठुमरी आणि 'मधुमती' चित्रपटातील 'दिल तडप तडप के कह रहा है...' हे गाणे सिनेमाच्या बॅक-ड्रॉपला घेतले होती. २६/११ च्या बॉम्बस्फोटाने या सिनेमाच्या चित्रीकरणाला खिळ बसली. किरण राव यांना रेल्वे स्टेशनवर चित्रीकरणाला बंदी घातली. हा सिनेमा इंग्रजी आणि हिंदी या दोन भाषात बनला. यात प्रतिक बब्बर, मोनिका डोग्रा, क्रीती मल्होत्रा, अमीर खान आणि किटू गिडवानी यांच्या प्रमुख भूमिका होत्या. दिग्दर्शक किरण रावच्या मते 'मुंबई' हेच या सिनेमाचे प्रमुख पात्र होते. आर्ट सिनेमा असूनही या सिनेमाने बऱ्यापैकी व्यावसायिक यश मिळविले!

या सिनेमाच्या चित्रीकरणाच्या दरम्यानचा एक किस्सा मोठा रंजक आहे. आमिर खान यांच्या मिस्टर परफेक्शनिस्ट या विशेषणाला आणखी

बळकटी देणारा आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण मोहम्मद अली रोड परिसरात होणार होणार होते. हा रस्ता अत्यंत गजबजाट असलेला गर्दीचा असतो. तिथे आमीर खान सारख्या बड्या स्टारला येऊन चित्रीकरण करणे मोठे जिकिरीचे झाले असते! त्यामुळे या चित्रपटाच्या दिग्दर्शिका आणि आमीर खान यांच्या पत्नी किरण राव एक आयडिया केली. त्यांनी पहाटे तीन वाजता आमिर खानला या वस्तीतील एका छोट्या फ्लॅटमध्ये आणून ठेवले आणि "पुढचे तीन आठवडे तुम्हाला याच खोलीमध्ये राहायचे आहे!" असे सांगितले. आमीरसारख्या प्रोफेशनल कलाकाराने दिग्दर्शकाचा निर्णय तंतोतंत पाळला. पुढचे तीन आठवडे त्या छोट्याशा खोलीमध्ये राहिला आणि इथेच चित्रपटाचे त्याच्यावरील चित्रीकरण पूर्ण केले. या चित्रीकरणाच्या दरम्यानच आमिर खान यांच्या थ्री इडीयट्स या चित्रपटाच्या मीटिंग देखील चालू होत्या. त्यामुळे दिग्दर्शक विधू विनोद चोप्रा आमीर खानला भेटण्यासाठी त्या छोट्याशा खोलीत येत, या फ्लॅटमध्ये चित्रीकरणाची इतर साहित्य, कॅमेरे वगैरे या सामानाची गर्दी असल्यामुळे विधू विनोद चोप्राला एकदा तर आमिर खान सोबत चक्क त्या फ्लॅटमधील बाथरूम मध्ये बसून मीटिंग घ्यावी लागली होती! या चित्रपटात आमिर खानला सुरुवातीला कास्ट केले नव्हते पण आमीर खानने त्यातील एक व्यक्तिरेखा साकारण्याची विनंती किरण रावला केली. किरण रावने त्याची प्रॉपर स्क्रीन टेस्ट घेतली. ही स्क्रीन टेस्ट पास झाल्यानंतरच त्याला या चित्रपटातील भूमिका मिळाली! 'गजनी' या चित्रपटाच्या सेटवर आमिर खानची स्क्रीन टेस्ट झाली होती.

आमिरला उगाच मिस्टर परफेक्शनिस्ट म्हणत नाहीत!

© धनंजय कुलकर्णी

♥



♥

लेख क्र.28

सचिन देव बर्मन यांच्या भजनाने झाली लॉकअप मधून सुटका!

कलावंतांच्या लहानपणीच्या लीला ऐकून खूप गम्मत वाटते. असाच एक किस्सा संगीतकार सचिन देव बर्मन यांच्या बाबतीतला आहे. संगीतकार सचिन देव बर्मन मोठ्या राजघराण्यात जन्माला जरी आले. ते राजपुत्रच होते. त्रिपुरा राजघराण्याच्या रॉयल फॅमिली मध्ये १ ऑक्टोबर १९०६ ला त्यांचा जन्म झाला. आज बांगला देश मध्ये असलेल्या कोमिला इथे त्यांचे शालेय शिक्षण झाले. पुढे इथेच त्यांनी त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण घेतले.

राजघराण्यात जरी जन्मले असले तरी त्यांचे मित्र मंडळ सामान्य कुटुंबातील होते. या मित्रांसोबत त्यांची धमाल-मस्ती चालू असायची. त्यावेळी सचिन त्यांचे वय चौदा पंधरा वर्षे असेल. एकदा सर्व मित्र रेल्वेने

पिकनिकला जायला निघाले. मौज मजा मस्ती करून संध्याकाळी ते आपल्या घरी जायला निघाले. मस्तीचे वय होते. थोडी बंडखोरी अंगात होती. रेल्वेने प्रवास विना तिकीट करायचे ठरले. प्रवास झाला! कोमिला या स्टेशनवर उतरल्यानंतर मात्र समोर तिकीट चेकर उभा होता! सचिनदा आणि त्यांच्या मित्रांनी तिकीट काढले नव्हते त्यामुळे त्या तिकीट-चेकरने त्यांना सर्वांना पकडले. दंडाचे पैसे भरण्याइतपत रक्कम कुणाकडेच नव्हती. स्टेशन मास्टरने स्टेशनवरील लॉक अप मध्ये त्यांना बंदिस्त केले. सर्व मित्र घाबरून गेले होते. घरी काय सांगायचे? तिकीट न काढता प्रवास केलाच कसा? असे नाना प्रश्न त्याच्या डोक्यात थैमान घालत होती. रात्र होत होती. पोटाला भूक लागली होती. काय करणार ? चूक तर झालीच होती. उद्या पोलीस कोर्टात हजर करणार ही एक भीती होतीच!

जेवण न करता काही जण झोपी गेले. पण सचिनदा यांना मात्र काही झोप येत नव्हती. आपल्या चुकीने ते पश्चाताप दग्ध झाले. बेचैन झाले. कोवळे संस्कारित वय. झोप येत नव्हती! अपराधीपणाची भावना स्वस्थ बसू देत नव्हती. त्या बेचैनीत त्यांनी ईश्वराची आराधना करायला सुरुवात केली. रात्री दोन वाजता त्यांनी एक बंगाली भजन गायला सुरुवात केली. भटियाली शैलीतील हे भजन अतिशय सुरीले आणि कर्णमधुर होते. स्टेशनच्या मागेच स्टेशन मास्टरचे क्वार्टर होते. स्टेशन मास्टरच्या बहिणीला हे सुरीले भजन ऐकून जाग आली तिने आपल्या भावाला उठवले. हे सुंदर भजन मध्यरात्री कोण गात आहे याचा ते शोध घेऊ लागले. आणि शोध घेता घेता ते लॉक-अपपर्यंत घेऊन पोहोचले. तिथे सचिनदा डोळे मिटून तल्लीन होऊन भजन गात होते. या दोघांना ते भजन कमालीचे आवडले. स्टेशन मास्टरने लॉक अपचे कुलूप उघडले आणि

सचिनदाला मिठी मारली. त्यांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. ते म्हणाले "उभ्या आयुष्यात मी इतकं सुरीलं भजन ऐकलं नाही!"

सचिनदा सर्व मित्रांना उठवून ते आपल्या घरी घेऊन गेले. त्यांच्यासाठी मध्यरात्री स्वयंपाक बनवला गेला सर्वजण जेवण करून झोपी गेले आणि पहाटे मोठ्या सन्मानाने त्यांना घरी पाठवले!

© धनंजय कुलकर्णी

♥

लेख क्र. २९



एका हत्ती साठी लहानग्या काजोलने केले आई सोबत भांडण!

बॉलीवूड मधील मुखर्जी आणि समर्थ ही दोन कुटुंबे स्वातंत्र्यापूर्वी पासून सिनेमाच्या बिझिनेसमध्ये आहेत. १९७२ साली आलेल्या 'एक बार मुस्कुरा दो' या सिनेमा मध्ये तनुजा आणि शोमू मुखर्जी यांनी एकत्र भूमिका केली होती. शोमु मुखर्जी हा शशिधर मुखर्जी यांचा मुलगा. शशिधर मुखर्जी फिल्मीस्तान, फिल्मालय स्तुदिओचे मालक! तनुजा देखील फिल्मी कुटुंबातली. तिची आई शोभना समर्थ, वडील कुमारसेन समर्थ तर बहिण नूतन सर्व जण सिनेमातील! तनुजा आणि शोमू मुखर्जी यांनी १९७३ साली लग्न केले. त्यांना पहिले कन्या रत्न प्राप्त झाले. काजोलचा जन्म पाच ऑगस्ट १९७४ चा! हा किस्सा आहे काजोलच्या लहानपणीचा काजलचा. तिला लहानपणी हत्ती खूप आवडायचे. त्यामुळे तनुजा तिला कायम प्राणी संग्रहालयात घेऊन

जायची. १९८० साली एकदा मुंबईला एका चित्रपटगृहात राजेश खन्ना आणि तनुजा यांचा १९७१ सालचा 'हाथी मेरे साथी' हा चित्रपट रिपीट-रनला प्रदर्शित झाला. काजोल तेंव्हा सहा वर्षाची होती. तनुजाला वाटले हा सिनेमा आपल्या मुलीला काजोलला खूप आवडेल कारण त्यामध्ये हत्ती आहे. काजोलला घेऊन ती सिनेमा पाहायला गेली.

या सिनेमातील एका प्रसंगात रामू हत्तीला तनुजा घराबाहेर काढते आणि तिकडेच हत्तीचा मृत्यू होतो. हा प्रसंग पाहिल्यानंतर लहानगी काजोल थिएटरमध्येच खूप रडू लागली. आणि रामू हत्तीच्या मृत्यूला आपली आई जबाबदार आहे असे ते समजून सिनेमा पाहून आल्यानंतर तिने आईसोबत चक्क भांडण केले. "तू रामू हत्तीला बाहेर का काढले? त्यामुळे तो बिचारा मेला नं?" तनुजाने तिला हर तऱ्हेने समजून सांगितले. "बेटा हे सगळं खोटं असतं. सिनेमात असंच खोटं खोटं दाखवलं आहे. रामू हत्ती अजून जिवंत आहे तो मेलेला नाही..." पण काजोलचे काही समाधान होत नव्हते. दोन आठवडे ती आईशी धड बोलत देखील नव्हती. आपल्या लाडक्या रामू हत्तीच्या मृत्यूला आई जबाबदार आहे असे तिच्या चिमुकल्या डोक्यात फिट्ट बसले होते. तनुजाला देखील काय करावे समजत नव्हते. काजोल नीट खात पीत नव्हती. आता तनुजाला तिची काळजी वाटू लागली. पण त्याच वेळी एक अशी घटना घडली की काजोलचा आपल्या आईवरील राग आपोआप कमी झाला. त्यावेळी मुंबईमध्ये एक सर्कस आली होती. या सर्कसच्या उद्घाटनाला तनुजाला बोलावले होते. तनुजा आपली मुलगी काजोल हिला घेऊन उद्घाटनाला गेली. सर्कसच्या प्रांगणात जाताना तिथे काही हत्ती बांधून ठेवले होते. त्यांच्या जवळून जात असताना एका हत्तीने त्याची सोंड लांबवून तनुजाच्या साडीचा पदर

ओढला! तनुजा घाबरून गेली. पण लगेच सर्कसचे मालक तिथे आले आणि त्यांनी सांगितले "तनुजाजी , ये वोही रामू हाथी है जिसके साथ आपने 'हाथी मेरे साथी' मे काम किया था! उसने आपको पहचान लिया है!" तनुजाला खूप आनंद झाला. ती रामू हत्तीच्या जवळ गेली. त्याला केळी खायला दिली. काजोलला देखील रामू हत्ती जिवंत आहे पाहून खूप आनंदित झाली. तिने त्याच्या सोबत काही फोटो काढले. अशाप्रकारे काजोलचा आपल्या आई वरील राग क्षणार्धात पळून गेला.

हा किस्सा तनुजाने एका मुलाखतीच्या दरम्यान सांगितला होता.

© धनंजय कुलकर्णी

♥

♥



'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

लेख क्र. ३०

रमेश सिप्पीच्या बायकोने त्यांच्याशी कां धरला सहा महिने अबोला?

संशयाचे भूत एकदम मानगुटीवर बसले की चांगल्या संसाराची वाट लागायला वेळ लागत नाही. पण हाच संशय जर वेळीच दूर झाला तर पुढे येणारे सगळे प्रश्न आपोआप कमी होत जातात. 'संसाररूपी रथात सारथ्य करणारे दोन्ही अश्व जर परस्परांशी समन्वय साधून मार्गक्रमण करत असतील तरच प्रपंचाची वाटचाल सोपे असते' हा आपल्या संस्कृतीतील अर्वाचीन विचार आहे आणि हेच चिरंतन सत्य देखील आहे. तरी जोडप्यांमध्ये बेबनाव याच संशयामुळे होत राहतात.

हेच कपल जर 'सेलिब्रेटी' असेल तर संशयाची सुई ही कायम परस्परांवर फिरत राहते! कारण सेलिब्रिटींच्या भोवती असलेलं प्रसिद्धीचे वलय, तो लाईम-लाईटचा प्रकाशझोत, वातावरणातील तो मोकळेपणा, स्त्री-पुरुषांमधील स्त्रैण संबंध यातून संशयाला भरपूर वाव मिळत जातो. गॉसिप्स मॅगझिन त्यात आणखी मसाला टाकत राहतात. आणि याचा त्रास (काही वेळा) प्रामाणिक लोकांना होत राहतो. अर्थात चर्चेत राहण्यासाठी सेलिब्रिटी स्वतःच

असला खोटा नाटा माल मसाला मीडियाला पुरवत असतात. येणे केण प्रकारे आपण प्रेक्षकांच्या पुढे राहिले पाहिजे, चर्चेत राहिले पाहिजे हा या मागचा उद्देश असतो. यातून मिळणारी पब्लिसिटी त्यांना हवी असते.

'शोले' चित्रपटाचे दिग्दर्शक रमेश सिप्पी यांना एकदा असाच (त्यांच्यासाठी) भयंकर असा अनुभव आला होता. ज्यामुळे तब्बल सहा महिने त्यांच्या बायकोने त्यांच्याशी अबोला धरला होता! काय होता हा किस्सा? त्यावेळी रमेश सिप्पी त्यांच्या महत्वकांशी 'शोले' या चित्रपटाचे शूटिंग बेंगलोर जवळच्या रामनगर येथे करत होते. दिवसभर कडक उन्हामध्ये चित्रीकरण केल्यानंतर संध्याकाळी थकून भागून ते लवकर झोपी जात. एकदा मध्यरात्री उशिरा त्यांच्या रूममधील फोन खणखणला! अर्धवट झोपेतच त्यांनी फोन उचलला! फोनवर मुंबईहून त्यांची पत्नी गीता बोलत होती. तिने रागारागातच विचारले, "या महिन्याचा स्टारडस्ट वाचलात का?" रमेश सिप्पी यांनी सांगितले.."... "नाही!" त्यावर बायकोने सांगितले, "उद्या वाचा आणि मग फोन करा!" रमेश सिप्पींची झोपच उडाली. गीताचा फोन तोही मध्यरात्री म्हणजे नक्कीच काहीतरी गडबड असणार आणि तिच्या एकंदरीत टोन वरून बातमी डेंजर आहे हे समजले पण काय आहे हे समजत नव्हतं! पहाटे उठल्यावर त्यांनी स्टारडस्टचा अंक मागून घेतला. अंक सुरुवातीपासून शेवटपर्यंत त्यांनी पाहिला त्यात त्यांना काहीच सापडले नाही. त्यावेळी म्हणजे १९७४ साली फोन करणे देखील खूप अवघड गोष्ट होती. त्यावेळी ट्रंक-कॉल लावावा लागे. रमेश सिप्पी यांनी संध्याकाळी मुंबईला ट्रंक कॉल लावून गीताला सांगितले, "मी स्टारडस्ट पाहिला, मला त्यात काही आढळले नाही!" गीताने फणकाऱ्यात उत्तर दिले , "तुम्हाला कसे सापडेल? पेज नंबर ४० वाचा आणि मला फोन करा!" असे

म्हणून फोन कट केला. रमेश सिप्पी ने पुन्हा स्टारडस्ट घेतला आणि पेज नंबर ४० काढले. त्या पानावरील अनेक बातम्यांमध्ये एक बातमी त्यांच्याबाबत होती. त्यात रमेश सिप्पी आणि अभिनेत्री परवीन बाबी यांच्या प्रेम प्रकरणाची खमंग बातमी त्यात होती. रमेश सिप्पीना आश्चर्य वाटले कारण तोवर ते परवीन बाबीला भेटले देखील नव्हते. त्यांनी लगेच पत्नी गीताला ट्रंक कॉल करून सांगितले ही.. ''बातमी पूर्णतः चुकीचे आहे. मी अजूनपर्यंत परवीन बाबीला पाहिले पण नाही आणि भेटलो तर अजिबात नाही.'' त्यावर पत्नी म्हणाली, ''मग बातमी आलीच कशी?'' ती अजून गुश्श्यातच होती. सिप्पी म्हणाले, ''आता मला काय माहित?'' त्यावर गीता सिप्पी म्हणाल्या, ''जर बातमी खोटी असेल तर तुम्ही ताबडतोब संपादकाला फोन करून माफी मागायला सांगा!'' सिप्पीनी 'हो' म्हणून फोन ठेवला. 'शोले' चित्रपटाच्या शूटिंगच्या वेळी त्यांच्या डोक्याला हा नवीनच भुंगा लागला होता! दुसऱ्या दिवशी त्यांनी 'स्टारडस्ट' संपादकाच्या नावाचा शोध घेतला आणि संपादक नारी हिरा! अमिताभ बच्चन यांचे ते चांगले मित्र आहेत असे त्यांना कळाले. पुन्हा त्यांनी ट्रंक-कॉल लावून अमिताभ बच्चन करवी संपादकाला सर्व स्टोरी ऐकवली आणि त्यांना ही बातमी चुकीची असून तुम्ही त्याबद्दल माफी मागा असे सांगितले. स्टारडस्ट संपादकाने देखील सॉरी म्हणून चुकीबाबत माफीची बातमी छापतो असे सांगितले. रमेश सिप्पी यांनी बायकोला फोन करून सर्व वृत्तांत दिला. स्टारडस्ट वाले देखील भारी! त्यांनी पुढच्या अंकात माफीनामा छापलाच नाही. तब्बल सहा महिन्यांनी तो छापला. पण तोवर सहा महिने रमेश सिप्पी यांच्या पत्नीने त्यांच्याशी चक्क अबोला धरला!

© धनंजय कुलकर्णी

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

लेख क्र. ३१



जेंव्हा अनिल कपूरने आपल्या प्राणप्रिय 'मिशांचा' त्याग केला!

त्या काळात यश चोप्रा यांच्या सिनेमात काम मिळावे म्हणून प्रत्येक कलावंत धडपडत असायचा! अनिल कपूरलादेखील यश चोप्रांच्या चित्रपटात भूमिका मिळावी ही आंतरिक इच्छा होती. त्यांची इच्छा पुर्ण देखील झाली! यश चोप्रांच्या दोन सिनेमात त्यांनी काम केले. 'मशाल' आणि 'विजय'! परंतु हे दोन्ही सिनेमे अनिल कपूरसाठी ओळखले जात नाहीत! १९८३ साली आलेल्या 'मशाल' या चित्रपटाला, प्रामुख्याने दिलीप कुमारसाठी ओळखले जाते! तर १९८८ साली आलेल्या 'विजय' मध्ये राजेश खन्ना, हेमा मालिनी, ऋषी कपूर अशी मोठी स्टार कास्ट होती. हा सिनेमा मल्टिस्टारर असल्यामुळे अनिल कपूरला फारसे क्रेडिट मिळालं नाही. त्यामुळे अनिल कपूरला यश चोप्रा सोबत 'सोलो हिरो' असलेला सिनेमा हवा होता!

ती संधी त्यांना मिळाली १९९१ साली. चित्रपट होता 'लम्हे'! खरं तर या सिनेमाची सुरुवातीचे स्टारकास्ट अमिताभ बच्चन आणि श्रीदेवी अशी

होती! परंतु चित्रपटातील नायकाचे वय अमिताभच्या तत्कालिन वयाशी मॅच न होणारे असल्यामुळे ही आयडिया मागे पडली. मग नायकाचा शोध सुरू झाला. या चित्रपटाचे कथानक हनी इराणी हिने लिहिले होते. हनी इराणीने अनिल कपूरचे नाव यश चोप्रा यांना सुचवले. यश चोप्रा यांनी अनिल कपूरला बोलावून त्याची स्क्रीन टेस्ट घेतली. कारण यात नायकाची भूमिका सर्वस्वी वेगळी होती! यातील तरुणपणाच्या नायकाच्या भूमिकेसाठी यश चोप्रांनी अनिल कपूरला तुझ्या मिशा तुला काढाव्या लागतील असे सांगितले. अनिल कपूरचे त्याच्या मिशांवर जीवापाड प्रेम होते. त्यामुळे तोवर त्याने कुठल्याही सिनेमात मिशा काढल्या नव्हत्या. पण या चित्रपटाची गरज मिशा काढण्याची होती!

खूप जड अंतःकरणाने त्याने आपल्या मिशांचा त्याग केला आणि सफाचट अनिल कपूर पहिल्यांदाच 'लम्हे' या चित्रपटात दिसला. चित्रपट पूर्ण झाला! समीक्षकांना हा चित्रपट खूप आवडला. पण आम जनतेला हा सिनेमा आणि हा विषय अजिबात आवडला नाही! कदाचित हा विषय त्यांच्या डोक्यावरून गेला! त्यामुळे सिनेमा फ्लॉप ठरला! सिनेमाचा विषय काळाच्या पुढचा असल्यामुळे लोकांना तो आवडला नसावा! यश चोप्रांनी
चुकीच्या काळात सिनेमा काढला असे म्हणावे लागेल!

आज ओटीटीच्या माध्यमामुळे प्रेक्षकांची मॅच्युरिटी वाढली आहे. ओटीटीमुळे वेगवेगळ्या जॉनरचे विषय त्यांच्या समोर येत आहे. आजच्या काळात जर 'लम्हे' सारखा विषय आला असता तर कदाचित त्याला यश मिळाले असते! आपल्या प्राण प्रिय मिशांचा त्याग करून अनिल कपूर ने 'लम्हे' केला पण त्याला यश मिळाले नाही! तसेच त्याला पारितोषिक देखील मिळाले नाही. पण या चित्रपटातील भूमिकेसाठी श्रीदेवीला फिल्मफेअरचे

सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचे पारितोषिक मिळाले! या सिनेमाला फिल्मफेअरचे सर्वोत्कृष्ट चित्रपटाचे पारितोषिक मिळाले होते! तसेच सर्वोत्कृष्ट विनोदवीर म्हणून अनुपम खेर यांना सर्वोत्कृष्ट कथानक म्हणून हनी इराणी यांना आणि सर्वोत्कृष्ट संवाद म्हणून राही मासूम रजा यांना पुरस्कार प्राप्त झाले. राही मासूम रजा यांच्यासाठी हा शेवटचा चित्रपट ठरला. कारण या चित्रपटानंतर काही महिन्यातच त्यांचे दुर्दैवी निधन झाले.

'लम्हे' या चित्रपटाला शिव-हरी यांचे संगीत होते. गाणी आनंद बक्षी यांनी लिहिली होती. यातील 'कभी मै कहू कभी तुम कहो..' या गाण्याची धून 'चांदनी' (१९८९) या यश चोप्रा यांच्या चित्रपटात पार्श्वभागी वापरली होती! या धूनमधूनच हे गाणे तयार झाले1 यातील इला अरुण आणि लता मंगेशकर यांनी गायलेले 'मोरनी बागा मा बोले' त्या काळात खूप लोकप्रिय झाले होते. हरिहरन यांच्या स्वरातील 'ये लम्हे ये पल..' या गाण्याला देखील रसिकांनी चांगले दाद दिली होती. हा चित्रपट खरंतर दिवाळीतच प्रदर्शित होणार होता पण त्याचवेळी रमेश सिप्पी यांचा अमिताभ बच्चन अभिनीत 'अकेला' हा चित्रपट प्रदर्शित होणार होता. त्यामुळे विनाकारण टक्कर नको म्हणून त्यांनी या सिनेमाचे प्रदर्शन एक महिना पुढे ढकलले. 'लम्हे' हा चित्रपट २२ नोव्हेंबर १९९१ या दिवशी प्रदर्शित झाला. याच दिवशी अजय देवगनचा पहिला चित्रपट 'फूल और कांटे' हा देखील प्रदर्शित झाला. यश चोप्रांना 'फूल और कांटे' हा चित्रपट बी ग्रेडचा मारधाड सिनेमा वाटल्याने त्यांनी 'लम्हे' चित्रपट त्याच्यासोबत प्रदर्शित केला. पण झाले उलटेच! दुर्दैवाने 'लम्हे' फ्लॉप झाला आणि 'फूल और कांटे' चित्रपट धो धो तुफान चालला!

© धनंजय कुलकर्णी

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

लेख क्र. ३२

लहानपणी शबाना आजमी ने केला होता आत्महत्येचा प्रयत्न!

अटेंशन सिकिंग सिंड्रोम हा एक मानसिक आजार आहे. तो सर्व वयोगटात दिसत असला तरी लहान मुलांमध्ये बऱ्याचदा याची लक्षणे जास्त दिसतात. ज्यावेळी घरात एकाहून अधिक भावंड असतात त्यावेळी आपल्याकडे पालकांचे लक्ष अधिक असावे याकडे प्रत्येकाचा ओढा असतो. यातूनच मग सिबलींग रायव्हली सुरू होते. बहीण-भावंडा मधील सूक्ष्म असूयेची बीजे तिथेच रोवली जातात. (अर्थात मुलं मोठी झाली की ही भावना उताराला लागते.) अशा वेळी पालकांची मोठी कसोटी असते. त्यांना आपल्या प्रेमाची मात्रा सर्वांसाठी सारखीच ठेवावी लागते. पण कधीकधी उन्नीस-बीस

होते आणि त्यातूनच मोठे कडवट प्रसंग निर्माण होऊ शकतात. अभिनेत्री शबाना आझमीच्या लहानपणीचा एक किस्सा असाच आहे!

शबाना आजमीची आई शौकत आजमी यांनी २००५ साली त्यांचे 'कैफी अँड आय' हे आत्मचरित्र लिहिले. त्यात त्यांनी या घटनेचा उल्लेख केला आहे. शबाना आजमी ख्यातनाम शायर कैफी आजमी आणि ज्येष्ठ रंगकर्मी शौकत आजमी यांची कन्या! घरातच साहित्य आणि अभिनयाचा वारसा मिळाल्याने तिच्यातील अभिनेत्रीला लहानपणापासूनच प्रोत्साहन आणि वातावरण मिळाले. एक सक्षम, संवेदनशील अभिनेत्री म्हणून ती रुपेरी पडद्यावर आली. तिच्या लहानपणीचा हा किस्सा आहे. कळत-नकळतपणे पालकांकडून झालेल्या चुकीचा मुलांच्या मनावर खोलवर परिणाम होतो आणि त्यातून ते किती टोकाचे पाऊल उचलतात हे यातून आपल्याला दिसते. शबाना त्यावेळी दहा वर्षाची तर तिचा धाकटा भाऊ बाबा आजमी सहा वर्षाचा होता. एकदा सकाळी दोघे शाळेत जाण्यासाठी तयार झाले होते. नाश्ता करण्यासाठी टेबलवर येऊन बसले होते. शबानाची आई शौकत आजमीने शबानाच्या प्लेटमधील टोस्ट बाबाच्या प्लेटमध्ये टाकला! आणि ती म्हणाली "बाबाची स्कूल बस आज लवकर येणार आहे त्यामुळे त्याला तुझ्या आधी खाऊ दे. तुझ्यासाठी नवीन टोस्ट नंतर बनवून देते!" असे म्हणून शौकतने त्यांनी नोकरानी एलिस्सा हिला शबाना साठी नवीन टोस्ट बनवायला सांगितला. एलिस्सा टोस्ट घेऊन आली पण तिला शबाना तिथे दिसली नाही. तिने शबानाला तिच्या रूममध्ये शोधले पण तिथे ती नव्हती. तिने शौकत आजमीला बोलावले. दोघींनी शबानाचा शोध घ्यायला सुरुवात केली. त्यावेळी तिचा बाथरूममधून रडण्याचा आवाज आला. बाथरूम मध्ये शबाना रडत होती!

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

ती दहा वर्षाची चिमुरडी पोर पण तिच्या मनावर आघात झाला होता. माझ्यापेक्षा आई धाकट्या भावावर जास्त प्रेम करते अशी भावना तिच्या मनात झाली होती. त्या रागातच ती शाळेत जायला निघाली. शौकतने तिला हर तऱ्हेने समजावून सांगितले पण तिचे समाधान झाले नाही आणि ती तशीच शाळेत गेली. शाळेत गेल्यावर ती मैत्रिणींना आपली सकाळची कहाणी रडत रडत सांगू लागली आणि मी कोणालाच आवडत नाही, मी सर्वांना नकोशी झाली आहे असे म्हणू लागली. तेवढे बोलून ती थांबली नाही तर तडक शाळेतील केमिस्ट्री लॅबमध्ये गेली आणि तिथे बाटलीतील कॉपर सल्फेट (मोरचूद) हे विषारी द्रव्य ती प्याली. तिच्या मैत्रिणी धावत धावत तिच्याकडे गेल्या. ताबडतोब तिला हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. परंतु शाळेतील रसायनची एक्सपायरी डेट होऊन गेलेली असल्यामुळे तिला फारशी हानी झाली. तिचे प्राण वाचले!

या पुस्तकात शौकत आजमी यांनी शबानाने याच वयात आणखी एकदा आत्महत्येचा प्रयत्न केला होता अशी नोंद या पुस्तकात केली आहे. यावेळी ग्रँट रोडच्या रेल्वे स्टेशनवर जावून धावत्या लोकल खाली जीव द्यायचा प्रयत्न ती करत होती. पण लोकांचे लक्ष गेल्यामुळे तिला तिथे लोकांनी बाहेर ओढले.

भविष्यात मात्र शबानाने स्वत:ला एक परिपूर्ण अभिनेत्री म्हणून सिद्ध केले. तिच्या अभिनय यात्रेत तिला पाच वेळा सर्वोत्कृष्ट अभिनेत्री करीताच्या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अंकुर (१९७४), अर्थ (१९८३), खंडहर (१९८४), पार (१९८५), गॉडमदर (१९९९) हेच ते पाच चित्रपट! १९८३, १९८४ आणि १९८५ अशी सलग तीन वर्षे राष्ट्रीय पुरस्कार मिळवून

तिने हॅट्रिक पूर्ण केली. स्वामी (१९७८), अर्थ (१९८४) आणि भावना (१९८५) या सिनेमातील भूमिकांना तिला फिल्मफेअर पुरस्कार मिळाला!

वैयक्तिक आयुष्यात १९८० साली तिची बेंजामिन गिलानी सोबत एंगेजमेंट झाली होती. पण नंतर १९८४ साली तिने जावेद अख्तर सोबत निकाह केला.

© धनंजय कुलकर्णी

♥

लेख क्र. ३३

आयकर खात्याच्या धाडीने अमिताभचा हा सिनेमा अद्याप प्रदर्शितच नाही झाला!

अमिताभ बच्चन आणि त्यांच्या अर्धवट किंवा प्रदर्शित न झालेल्या चित्रपटांची यादी खूप मोठी आहे. हे चित्रपट पूर्ण का झाले नाही किंवा प्रदर्शित का झाले नाही याची अनेक कारणे आहेत! यातीलच एका अप्रदर्शित सिनेमाची ही कहाणी आणि त्यातील एक किस्सा! दाक्षिणात्य चित्रपट दिग्दर्शक एस. रामनाथन! अमिताभ बच्चन यांचे आवडीचे दिग्दर्शक! कारण त्यांनीच अमिताभला 'बॉम्बे टू गोवा'(१९७२) या चित्रपटात ब्रेक दिला होता. त्यानंतर अमिताभ बच्चन यांची तिहेरी भूमिका असलेला महान (१९८३) या चित्रपटाचे दिग्दर्शन देखील रामनाथन यांनी केले होते. अमिताभ, रजनीकांत आणि कमल हासन यातीन सुपरस्टारला घेवून बनवलेल्या 'गिरफ्तार' (१९८५) ची निर्मिती सुद्धा एस रामनाथन यांचीच होती! १९९६ साली ज्यावेळी अमिताभ बच्चन त्यांच्या पाच वर्षांच्या ब्रेकनंतर पुन्हा चित्रपट दुनियेत आले होते; त्यावेळी

त्यांनी याच रामनाथन यांचा 'जमानत' नावाचा एक चित्रपट साइन केला होता. ६ जून १९९६ या दिवशी या सिनेमाचा मुहूर्त झाला होता. रजनीकांत यावेळी उपस्थित होते. या सिनेमाच्या नावाला '.... अँड जस्टीस फॉर ऑल' ही टॅग लाईन जोडली होती. १९७९ साली याच नावाने अल पचिनो चा एक सिनेमा आला होता आणि तो देखील कोर्ट रूम ड्रामा होता.

या चित्रपटात अमिताभ पहिल्यांदाच एका अंध वकिलाची भूमिका होते. या चित्रपटाचे कथानक एका अंध वकिलाचा जीवनावर होते. एका बॉम्ब-ब्लास्टमध्ये या वकीलाचे डोळे जातात. तो आंधळा होतो. पुढे हा अंध वकील एका खटल्यामध्ये एका प्रामाणिक व्यक्तीला न्याय मिळवून देतो. चित्रपटाची कथानक पूर्णपणे अमिताभ बच्चनभोवती फिरणारे होते. या चित्रपटात अनुपम खेर, करिष्मा कपूर, अर्षद वार्सी यांच्याही भूमिका होत्या!

चित्रपटातील अमिताभच्या अंध भूमिकेला एका काळ्या चष्म्याची (गॉगल) ची गरज होती. दिग्दर्शक एस. रामनाथन यांनी अमिताभ बच्चन यांना एक स्पेशल गॉगल वापरण्यास सांगितले. अमिताभचा हा लूक प्रेक्षकांना खूप आवडेल असे त्यांनी सांगितले. त्यावेळी अमिताभ बच्चन अमेरिकेच्या दौऱ्यावर होते. न्यूयार्कमधून त्यांनी एक सनग्लास (गॉगल) विकत घेतला. अतिशय किमती असलेल्या या सन ग्लासची फ्रेम इटालियन होती. त्याला सोनेरी बोर्डर होती. या ब्रांडेड गॉगलची किंमत होती फक्त दोन लाख सत्तर हजार रुपये!

हा गॉगल घेऊन अमिताभ बच्चन भारतात आले आणि थेट चेन्नईला गेले जिथे 'जमानत' या सिनेमाचे शूटिंग होणार होते. एस. रामनाथन यांना तो गॉगल खूप आवडला आणि हाच गॉगल घालून अमिताभने 'जमानत' या

चित्रपटाचे संपूर्ण चित्रीकरण पूर्ण केले. त्याकाळात अमिताभ बच्चन त्याच्या अन्य व्यवधानांमध्येच जास्त बिझी असल्यामुळे चित्रपटाचे शूटिंग, डबिंग एडिटिंग सर्वच लांबत लांबत गेले. शेवटी कसाबसा हा चित्रपट २००६ साली पूर्ण झाला. सिनेमा पूर्ण झाल्यावर 'गॉगल' अमिताभने दिग्दर्शक एस रामनाथन यांना देवून टाकला.

या चित्रपटातील अमिताभ बच्चनच्या गॉगलची त्या काळात खूप मोठी चर्चा मीडियामध्ये होऊ लागली. त्याच्या किमती अव्वाच्या सव्वा वाढवून मीडिया मधून जाहीर होऊ लागल्या. या अफाट किमतीच्या बातम्या वाचून इन्कम टॅक्स डिपार्टमेंटने सिनेमाचे दिग्दर्शक एस. रामनाथन आणि अमिताभ बच्चन यांना नोटीस बजावली! अमिताभ बच्चन यांनी इन्कम टॅक्स डिपार्टमेंटला कळवले. "आपण समजता तेवढी या गॉगलची किंमत नाही. मीडियातील किमतीचे आकडे चुकीचे आहेत!"

अमिताभ बच्चन यांचे फॅन या कारवाईच्या विरुद्ध चिडले आणि त्यांनी इन्कम टॅक्स डिपार्टमेंट ऑफिससमोर निदर्शने सुरू केली. मामला गंभीर बनत गेला. दोन्ही बाजूनी राडा वाढत गेला. त्यामुळे 'जमानत' या चित्रपटाचे प्रदर्शन लांबले. ते इतके लांबले आहे की हा चित्रपट आजवर प्रदर्शितच झालेला नाही!

२०१३ साली हा चित्रपट पुन्हा एकदा प्रदर्शनासाठी सज्ज झाला परंतू नेमकं त्याच वेळी या चित्रपटाचे दिग्दर्शक एस. रामनाथन यांचे निधन झाल्याने पुन्हा चित्रपटाचे प्रदर्शन लांबणीवर पडले. आता एस रामनाथन यांचा मुलगा हा चित्रपट ओटीटी वर प्रदर्शित करणार असे सांगत आहे!

© धनंजय कुलकर्णी

लेख क्र. ३४

अभिनेता गोविंदाने कसा घेतला शाहरुख खान चा बदला?

समकालीन नायकांमध्ये (आणि नायिकांमध्येही!) कायम कोल्ड वॉर चालू असते. हा लढा वर्चस्वाचा असतो. प्रत्येकाला टॉप वर राहायचे असते. त्यासाठी तो अनेक उचापती करत राहतो. नव्वदच्या दशकामध्ये गोविंदा या अभिनेत्याची मोठी चलती होती. (अलीकडे रीलच्या काळात पुन्हा गोविंदाच्या गाण्यांना जबरदस्त डिमांड आला आहे. त्याची गाणी आणि त्याची डान्स शैली याची आजच्या युवा पिढीवर पण क्रेझ आहे. गोविंदाचे 'मय से मीना से ना साकी से ना पैमाने से दिल बहलता है मेरा आपके आ जाने से.... 'खुदगर्ज' मधील गाणे आज-कालच्या रीलच्या दुनियेत प्रचंड लोकप्रिय आहे.!) गोविंदा

आणि करिष्मा कपूर या जोडीने धुमाकूळ घातला होता. त्यांच्या चित्रपटातील गाणी बऱ्याचदा द्विअर्थी आणि अश्लील गटात मोडणारी असायची पण याच गाण्यांनी गोविंदाला सुपरस्टार बनवले होते, हे नाकारता येत नाही! या दशकात शाहरुख खान याने देखील मायानगरीत पाऊल टाकून 'बाजीगर' पासून तो देखील आघाडीच्या अभिनेत्यांमध्ये गणला जाऊ लागला होता. त्याचे 'कभी हां कभी ना', 'डर', 'राजू बन गया जंटलमन', 'अंजाम', 'करण अर्जुन' हे सिनेमे लोकप्रिय ठरत होते. गोविंदा समोर आव्हान घेवून तो उभा होता. मिडियातूनही दोघांच्या शीत-युद्धावर चर्चा चालू असायची. पण याला जाहीर तोंड फुटले ते रजत शर्मा यांच्या 'आप की अदालत' या टीव्ही शो वरील कार्यक्रमातून!

एकदा रजत शर्मा यांच्या 'आप की अदालत' या लोकप्रिय कार्यक्रमात शाहरुख खानला पाचारण करण्यात आले होते. तिथे शाहरुख खान एका प्रश्नाला उत्तर देताना.. "मी 'सरकायलो खटिया जाडा लगे..' सारख्या गाण्यांमधून 'चीप पॉप्युलरिटी' मिळविणार नाही. मला असला हलका लोकप्रिय होण्याचा प्रकार अजिबात आवडत नाही!" शाहरुख खानचा रोख सरळ-सरळ गोविंदावर होता. परंतु त्याने त्याचे नाव त्या कार्यक्रमात घ्यायचे टाळले होते. परंतु 'समझने वाले को इशारा काफी होता है!" हा कार्यक्रम टेलिकास्ट झाल्यानंतर साहजिकच यावर चर्चा सुरू झाली! गोविंदापर्यंत हा विषय जेव्हा पोहोचला. त्या वेळा त्याने याला सडेतोड उत्तर द्यायचे ठरवले. शाहरुखला उत्तर देताना त्याने एक वेगळा मार्ग अवलंबिला. गोविंदा आणि करिष्मा कपूर यांचा 'कुली नंबर वन' हा चित्रपट त्यावेळेला फ्लोवर वर होता. डेव्हिड धवन या सिनेमाचे दिग्दर्शक होते. यात एक गाणं होतं 'तुझको मिरची

लगी तो मैं क्या करू?' या गाण्याच्या कॅसेट्स आणि सीडीज मार्केटमध्ये आल्या होत्या आणि चांगला धुमाकूळ घालत होत्या. गोविंदाने या गाण्यातच एक आणखी कडवं वाढवायचे ठरवले. त्या पद्धतीने त्याने गीतकार समीर याला बोलावून आपली भूमिका सांगितली. समीरने आता नवीन कडवे लिहिले त्याचे शब्द असे होते. 'मैने जो सरकाई खटीया तो आप को लगा बडा घटिया, लेकीन मैने किसीको बेमौत मारा नही किसीके सीने में खंजर उतारा नही, मै तो इस दुनिया के सर्कस का जोकर हूं, नाचता, गाता सभी का दिल बहलाता हूं. तुझको नाचना न आया तो मै क्या करू?' गोविंदाचा हा शहारूखला जबरदस्त सडेतोड जवाब होता. गोविंदाने दिग्दर्शक डेव्हिड धवनला हा अंतरा सिनेमात घ्यायला सांगितला. त्यावर डेव्हिड धवन यांचे म्हणणे होते.. "ऑलरेडी या गाण्याच्या कॅसेट विकल्या गेल्या आहेत त्यामुळे आता आपल्याला पुन्हा तेच गाणं मार्केटमध्ये आणता येणार नाही!" संगीतकार आनंद मिलिंद यांनी.. "हे नवे कडवे आधीच्या गीताच्या मीटर मध्ये बसत नाही." असे सांगितले. खैर गोविंदाच्या या भावना मिडिया मधून बाहेर आल्या. शाहरुख आणि गीविंदा समकालीन असून एकदाही एकाही सिनेमात एकत्र आले नाहीत.

पुढे काही वर्षांनी शाहरुखने गोविंदाची माफी मागितली आणि २००७ साली 'ओम शांती ओम' या सिनेमाच्या टायटल गीताच्या शूटिंगच्या वेळी गोविंदाला बोलावून सन्मानाने त्याला सामील केले!

© धनंजय कुलकर्णी

♥

लेख क्र. ३५



अनिल कपूरने केली यश चोप्रांची पंचाईत! चक्क सेटवर दिला काम करण्यास नकार...

हा किस्सा नव्वदच्या दशकातील आहे. त्यावेळी अभिनेता अनिल कपूर, माधुरी दीक्षित आणि अनुपम खेर 'खेल' या राकेश रोशन दिग्दर्शित चित्रपटाचे चित्रीकरण केनियामध्ये करत होते. त्यावेळी बोलता बोलता अनुपम खेर यांनी अनिल कपूरला, ते चोप्रा यांच्या आगामी 'परंपरा' या चित्रपटात भूमिका करत आहेत असे सांगितले. अनिल कपूरला देखील यश चोप्राच्या चित्रपटात काम करायची इच्छा होती. तोवर त्याने 'मशाल'(१९८४), 'विजय'(१९८८) आणि 'लम्हे'(१९९१) या चित्रपटात भूमिका केल्या होत्या. केनियाहून परत आल्यानंतर दुसऱ्या दिवशी तडक अनिल कपूर यश चोप्रा यांच्या ऑफिसमध्ये गेला आणि आपल्या आगामी 'परंपरा' या चित्रपटात मला काम करण्याची इच्छा आहे असे सांगितले. यश चोप्रा यांनी अनिल कपूरला सांगितले.. ''तुझ्यासाठी या चित्रपटात सध्या तरी कुठलीही भूमिका नाही.'' तरी अनिल कपूरचा हट्ट कायम होता. शेवटी चोप्रा म्हणाले ''एक भूमिका आहे पण..'' त्यांचे वाक्य संपायच्या आतच अनिल कपूर म्हणाला ''चालेल मला

तीच भूमिका द्या" चोप्रा म्हणाले "आधी ती भूमिका काय आहे हे ऐकून तर घे." त्यावर अनिल कपूर म्हणाला, "मला काही ऐकून घ्यायचे नाही मला तीच भूमिका करायची आहे!" यश चोप्रा पुन्हा पुन्हा त्याला ती भूमिका ऐकून घेण्याचा आग्रह करत होते. पण अनिल कपूर काही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. त्याला काही करून यश चोप्रा यांच्या सिनेमातील भूमिका करायची होती. सर्व युनिटला घेऊन यश चोप्रा राजस्थानच्या उदयपूरला गेले. तिथे गेल्यानंतर ज्यावेळी अनिल कपूरला त्याची ती भूमिका सांगितली गेली त्यावेळी त्याने ती भूमिका साकार करायला नकार दिला! कारण ती भूमिका आमिर खान आणि सैफ अली खान यांच्या वडिलांची होती. अनिल कपूर त्यावेळी हिंदी सिनेमाचा नायकाच्या भूमिका करत असताना अशी वडिलांची भूमिका कशी करणार? तो करायला तयार झाला नाही. यश चोप्रांनी त्याला सांगितले, "तरी मी तुला पुन्हा पुन्हा ती भूमिका काय आहे ते ऐकून घे म्हणत होतो! पण तू ऐकायला तयारच नव्हता. आता प्रॉब्लेम झाला मी कुणाला या भूमिकेसाठी बोलावणार?" पण अनिल कपूरने 'सॉरी' म्हणून ती भूमिका साकार करायला असमर्थता व्यक्त केली..!

यश चोप्रांसमोर मोठा पेच प्रसंग निर्माण झाला. सर्व युनिट लोकेशनवर पोचलेलं होतं. या सर्वांचा अवाढव्य खर्च होत होता आणि अशा वेळी अनिल कपूरने नकार दिला. खरं तर चूक अनिलची होती पण फटका चोप्रा यांना बसत होता. काय करायचे? खरं तर त्यांना या भूमिकेसाठी जॅकी श्रॉफला घ्यायचे होते. त्यांनी राजस्थान मधून जॅकी ला विचारले. पण त्या वेळेला सुभाष घईच्या सोबत एका चित्रपटात काम करत होता म्हणून त्याने नकार दिला. आता चोप्रांची काळजी आणखी वाढली. काय करावे? मग विचार करून रात्री त्यांनी

अभिनेता विनोद खन्नाला सर्व प्रकार सांगितला. विनोद खन्नाने देखील मोठ्या मनाने मी शूटिंगला लवकरच येतो असे सांगितले. आणि चोप्रांच्या जीवात जीव आला. अशाप्रकारे 'परंपरा' या सिनेमात विनोद खन्नाची एन्ट्री झाली. अनिल कपूरवर मात्र यश चोप्रा खूप नाराज झाले आणि पुढे अनिल कपूर चोप्रांच्या कुठल्याच सिनेमात दिसला नाही!

अनिल कपूर सोबत काम करायला मिळणार म्हणून आश्विनी भावेने हा सिनेमा साईन केला पण त्याने नकार दिल्याने त्याच्या जागी विनोद खन्नाची वर्णी लागली. इकडे अश्विनी भावेची पंचाईत झाली. विनोद खन्नाची नायिका झाल्याने 'माझ्यावर तसेच Stamping होईल आणि नायिका म्हणून माझे करीयर गोत्यात यईल..!' अशी तिला भीती वाटू लागली. पण यश चोप्राने तिला समजावले. त्यामुळे ती थांबली. पण सिनेमाचे निर्माते फिरोझ नाडियादवाला मात्र अश्विनीवर नाराज झाले! सिनेमा पूर्ण झाल्यावर त्यानी अश्विनीला त्यांच्या आगामी 'राम शास्त्र' मधून डच्चू दिला.

हा सिनेमा मल्टी स्टारर होता. सुनील दत्त, विनोद खन्ना, अमीर खान, सैफ अली खान, रवीना टंडन अश्विनी भावे, अनुपम खेर, रमैय्या, नीलम.....! संगीत शिव-हरीचे होते. यातील नायिकांवर चित्रित सर्व गाणी लताने गायली होती. या सिनेमात खरं तर आधी नीलमची भूमिका दिव्या भारती करणार होती पण तिच्या अकाली निधनाने ही भूमिका नीलमकडे आली. या सिनेमाचे चित्रीकरण अजमेर राजस्थान येथील सुप्रसिध्द मायो कॉलेजमध्ये झाले. सर्व माल मसाला ठासून भरलेला असून 'परंपरा' हा सिनेमा सुपर फ्लॉप ठरला!

© धनंजय कुलकर्णी

लेख क्र. ३६

अंगात १०३ ताप असताना श्रीदेवीने शूट केलं हे सुपर हिट गाणं!

दिग्दर्शक पंकज पराशरने १९८८ साली एक चित्रपट दिग्दर्शित केला होता 'चालबाज'! हा या वर्षीचा बम्पर-हिट सिनेमा होत! या सिनेमाच्या शूटिंगच्या दरम्यानचा हा किस्सा आहे! श्रीदेवीच्या कामावरील श्रद्धा, डेडीकेशन दाखवणारा आहे! 'चालबाज' हा सिनेमा रमेश सिप्पी यांच्या १९७२ सालच्या 'सीता और गीता' चा रीमेक होता! हा अनेक अर्थाने महत्वपूर्ण असा बॉलीवूडमधील सिनेमा होता. हिंदी सिनेमातील 'बेस्ट डबल-रोल मुव्हीज' मध्ये याचा समावेश होतो. या चित्रपटात श्रीदेवी, रजनीकांत आणि सनी देवल यांच्या प्रमुख भूमिका होत्या. 'सारांश' नंतर अनुपम खेर आणि रोहिणी हत्तंगडी पहिल्यांदाच 'विअर्ड' अवतारात या सिनेमात होते! अनुपम खेर याने

प्लास्टिकचे नकली नाक त्याच्या ओरीजनल नाकावर बसवल्याने तो तर ओळखूच येत नव्हता. हे दोघेही सिनेमात निगेटिव्ह रोल मध्ये होते. या सिनेमात श्रीदेवी या चित्रपटात काम करण्यासाठी खूप उत्सुक होती; कारण पहिल्यांदाच हिंदी सिनेमात डबल रोल करत होती. सनी देओल आणि रजनीकांत या दोघांच्या भूमिका श्रीदेवीच्या तुलनेने खूपच कमी लांबीच्या होत्या. पण सनी साठी हा सिनेमा इमोशनली जवळचा होता कारण 'सीता और गीता' या सिनेमात धर्मेंद्रने भूमिका केली होती! दिग्दर्शक पंकज पराशर पुण्याच्या एफ. टी. आयचा विद्यार्थी! १९८५ सालच्या दूरदर्शनवर अफाट गाजलेल्या 'करमचंद' या सिरीयलने त्याला प्रसिद्धी दिली. 'चालबाज' हा त्याच्या कारकिर्दीतील सर्वात हिट ठरलेला सिनेमा! आता मूळ किस्याकडे येवू! या सिनेमात एक गाणं होतं 'ना जाने कहा से आई है ये ना जाने किधर को जायेगी ये लडकी.....' कविता कृष्णमूर्ती यांनी हे गाणं गायलं होतं! लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांनी स्वरबध्द केलेलं हे गाणं स्टीव्ह वंडर यांच्या 'पार्ट टाईम लव्हर' या गाण्याच्या चालीवर बनवलं होतं! या गाण्याचे संपूर्ण चित्रीकरण पावसात करायचे होते! अर्थात स्टुडिओमधील खोटा खोटा कृत्रिम पाऊस होता! पहिल्या दिवशी चित्रीकरणात दिवसभर सात-आठ तास श्रीदेवी पाण्यात प्रचंड भिजली! तिचा उत्साह प्रचंड होता! या गाण्याची कोरिओग्राफी सरोज खान यांची होती. यातील श्रीदेवीच्या डान्स स्टेप्स, गाण्याचा ऱ्हिदम सर्वच भारी होतं! दिवसभर पाण्यात भिजल्याने संध्याकाळी श्रीदेवीला ताप आला. सकाळी उठल्यानंतर तिचं अंग प्रचंड दुखत होतं आणि अंगात १०३ ताप होता. पण त्याही अवस्थेत पेन किलर घेवून ती सेटवर पोचली. तिच्यामते शूटिंगला जाणे गरजेचे होत! कारण मोठा सेट लागला होता. शिवाय सनी देवल सारख्या बिझी स्टार सोबत

तिचे शूट होते. पंकज पराशर, सरोज खान आणि सनी देओल यांनी श्रीदेवीची हालत पहिली... आपण आजचे शूटिंग कॅन्सल करूयात असे सांगितले. पण श्रीदेवी म्हणाली.. "नको, मी शूटिंग करू शकेन!" सर्वांनी पुन्हा पुन्हा सांगून पहिले पण श्रीदेवी ऐकायला तयार नव्हती. अंगात १०३ ताप असताना प्रचंड बॉडी-पेन असताना तिने दिवसभर पुन्हा सात आठ तास पाण्यात भिजून उरलेले गाणे पूर्ण केले!

आज आपण जेव्हा हे गाणे पाहतो तेंव्हा आपल्या लक्षात पण येत नाही की हे गाणे चित्रित होत असताना श्रीदेवी आजारी होती, तिच्या अंगात ताप होता. पण तिचे डेडिकेशन, कामावरची श्रद्धा इतकी प्रचंड होती की तिने आपल्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करून हे गाणे चित्रित केले. या गाण्यानंतर ती तब्बल दोन आठवडे अंथरुणावर पडून राहिली. तिला फ्लू झाला होता. अंगात प्रचंड विकनेस आला होता. पण ह्या गाण्याचं भाग्य थोर की या गाण्याची गायिका कविता कृष्णमूर्ती, या गाण्याची कोरिओग्राफर सरोज खान आणि अभिनेत्री श्रीदेवी या तिघींना त्या वर्षीचे फिल्म फेअर अवॉर्ड मिळाले!

© धनंजय कुलकर्णी

लेख क्र. ३७

जेंव्हा लहानग्या सैफ अली खानने केली शशी कपूरची गुंडापासून सुटका!

सेलेब्रिटींच्या लहानपणीचे किस्से मोठे चवीने ऐकले जातात. वाचले जातात. हा आहे अभिनेता सैफ अली खान यांच्या लहानपणीचा मनोरंजक किस्सा! १९७३ साली दिग्दर्शक प्रयागराज एक चित्रपट दिग्दर्शित करीत होते. 'पाप और पुण्य' सत्तरच्या दशकातील टिपिकल मसाला पट होता. डाकूपट होता. सिनेमाला कल्याणजी-आनंदजी यांचे संगीत होते. गायिका कांचनने या सिनेमापासून पार्श्वगायनाची सुरुवात केली. या चित्रपटात शशी कपूर डबल रोल मध्ये होता तर शर्मिला टागोर, असरानी, अजित, अरुणा इराणी यांच्या प्रमुख भूमिका होत्या. या सिनेमाला अजिबात यश मिळाले नाही! आज कुणाला या सिनेमाचे नाव आठवण्याची सुतराम शक्यता नाही. पण या चित्रपटाच्या शूटिंगच्या दरम्यान घडलेला एक किस्सा मनोरंजक आहे!

या चित्रपटाचे चित्रीकरण राजस्थानमध्ये चालू होते. शशी कपूर आणि शर्मिला टागोर हे दोघेही आपल्या कुटुंबासमवेत राजस्थानमध्ये उपस्थित होते. त्यावेळी सैफ अली खान केवळ तीन वर्षाचा होता. (जन्म : १६ ऑगस्ट १९७०). लहान सैफ सेटवर सगळ्या युनिटचा लाडका होता. अभिनेता शशी कपूरसोबत त्याची खूपच मैत्री झाली. शशी कपूर रोज शूटिंग झाल्यानंतर सैफला घेऊन बाहेर फिरायला घेवून जात असतं. त्याला चॉकलेट आईस्क्रीम खाण्याचा खूप शौक असल्यामुळे त्याचे सगळे लाड शशी कपूर पुरवत असे. सैफ सेटवर देखील शशी अंकलच्या मागे मागे असायचा. या दोघांची खूपच गट्टी झाली होती. सैफसाठी शशी अंकल म्हणजे 'बेस्ट फ्रेंड' होता.

या चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या दरम्यान एक फाईट सीन चालू होता. एक गुंडा शशी कपूरला मारत असतो, असा तो शॉट होता. गुंड व्यक्तीची भूमिका करणाऱ्या कलाकाराने शशी कपूरची मान आपल्या हातामध्ये दाबून ठेवली आणि शशी कपूर आपली मान त्याच्या हाताच्या मिठीतून सोडवण्याचा प्रयत्न करतो असा तो शॉट होता. कॅमेरा दोघांच्याही चेहऱ्यावर होता. शशी कपूर मोठा प्रयासाने आपला चेहरा त्याच्या वज्रमुठीतून सोडवण्याचा प्रयत्न करत असतो आणि तो खलनायक हाताने मात्र त्याची मान मुरगळत असतो. दोन-तीन रिहर्सल झाल्या. फायनल टेक घेत असताना अचानक खलनायकाची भूमिका करणारा कलाकार जोरात किंचाळला, ओरडला आणि त्याने हाताची पकड ढिली केली!

कॅमेरा चेहऱ्यावर झूम असल्यामुळे कुणालाच काही कळाले नाही. पण दिग्दर्शकाने कट कट असा आवाज केला! तो खलनायकाची भूमिका करणारा कलाकार मोठ्या वेदनेने विव्हळत होता. सगळ्यांना सुरुवातीला काहीच

कळाले नाही. पण नंतर लक्षात आले की लहानग्या सैफने त्या खलनायकाच्या पायाचा कडकडून चावा घेतला आहे आणि तो त्याचा पाय सोडायला तयार नाही! सेटवर सगळेजण जोरजोरात हसू लागले. शशी कपूर ने सैफला 'नो' नो' म्हणत दूर करण्याचा प्रयत्न केला. पण सैफ काही ऐकायला तयार नव्हता. त्याने हातात येईल ती सेटवरची वस्तू त्या खलनायकाला फेकून मारायला सुरुवात केली. चिमुकल्या हाताने त्याला तो बुक्के मारायला लागला! कारण त्याच्या लाडक्या शशी अंकलला ती व्यक्ती मारत होती हे त्याला सहन होत नव्हतं. त्याच्या परीने गुंडाच्या तावडीतून तो आपल्या शशीअंकल ला सोडवत होता. युनिट वरील सगळयांचे हसणे चालू होते पण खलनायकाची भूमिका करणारा कलाकार मात्र सैफच्या दंत-दंशाने विव्हळत होता!

© धनंजय कुलकर्णी

♥

लेख क्र. ३८



‘दे दे प्यार दे’ गाण्याच्या चालीचे मूळ रुना लैलाच्या गाण्यात होतं?

‘ऋषिचे कूळ आणि नदीचे मूळ’ शोधू नाही असे म्हणतात त्याचप्रमाणे गाण्याच्या चालीचे मूळ देखील शोधायचे नाही कां ? एका लोकप्रिय गाण्याच्या चालीची मूळ कथा खूपच मनोरंजक आहे ! रुना लैला या गायिकेने सत्तरच्या दशकामध्ये भारतीय संगीताच्या दुनियेत मोठी हलचल निर्माण केली होती. त्या काळात ती पाकिस्तान आणि बांगला देशात मध्ये प्रचंड लोकप्रिय होतीच. तिचा जन्म (१७ नोव्हेंबर १९५२) पूर्व पाकिस्तानात झाला (आताचा बांगलादेश). साठच्या दशकाच्या उत्तरार्धात तिने गायला सुरुवात केली आणि चांगलीच लोकप्रिय ठरली. सत्तरच्या दशकाच्या मध्यावर ब्रिज दिग्दर्शित ‘एक से बढकर एक’ या चित्रपटापासून तिने भारतीय चित्रपटात गायला सुरुवात केली. कल्याणजी आनंदजी यांचे संगीत असलेला हा सिनेमा फारसा चालला नाही पण यातील रुना लैला चे शीर्षक गीत बिनाका गीत मालात चांगलेच

गाजले. याच काळात भारतात डिस्को संगीताचे आगमन सुरू झाले होते. 'कुर्बानी' चित्रपटातील नाझीया हसन हिने गायलेले 'आप जैसा कोई मेरे जिंदगी मे आये' हे संगीतकार बिडडू यांनी संगीत केलेले डिस्को सॉंग प्रचंड लोकप्रिय ठरले. याच काळात बप्पी लहरी यांनी देखील डिस्को संगीत चित्रपटाच्या माध्यमातून द्यायला सुरुवात केली. नंतर सर्वच संगीतकार डिस्कोच्या पाठीशी लागले. राहुल देव बर्मन पहिल्यापासूनच पाश्चात्त्य संगीताचे भोक्ते होतेच. त्यांनी देखील डिस्को संगीताला प्राधान्य द्यायला सुरुवात केली. 'प्यारा दुश्मन' (संगीत : बप्पी लहरी) या सिनेमातील उषा उथुप ने गायलेलं 'हरी ओम हरी' त्या काळात तरुणाईच्या ओठावर होते! अरमान, डिस्को डान्सर, सनम तेरी कसम, हथकडी... या सिनेमातील डिस्को गाणी बेफाम गाजत होती! या काळात डिस्को गाण्याचे अनेक प्रायव्हेट अल्बम देखील येऊ लागले. नाझिया हसन यांचा 'डिस्को दिवाने' हा अल्बम त्याकाळात खूप गाजला होता. या अल्बमला संगीत बिडडू यांचेच होते नाझिया हसन आणि तिचा भाऊ झोयेब हसन यांनी या अल्बम मध्ये गाणी गायली होती. 'आओ ना प्यार करे' आणि 'डिस्को दिवाने' ही या अल्बम गाणी प्रचंड लोकप्रिय झाली होती! याची लोकप्रियता पाहून दिग्दर्शक विनोद पांडे यांनी कुमार गौरव आणि रती अग्नीहोत्रीला घेवून याच वर्षी म्हणजे १९८२ साली 'स्टार' या चित्रपटाची निर्मिती केली. नाझिया हसन आणि संगीतकार बिडडू हेच कॉम्बिनेशन होतं!

डिस्कोची लोकप्रियता पाहून बप्पी लाहिरी यांनी रुना लैलाला घेवून याच वर्षी एक प्रायव्हेट अल्बम आणला होता. या अल्बम च नाव होतं 'सुपर रुना'. हा अल्बम म्हणजे सबकुछ 'रुना लैला' होता! यातली गाणी अंजान यांनी लिहिली होती. हा अल्बम त्या काळात 'डिस्को दिवाने' इतका चालला नाही.

पण यातली गाणी भारी होती. याच अल्बम मधील एक गीत बप्पी लहरी यांनी १९८४ सालच्या प्रकाश मेहरा यांच्या 'शराबी' चित्रपटात वापरलं आणि बंपर हिट ठरलं. रूना लैला यांच्या अल्बम मधील गाण्याची सही सही चाल इथे देखील वापरली होती. गाण्याचे बोल होते 'दे दे प्यार दे प्यार दे..' या गाण्यात फक्त हमे प्यार दे असा शब्द होता. मूळ अल्बम मध्ये 'मालिक प्यार दे' असा शब्द होता. चित्रपटात ज्यावेळी हे गाणं पुरुष आणि स्त्री दोघांच्या स्वरात रेकॉर्ड करायचं ठरलं; त्यावेळेला सहाजिकच रुनाला हे गाणं आपल्या स्वरात रेकॉर्ड व्हावे असे वाटले कारण मूळ गाणे ने गायले होते. पण नंतर काय चक्रे फिरली माहीत नाही हे गाणे रुना लैलाला हिला न गाता आशा भोसले यांच्या स्वरात रेकॉर्ड झाले. सिनेमातील किशोर आणि आशा यांच्या स्वरातील दोन्ही गाणी प्रचंड लोकप्रिय ठरली. रुना लैलाचे दुर्दैव पहा मूळ अल्बम दोन वर्षांपूर्वी आला, फारसा लोकप्रिय झाला नाही पण त्याची कॉपी करून जेव्हा चित्रपटातून तेच गाणे आले तेव्हा त्या गाण्याला संपूर्ण देशभरात मोठी लोकप्रियता लाभली! नशीब नशीब म्हणतात ते असं.

या गाण्याच्या मूळ चालीचा शोध घ्यायला गेलं असताना असं दिसतं की एक जुनं बांगला लोकगीत होतं ज्याची चाल या गाण्यासाठी वापरली गेली होती. या पूर्वी १९६५ साली सचिन द बर्मन यांनी देखील ही चाल 'गाईड' चित्रपटात 'अल्ला मेघ दे पाणी दे' या गाण्यासाठी वापरली होती. तेंव्हा देखील ते फारसे गाजले नाही. शराबीच्या गाण्यांनी मात्र दंगा केला! नशीब असते एकेका गाण्याचं आणि गाणाऱ्याचं!

© धनंजय कुलकर्णी

♥

SUPERUNA
BAPPI LAHIRI PRESENTS RUNA LAILA

♥

लेख क्र. ३९



तब्येत बरी नसतानाही रफीने गुलशन बावरा साठी केले पुन्हा रेकॉर्डिंग!

पार्श्वगायक महंमद रफी यांच्या निधनाला पंचेचाळीस वर्षाहून अधिक कालावधी उलटला असला तरी त्यांच्या बाबतचे हरएक किस्से आजही मोठ्या चवीने चाहत्यांमध्ये चर्चिले जातात. महंमद रफी यांनी कायमच तुलनेने छोटे संगीतकार, छोटे कलाकार यांच्यासाठी खूप मोठं असं काम केलं होतं. हा किस्सा आहे प्रकाश मेहरा यांच्या १९७३ साली प्रदर्शित झालेल्या 'जंजीर' या चित्रपटाच्या एका गाण्याच्या रेकॉर्डिंगच्या वेळेचा! या चित्रपटात महंमद रफी आणि लता मंगेशकर यांनी गायलेलं 'दिवाने है दिवानो को ना घर चाहिये न दर चाहिए मोहब्बत भरी एक नजर चाहिए...' हे गाणं होतं. संगीतकार होते कल्याणजी-आनंदजी. या गाण्याचे रेकॉर्डिंग चालू होतं. त्या दिवशी रफीची तब्येत थोडी बरी नव्हती. तसेच तो रमजानचा महिना चालू असल्यामुळे,

सातत्याने उपास असल्यामुळे थोडा अशक्तपणा देखील जाणवत होता. पण रफी आपल्या वक्तशीरपणासाठी खूप मशहूर होते; त्यामुळे ठरलेल्या वेळी रफी रेकॉर्डिंग स्टुडिओ मध्ये आले. सुरुवातीला गाण्याच्या रिहर्सल झाल्या. फायनल टेक घ्यायची वेळ आली. रफी आणि लता मंगेशकर मोठ्या समरसून हे गाणे गात होते!

पण त्या दिवशी काय अडचण झाली कळत नाही पण फायनल टेकच्या वेळी अडथळे येत होते. (तो काळ लाईव्ह रेकॉर्डिंगचा होता.) कधी कुठला वादक चुकत होता तर कधी कुठल्या वाद्यातून हवा तो सूर मिळत नव्हता. टेक्निकल प्रॉब्लेम खूप येत होते. सलग पाच-सहा टेक झाले पण सर्व एन.जी. (म्हणजे नॉट गुड प्रकारचे) टेक होते. रफी साहेब वैतागले. लतादीदी आणि रफीदेखील बाहेरून बसले. शेवटी कल्याणजी-आनंदजी यांनी आणखी एक ते घेऊयात असे सांगून पुन्हा एकदा दोघे माईकच्या जवळ आले. गाण्याचा टेक सुरू झाला, संपला! कानाचा हेडफोन बाजूला काढून रफीने विचारले, "आता गाणे ओके झाले ना?" त्यावेळी कल्याणजी-आनंदीजी पैकी कल्याणजी यांनी मान डोलावली. रफीसाहेब लगेच रेकॉर्डिंग स्टुडिओतून बाहेर पडले आणि गाडीत जाऊन बसले. इकडे लता मंगेशकर आणि संगीतकार जोडीने ते रेकॉर्ड झालेलं गाणं पुन्हा ऐकून पाहिलं त्यावेळी त्यांना त्या गाण्यात पुन्हा काही त्रुटी आढळल्या आणि गाणं पुन्हा एकदा रेकॉर्डिंग करायचे ठरले! कल्याणजीभाई स्वतः बाहेर गेले आणि रफीला त्यांनी सांगितले, "रफी साहब आणखी एक टेक घ्यावा लागेल!" त्यावेळेला मात्र रफी नाराज झाले आणि म्हणाले.. "तुम्ही आत्ता तर ओके म्हणाला होता आता पुन्हा कसं काय नाही म्हणता?" त्यावर

कल्याणजीभाई म्हणाले.. ”काय करणार? टेक्निकल प्रॉब्लेम झालाय, कृपया तुम्ही पुन्हा रेकॉर्डिंगला या.” असे म्हणून ते निघून गेले.

रफीची तब्येत बरी नव्हती प्रचंड अशक्तपणा आला होता. काय करावे? तितक्यात गीतकार गुलशन बावरा पळत पळत रफीकडे आले आणि म्हणाले.. ”रफी साब प्लीज दोबारा इस गाने को रेकॉर्ड कीजिए. आप जानते है ये गाना किस पर पिक्चराइज होने वाला है?” रफी थोडे नाराज होते. ते म्हणाले, ”किस पर दिलीपकुमार पर या देवानंद पर?” त्यावर गुलशन बावरा म्हणाले.. “नही रफी साब, ये गाना तुम्हारे सामने खडे हुए इस बच्चे यानी मुझपर पिक्चराइज होनेवाला है. और इसका शुटींग कल होने वाला है. आप प्लीज मेरे लिये दुबारा गाईये. मै जानता हूं आपकी तबीयत नासाज है. प्लीज. मेरे करीयर का सवाल है!” गुलशन बावराच्या डोळ्यातील आर्जवी भाव पाहून रफी यांचे मन द्रवले. त्यांनी स्वतःच्या तब्येतीकडे दुर्लक्ष करून त्याच्या पाठीवर थाप मारली.. ”ये बात है तो चल.. अरे तुने मुझे पहिले क्यू नही बताया?” असं म्हणून रफी पुन्हा रेकॉर्डिंग स्टुडिओ मध्ये आले आणि गाणे रेकॉर्ड केले!

या गाण्यांमध्ये गुलशन बावरा सोबत नाचणारी अभिनेत्री आहे संजना! या अभिनेत्रीचे खरे नाव रेहाना खान होते. तिने अनेक कलावंतांसोबत चित्रपटात छोट्या छोट्या भूमिका केल्या. पण तिचा अंत अतिशय दुर्दैवी झाला! ती स्वतः शेवटी कॅन्सरची शिकार झाली. आयुष्यात कमावलेलं होतं नव्हतं सर्व विकावं लागलं आणि सरते शेवटी ती अक्षरशः रस्त्यावर आली. शेवटी २०१२ साली तिने इंडिया टीव्हीवर आपली कैफियत सुनावली. करोडो रुपयांचा बिझनेस करणारे बॉलिवूड तिचे प्राण वाचवू शकले नाही. या

गाण्याच्या निमित्ताने अभिनेत्री संजनाची हे दर्दभरी आठवण देखील सांगावीशी वाटली!

© धनंजय कुलकर्णी

♥

लेख क्र. ४०

दिलीपकुमारने बारसं केलेलं अनोखं 'कॉकटेल' एके काळी प्रचंड लोकप्रिय होते!

हा किस्सा आहे निर्माता/दिग्दर्शक अमरजीत यांचा! हा किस्सा तसा 'नॉन फिल्मी' जरी असला तरी सिनेमाशी निगडित असाच आहे! अमरजीत साठ आणि सत्तरच्या दशकामध्ये अनेक हिट चित्रपटांचे दिग्दर्शक होते. त्यांचे 'हम दोनो', 'तीन देवीया', 'गॅम्बलर' हे सिनेमे खूप गाजले होते. देव आनंदचे ते लाडके दिग्दर्शक होते! संजय दत्तचा पहिला सिनेमा 'रॉकी' ही त्यांचीच निर्मिती होती. अमरजीत हे बहुआयामी कलावंत होते. त्यांनी काही सिनेमातून अभिनय देखील केला होता. दिग्दर्शक अमरजीत पहिल्यांदा प्रेक्षकांसमोर आला तो १९६१ सालच्या 'हम दोनो' या चित्रपटातून. संगीतकार जयदेव यांचे

अतिशय कर्णमधुर संगीत असलेला हा चित्रपट देव आनंदच्या यशस्वी चित्रपटांपैकी एक समजला जातो1 यात देवचा डबल रोल होता. या सिनेमाचे दिग्दर्शन अमरजीत यांनी केले असले तरी त्याच्या पाठीमागे विजय आनंदचा अदृश्य हात होता हे कुणीही नाकबूल करणार नाही! १९६५ साली 'तीन देवीया' हा चित्रपट अमरजित यांनी दिग्दर्शित केला. 'लिखा है तेरी आंखोमे किसका फसाना..', 'अरे यार मेरी तुम्ही हो गजब..', 'ख्वाब हो तुम या कोई हकीकत..', 'कही बे-खयाल होकर..' ही अप्रतिम गाणी या चित्रपटात होती. अमरजीत यांनी दिग्दर्शित केलेला हा सिनेमा कृष्णधवल जरी असला तरी आजही रसिकांच्या स्मरणात आहे. १९७० सालचा 'गॅम्बलर' हा सिनेमा देव आनंद आणि जाहिदा यांच्या मुख्य भूमिका असलेला अमरजीत यांनी दिग्दर्शित केलेला चित्रपट होता! यात देखील सचिनदा यांच्या संगीतातील गाणी प्रचंड गाजली. 'अपने होठो की बन्सी बनाले मुझे..', 'चुडी नही मेरा दिल है..', 'दिल आज शायर है, गम आज नगमा है.. ' ही गाणी आजही रसिकांच्या स्मरणात आहेत. त्यांच्या 'तीन देवीया' या चित्रपटाचे इंग्रजी व्हर्शन देखील 'अ बॉय थ्री गर्ल्स' या नावाने आले होते. या सिनेमाला 'ए' सर्टिफिकेट होते! अमरजीत यांची दिग्दर्शनाची इमेज ही कायम दुर्लक्षित राहिली. त्यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटांवर विजय आनंद आणि देव आनंद यांचा पगडा असल्याने अमरजीत यांचे कर्तुत्व कायम झाकूनच राहिले!

नर्गिस दत्त यांचे भाऊ अख्तर हुसेन यांचे अमरजीत जावई होते. अख्तर हुसेन यांची मुलगी रेहाना ही त्यांची बायको होती. अमरजीत यांची आणखी एक खासियत होती ते 'कॉकटेल' खूप चांगल्या पद्धतीने बनवत होते! फिल्मी पार्ट्यांमध्ये 'कॉकटेल' बनवण्यामध्ये ते खूप माहीर होते. मिरचीच्या चटणीचा

कॉकटेलमध्ये वापर करून त्याला ती वेगळीच चव आणून देत होते. रशियन व्होडका मध्ये हिरवी मिरची कापून नुसती फिरवल्यानंतर त्याचा फक्त स्वादच वाढवत नाही तर त्यामुळे बसणारी किक देखील वेगळी असते हे त्यांनी सिद्ध करून दाखवले होते. त्यामुळेच फिल्मी दुनियेत त्यांचे नाव 'कॉकटेल मास्टर' म्हणून फेवरेट झाले होते. त्यांच्या कॉकटेल्स चा सगळीकडे बोलबाला होता.

१९७४ साली सुनील दत्त यांच्या 'नहले पे दहला' या चित्रपटाचा ट्रायल शो होता! या सिनेमाची नायिका सायरा बानो होती. या ट्रायल 'शो' ला दिलीप कुमार यांना निमंत्रित केले होते. दिलीप कुमार सारख्या मोठ्या हस्तीचे आगत-स्वागत करण्याची संपूर्ण जबाबदारी सुनील दत्त यांनी अमर जीत यांच्यावर सोपवली होती! सगळेकडे ताज्या टवटवीत फुलांच्या सुशोभित लॉनवर पार्टी चालू होती. त्यावेळी अमर जीत यांनी दिलीप कुमार यांच्यासाठी मस्त कॉकटेल बनवून पेश केले! दिलीप कुमार यांना त्याचा स्वाद खूपच आवडला! त्यांनी अमर जीतला जवळ बोलून विचारले, "या कॉकटेलचे नाव काय आहे ?" त्यावेळी अमर जीतने सांगितले, "याचे अजून नाव काहीच ठरले नाही. आज पहिल्यांदाच आपल्यासाठी बनवले आहे! आता आपणच याचे बारसे करावे!" दिलीप कुमारन खुश झाले! हसत हसत त्यांनी आजूबाजूला पाहिले. सर्वत्र त्यांच्या स्वागतासाठी फुलांचे ताटवे उभारले होते. ते पाहून अमरजीतला म्हणाले, "आज से हम इस कॉकटेल का नाम रखते है 'गुल- ए-मेहेर' !" उर्दूमध्ये मेहेर या शब्दाचा अर्थ प्रेम असा होतो. त्यानंतर दिग्दर्शक अमर जीत या कॉकटेलला 'गुल ए मेहेर' या नावानेच पुकारू लागले. अनेक हॉटेल्समध्ये त्यांचा हा 'ब्रँड' त्या काळात प्रचंड लोकप्रिय ठरला होता. अनेक फिल्मी पार्ट्यांना या कॉकटेलने बहार आणली! खुद्द दिलीप कुमारने त्याचे

बारसे केल्याने ते अधिक लोकप्रिय ठरले! योगायोगाने याच काळात दिलीप कुमार यांचा 'बैराग' हा चित्रपट देखील प्रदर्शित होत होता. या चित्रपटातील एक गाणे 'पीते पीते कभी कभी यूं जाम बदल जाते है...' हे गाणं प्रचंड लोकप्रिय झालं होतं!

© धनंजय कुलकर्णी

♥

लेख क्र. ४१

...आत्महत्या करायला निघालेला हा गायक परत फिरला आणि बनला सुपर सिंगर!

आयुष्यात नियतीने लिहून ठेवलेला प्राक्तन कुणीही पुसू शकत नाही असं म्हटलं जातं. उर्दूमध्ये एक खूप लोकप्रिय शेर आहे 'मुद्दई लाख बुरा चाहे तो क्या होता है वही होता है जो मंजुर ए खुदा होता है.....' कलावंतांच्या बाबतीत तर या गोष्टीचा प्रत्यय कायम येत असतो. ७ ऑक्टोबर १९७३ रोजी जन्मलेल्या एका उत्तर प्रदेशातील लोकसंगीत गाणाऱ्या कलावंताच्या मुलाच्या वाट्याला असंच आयुष्य आलं होतं. हा मुलगा घरीच संगीताचे बाळकडू मिळाल्यामुळे वयाच्या चौथ्या वर्षापासून गात होता. अतिशय मोकळा खडा पहाडी आवाज त्याला लाभला होता. त्यामुळे लोकसंगीत त्याच्या आवाजातून खूप छान पद्धतीने येत होतं. शाळेत असताना हा कायम लोकगीते गाऊन प्रेक्षकांचे मनोरंजन करीत असे. हा मुलगा जेव्हा १४ वर्षाचा झाला त्यावेळी

त्याने गाण्यातच करिअर करायचे ठरवले. परंतु घरून अर्थातच या निर्णयाला विरोध झाला. 'गाणं छंद म्हणून ठीक आहे; व्यवसाय म्हणून करायचा असेल तर भिकेच्या डोहाळे लागतील!' असं त्याला म्हणू लागले. पण याच्या मनात जिद्द अफाट होती. गाण्यातच करिअर करायचं हे त्याने ठरवलंच होतं.

घरातून पळून जाऊन त्याने दिल्ली गाठले. इथे त्याने संगीताचे क्लासेस सुरू केले. त्यातून होणाऱ्या अर्थाजनातून तो स्वतः देखील संगीताचे पुढचे शिक्षण घेऊ लागला. खूप मोठा संघर्ष होता. स्वतःला प्रस्थापित करायचे होते. हाती काहीही पैसा नव्हता. त्याच्या मित्रांनी त्याला सांगितले 'काहीतरी जोडधंदा सुरू कर' म्हणून त्याने हॅंडीक्राफ्ट वस्तू विकण्याचा व्यवसाय सुरू केला. दिल्लीच्या प्रगती मैदानावर स्टॉल घेऊन त्याने या व्यवसायाचा श्री गणेशा केला. यासाठी बँकेकडून कर्ज देखील काढले. पण यात त्याला मोठा तोटा झाला. देणेकरी दारात उभे राहिले. सगळीकडून पैशाचा तगादा सुरू झाला. यातून तो प्रचंड नैराश्या मध्ये गेला. आपल्या हातून काहीच घडू शकत नाही याची त्याला जाणीव झाली. आपण या जगात जगण्याच्या लायकीचे नाही अशी भावना त्याच्या मनात येऊ लागली. यातूनच त्याने टोकाचा निर्णय घेतला आणि तो आत्महत्या करायला निघाला. पण एका भल्या माणसाने त्याला आत्महत्या पासून परावर्तन केले आणि वाचवले!

तिथून तो थेट ऋषिकेशला गेला. साधुसंतांच्या सोबत राहून तो भजने गावू लागला. खड्या आवाजातील त्याची भजने लोकप्रिय होऊ लागली. आपल्याला गाणे गायला जमू शकते. याची त्याच्या मनाने परत उभारी घेतली आणि त्याने दिल्लीला जायचा निर्णय घेतला. दिल्लीहून तो मायानगरी मुंबईला आला २००१ साली. आल्यानंतर पुन्हा त्याचा संघर्ष सुरू झाला. दारोदार तो

भटकू लागला. पंडित भीमसेन जोशी, पंडित कुमार गंधर्व, पंडित हृदयनाथ मंगेशकर या सर्वांचा तो एकलव्यासारखा शिष्य होता. या सगळ्यांच्या गाण्याचा त्याचा प्रचंड अभ्यास होता. यातूनच त्याचा गळा तयार झाला होता. परंतु या काळातील भारतीय चित्रपट संगीत एका वेगळ्या लाटेतून चाललो होते. तिथे हा आवाज मीसफिट होत होता. मन पुन्हा एकदा नैराश्याने भरकटून जावू लागले पण यावेळी पूर्वीसारखं व्हायचं नव्हतं. त्याला एक जिंगल गायला मिळाले. हे जिंगल खूप लोकप्रिय ठरले.

नंतर अनेक रेडिओ आणि टीव्हीवरच्या जाहिरातीमध्ये त्याचा आवाज येऊ लागला. हळूहळू पैसा मिळू लागला. २००३ साली 'वैसा भी होता है' या नावाचा एक चित्रपट आला. चित्रपट चालला नाही आज या सिनेमाचे नाव देखील कोणाला आठवणार नाही. पण विशाल शेखर यांनी संगीत दिलेल्या या चित्रपटातील या गायकाने गायलेल्या एका गाण्याने मात्र इतिहास घडवला! आज देखील हे गाणे या गायकासाठी त्याचे सिग्नेचर सॉंग बनले आहे. यानंतर मात्र त्याला मागे वळून पाहावे लागले नाही. भारतातल्या प्रमुख भाषांमध्ये तो झपाट्याने गाऊ लागला हिंदीमधील तो प्रस्थापित गायक झाला! देश विदेशात त्याच्या गाण्याच्या मैफिली होऊ लागल्या! एकेकाळी आपल्याला काहीच जमत नाही आपण जगण्याच्या लायकीचे नाही अशी भावना होऊन आत्महत्या करायला गेलेल्या या गायकाला नियतीने यशाच्या शिखरावर नेऊन बसवले. यशाची दारे सताड उघडणाऱ्या या गायकाने गायलेले गाणे होते 'अल्ला के बंदे हंस दे अल्ला के बंदे.....' आणि हा गायक होता कैलाश खेर!

© धनंजय कुलकर्णी

♥

♥

लेख क्र. ४२

जेंव्हा सिनेमाच्या शौकापायी लहानपणी धर्मेंद्रने बसच्या टपावर बसून प्रवास केला!

१९७० साली ऋषिकेश मुखर्जी यांचा एक चित्रपट आला होता 'गुड्डी' नावाचा! यातील शाळकरी नायिका जया भादुरी ही सिनेमाची प्रचंड शौकीन असते. ती कायम स्वत:ला त्या विश्वात हरवून बसलेली असते. यात तिच्या स्वप्नातील नायक असतो अभिनेता धर्मेंद्र! यात धर्मेंद्रने चित्रपटात देखील धर्मेंद्रचीच भूमिका केली होती. पुढे तोच तिच्या डोक्यातून सिनेमाचे खूळ बाहेर काढतो असे या सिनेमाचे कथानक होते! पण असेच सिनेमाचे खूळ धर्मेंद्रच्या स्वत:च्या डोक्यातही होते! लहानपणापासून सिनेमाचे त्याला प्रचंड आकर्षण होते! त्याच्या गावा जवळून जाणाऱ्या फ्रंटीयर मेल पाहून धर्मेंद्र रोज

म्हणायचा "अरे यार, तू कब मुझे मेरे सपनो के शहर ले जायेगी?" (पुढे धर्मेंद्र ने याच मेल मधून पळून जावून मायानगरी गाठली!)

याच काळातील हा किस्सा आहे!

त्या वेळी धर्मेंद्र सिनेमात आले नव्हते आणि पंजाबात कॉलेज शिक्षण घेत होते. या काळात त्यांना सिनेमाचा प्रचंड शौक होता. मनोमन त्यांनी सिनेमात जाण्याचा ठरवलं होतं.. पण घरच्यांचा विरोध होता! मुंबईला जाऊन सिनेमात काम करण्याला तर विरोध तर होताच, शिवाय सिनेमा पाहायला देखील त्यांच्या घरून विरोध असायचा! त्यामुळे धर्मेंद्रने एक आयडिया केली होती सिनेमा पाहायचा असेल तर गावात थेटर नव्हतं! त्याला फगवाड्यावरून जालंदरला जावं लागायचे. जालंदरला ज्योती टॉकीजमध्ये नवीन हिंदी सिनेमा लागायचा. त्यावेळी तिथे प्रदर्शित होणारा प्रत्येक सिनेमा धर्मेंद्र पाहत होता. हे सर्व तो कॉलेजच्या वेळात उरकून टाकायचा. आणि साळसूदपणे घरी जायचा. कुणाला काही कळण्याचा प्रश्नच नव्हता. पण त्यासाठी त्याला एक आयडिया केली होती फगवाडाहून जालंदरला तो बसने जात असायचा आणि येताना पुन्हा बसने घरी परत यायचा. परंतु संध्याकाळी घरी जाणारी बस सिनेमा संपायच्या आधीच निघत असायची आणि ती शेवटची बस असल्यामुळे ती पकडणे भाग असायचे. त्यामुळे धर्मेंद्रला बरेचसे सिनेमे हे शेवटी अर्धा तास बाकी असताना सोडावे लागत. शेवटचा क्लायमॅक्स सोडून थिएटरच्या बाहेर पडायला त्याला खूप जड जात असे. चिडचिड व्हायची पण पर्याय नव्हता! शेवटची बस त्याला मिळवणे गरजेचे असायचे नसता घरी त्याचे बिंग फुटले जाण्याची शक्यता होती. घरच्यांना वाटायचे पोरगं कॉलेजला जात आहे पण चिरंजीवाचे हे उद्योग चालू होते. हा सिलसिला बरेच दिवस बिन बोभाट चालू होता!

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

एकदा असेच चित्रपट पाहून शेवटचा अर्धा तास सोडून तो धावत धावत जालंधर च्या एसटी स्टँडवर गेला. तिथे बस अगदी निघण्याच्या तयारीत होती. त्याने हात करून कंडक्टरला थांबण्याचा इशारा केला. पण कंडक्टर काही थांबायला तयार नव्हता! आता पंचाईत झाली होती. ही बस पकडणे भाग होते. त्यामुळे बस सुटल्यानंतर धर्मेंद्र त्या बसच्या पाठीमागे सुसाट पळत गेला आणि शेवटी कसेबसे त्याने बसच्या मागे असलेल्या शिडीवर जाण्यात यश मिळवले. ही शिडी चढून तो वरती टपावर गेला. थंडीचे दिवस असल्यामुळे तो अक्षरशः गारठून गेला. पण काय करणार! सिनेमाचे हौस दांडगी होती. ज्या वेळेला फगवाडा आले त्यावेळी सर्व प्रवासी उतरत असताना हळूहळू तो देखील बसच्या शिडीवरून खाली उतरू लागला. कंडक्टरने ते बघितले. आणि कंडक्टरने त्याला पकडले! आणि त्याला पैसे मागितले. गरम धरम आता चिडला होता. म्हणाला.. ”मी तुला वारंवार विनंती करून बस थांबव म्हणत होतो तेंव्हा थांबवली नाहीस आता कसले पैसे मागतोस ? तुला पैसे पण देणार नाही!” असे म्हणून धर्मेंद्र तिथून पळून गेला. पण गाव छोटे होते. कंडक्टरने धरमच्या या लीला तिखट मीठ लावून त्याच्या घरी सांगितलेच आणि धरमचे कॉलेज सुटले ते सुटलेच!

© धनंजय कुलकर्णी

♥

लेख क्र. ४३



पायलट राजीव गांधीनी वाचवले डिंपल कपाडियाचे प्राण!

हिंदी सिनेमाच्या इतिहासात अपघातांना तोटा नाही. पण हा जो किस्सा मी सांगणार आहे यात पण अपघात होता होता राहिला. अपघात झालाच नाही. पण झाला असता तो दोन मोठे स्टार यांच्या जीवाला धोका निर्माण झाला असता. हे दोन स्टार होते अभिनेत्री डिंपल कपाडिया आणि अभिनेता राकेश रोशन! तुम्ही म्हणाल या दोघांनी एकाही चित्रपटात एकत्र काम केले नाही; मग अपघाताच्या वेळी एकत्र कसे आले? त्याचाच हा रंजक किस्सा आहे १९७३ सालचा! आणि सर्वात महत्त्वाचा आहे या अपघातातून त्यांना ज्या व्यक्तीने वाचवले ती व्यक्ती नंतर पुढे या देशाची पंतप्रधान झाली. मस्त मजेशीर हा

किस्सा आहे! १९७३ साली त्यावेळी डिंपल कपाडियाचा 'बॉबी' हा चित्रपट प्रदर्शित झाला नव्हता आणि त्यापूर्वीच ११ मार्च १९७३ रोजी तिने सुपरस्टार राजेश खन्ना सोबत लग्न केले होते. या लग्नाच्यानंतर राजेश खन्ना डिंपल कपाडियाला घेऊन कश्मीरला जे ओमप्रकाश यांच्या 'आप की कसम' या चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी घेऊन गेला होता. हनिमून पण होईल आणि शूटिंग पण हा दुहेरी हेतू यातून साध्य होणार झाला. 'आपकी कसम' हा जे ओमप्रकाश यांचा दिग्दर्शनातील पहिलाच चित्रपट होता. या चित्रपटाचे चित्रीकरण लेह, लडाख सोबतच मनाली, सिमला येथे देखील झाले. 'आप की कसम'चे काश्मीरमधील शूटिंग संपले पण त्याच वेळी राजेश खन्नाला असा निरोप मिळाला की तो अभिनय करत असलेल्या 'त्याग' या चित्रपटाचे एक युनिट देखील काश्मीरला पोहोचत आहे. ('त्याग' हा सिनेमा पुढे खूप रेंगाळला. १९७७ साली प्रदर्शित झाला. पण दोन–तीन महत्वाच्या नोंदी आहेत. हा सिनेमा सचिनदा यांनी स्वरबध्द करून प्रदर्शित झालेला शेवटचा सिनेमा ठरला! राजेश-शर्मिला या हिट पेयरचा हा शेवटचा सिनेमा होता! या सिनेमाची निर्मिती शर्मिलाची होती तर दिग्दर्शन दिन दयाळ शर्मा यांचे होते!)

त्यामुळे राजेश खन्ना डिंपलला म्हणाला, "मी काही दिवस 'त्याग' या चित्रपटाचे शूटिंग संपवून मुंबईला येतो. तोवर तुम्ही दिल्ली मार्गे मुंबईला जा.." त्यावेळी जे. ओम प्रकाश यांचा जावई राकेश रोशन सुध्दा तिथे आला होता! ठरल्याप्रमाणे डिम्पल, राकेश रोशन जे. ओम प्रकाशच्या युनिट सोबत विमानाने दिल्लीला निघाले. हे फ्लाईट श्रीनगर दिल्ली असे होते. तो दिवस होता १४ मे १९७३! त्या दिवशी अचानक हवामानात बदल झाला आणि बर्फवृष्टी सुरू झाली. विमानाने टेकऑफ केले होते. त्या दिवशी सर्वत्रच

हवामानाचा माहौल खराबच होता. दिल्लीला पोहोचेपर्यंत विमान रडारवरून गायब झाले. सर्वत्र भीतीचे वातावरण निर्माण झाले. दिल्ली विमानतळावर अफरातफरीचा माहोल निर्माण झाला. देशाच्या राजधानीत देखील हवामान विचित्र होते. विमान दिल्ली विमानतळावर घिरट्या घालत होते पण खराब हवामानाने लँडिंग करता येत नव्हते. विमानातील इंधनाचा साठा कमी होत चालला होता. पण विमानाचे पायलट यांनी सुखरूपपणे विमानाला या संकटातून बाहेर काढले आणि विमान आग्रा विमानतळावर इमर्जन्सी लँडिंग करावे लागले. यावेळी या विमानातील प्रत्येक व्यक्ती पायलटचे आभार मनात होते कारण त्याच्या कौशल्यामुळेच त्याचे प्राण वाचले होते प्रत्येक जण पायलटला दुवा देत होते. डिम्पल आणि राकेश रोशन आणि जे ओम प्रकाश यांच्या टीमने पायलट चे शतशः आभार मानले. या विमानाचे पायलट पुढे भारताचे पंतप्रधान झाले ..... त्यांचे नाव राजीव गांधी!

© धनंजय कुलकर्णी

♥

लेख क्र. ४४

वर्ण द्वेषाचा फटका स्मिता पाटीलला बसला....
तो ही भारतातच!

आपल्या देशात चेहऱ्याच्या, त्वचेच्या रंगाला फार महत्त्व आहे! समाजात गोऱ्या रंगाला 'स्मार्ट' समजण्याचा आपल्याकडे चुकीचा ट्रेंड सेट झाला आहे. यामुळे सावळ्या व्यक्तीला कॉम्प्लेक्स येऊ शकतो हे कधी कोणी विचारात घेतलंच नाही! कित्येक सावळ्या मुलींचे भावविश्व तर यामुळे कोमेजून तर गेलेच आणि त्या आत्मविश्वास सुध्दा हरवून बसल्या! त्यामुळेच मध्यंतरी काही सामाजिक संघटनांनी 'ब्लॅक इज ब्युटीफूल' हे आंदोलन करून सौंदर्यप्रसाधन तयार करणाऱ्या कंपन्यांना त्यांच्या प्रॉडक्टचे नाव बदलायला लावले. रंगावरून स्त्रियांना खूप अपमान झेलावे लागतात. हा काळ फार जुना नाही. आपल्याकडील मीडिया आणि जाहिरातीत सुद्धा गोरा रंग म्हणजेच 'चांगला' असं इतकं बिंबवलं गेलं की त्यामुळे सावळ्या व्यक्ती आयुष्यात

डिप्रेशन मध्ये गेल्या. आता काळ बदलतोय पण लोकांच्या मनातील मानसिकता मात्र अजूनही तशीच आहे.

याचा फटका अभिनेत्री स्मिता पाटीलला देखील बसला होता. स्मिता पाटील अतिशय संवेदनशील अभ्यासू आणि मनस्वी कलावंत होती. अभिनयासाठी प्रचंड मेहनत घेण्याची तिची तयारी होती. तिच्या अभिनयातून याची प्रचिती प्रेक्षकांना होत होती. एक बुद्धिजीवी अभिनेत्री म्हणून तिने लौकिक कमावला होता. पण याच स्मिता पाटीलला तिच्या रंगावरून लहानपणापासून खूप टोमणे ऐकून घ्यायची सवय लागली होती. स्मिता सावळी होती, सडपातळ होती. तिचे लुक्स देखील अगदीच चारचौघी सारखे. हीरोइन बनण्याचं 'सो कॉल्ड मटेरियल' तिच्यामध्ये नव्हतं. मुंबई दूरदर्शनवर बातम्या सांगत असताना ती निर्मात्यांच्या नजरेत आली आणि रुपेरी पडद्यावर तिचे आगमन झाले. १९७४ सालच्या श्याम बेनेगल यांच्या 'निशांत' या चित्रपटापासून स्मिता पाटील ठळकपणे प्रेक्षकांच्या समोर आली. त्यानंतर अवघ्या दहा ते अकरा वर्षांमध्ये तिने अभिनयाचे शिखर गाठले. अनेक पुरस्कार तिला मिळाले. राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पुरस्कार देखील मिळाले. अभिनय कसा असावा याचा आदर्श वस्तुपाठ स्मिता पाटीलने पुढच्या पिढीसमोर ठेवला. १९७७ साली आलेल्या 'भूमिका' या सिनेमातील तिने साकारलेल्या भूमिकेसाठी स्मिताला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. यानंतर स्मिता पाटील आणि पुरस्कार ही रांगच लागली. सुरुवातीला कलात्मक तथा समांतर सिनेमात भूमिका करणारी स्मिता ऐंशीच्या दशकात मेन- स्ट्रीम सिनेमात देखील दिसू लागली! नमक हलाल, शक्ती, बाजार, अर्थ या सिनेमातून स्मिता कुठेही मिस-फिट वाटली नाही.

आता मूळ विषयाकडे येवू! हा किस्सा आहे १९८१ सालचा! त्यावेळी स्मिता पाटीलच्या 'चक्र' (दिग्दर्शक: रवींद्र धर्मराज) या चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला होता. या चित्रपटाचे स्पेशल स्क्रीनिंग दिल्लीमध्ये एका फिल्म फेस्टिव्हलमध्ये होणार होते. या कार्यक्रमासाठी स्मिता पाटील दिल्लीला जाणार होती. तिच्यासोबत तिची मोठी बहीण अनिता तसेच अभिनेत्री पूनम धिल्लन ह्या देखील होत्या. तिघी दिल्लीला पोहोचल्या आणि कार्यक्रमस्थळी दाखल झाल्या. तिथे गेल्यानंतर त्यांच्या असे लक्षात आले की आपण आपल्याला मिळालेले 'स्पेशल डेलिगेट पास' आणायचे विसरलो आहोत! सिक्युरिटीने या तिघींना अर्थातच अडवले. या तिघींनी हरतऱ्हेने सिक्युरिटीला समजावून सांगायचा प्रयत्न केला की.. "आम्ही अभिनेत्री आहोत आणि आमच्याकडे असलेले पास आम्ही घरी विसरलेलो आहोत तरी आम्हाला कार्यक्रमाला आज जाऊ द्या." स्मिता पाटील तर म्हणाली, "आता माझ्याच एका चित्रपटाचे स्क्रीनिंग सुरू होत आहे. मला आत जाणे गरजेचे आहे!" तो काळ मोबाईलचा नव्हता त्यामुळे आयोजकांना फोन करून बोलावण्याचा प्रश्नच नव्हता. बराच वेळ हुज्जत घातल्यानंतर सिक्युरिटीने पूनम धिल्लन आणि अनिता पाटील यांना आत सोडले. पूनमला हीरोइन म्हणून मानायला तो तयार झाला आणि अनिता पाटील देखील गोऱ्या असल्यामुळे त्यांना आत पाठवले. परंतु स्मिता पाटीलला मात्र तो काही केल्या हीरोइन मानायला तयार नव्हता! एक तर तिच्याकडे रंग रूप नव्हतं. त्या दिवशी ती मेकअप देखील करून आलेली नव्हती. त्यामुळे एक चार चौघी सारखी साधी मुलगी 'मी हिरोईन आहे' म्हणते हे त्याला पटत नव्हते.

त्याला सांगून सांगून स्मिता थकली आणि तिथेच बसली. सिक्युरिटी तिला आज सोडायला तयार नव्हता त्यावेळी पहिल्यांदाच तिला आपली बाह्य रूपावरून आपली परीक्षा केली जाते याची पुन्हा एकदा जाणीव झाली. हा सारा प्रकार पंधरा–वीस मिनिटे चालला! पूनम धिल्लन आत जाऊन सरळ महेश भट यांना भेटली आणि सगळा प्रसंग त्यांना सांगितला. महेश भट यांना तो खूपच भयंकर प्रकार वाटला ते आयोजकांना घेऊन लगेच एन्ट्री- गेट जवळ आले आणि तिथे बसलेल्या स्मिता पाटीलची जाहीर माफी मागत तिला आत घेऊन गेले. तो सिक्युरिटी गार्ड देखील लज्जित झाला तो स्मिता पाटील याना त्यांच्या सीटपर्यंत सोडवायला गेला!

© धनंजय कुलकर्णी

♥

♥

लेख क्र. ४५

शम्मी कपूरला 'किस' करण्याचे नर्गीसने केले होते 'प्रॉमिस'...पण!

अभिनेता शम्मी कपूर त्याच्या रोमँटिक इमेजमुळे आजही तरुणाई मध्ये प्रचंड लोकप्रिय आहे. त्याची स्टाईल, त्याचा हेअर कट, त्याचा किलिंग लूक आणि त्याची गाणी यावर रसिक जाम फिदा होती! हॉलीवुडच्या एल्विस प्रिस्ले यांच्या अभिनयाचा त्याच्यावर खूप प्रभाव होता. हा किस्सा शम्मी कपूर चित्रपटात येण्यापूर्वीचा आहे! ज्यावेळी राजकपूर यांच्या 'बरसात' या चित्रपटाचे चित्रीकरण चालू होते त्याच वेळी राजकपूर आणि नर्गिस यांच्यात प्रेमालाप सुरु झाला होता. नर्गिस राजकपूरवर मनापासून प्रेम करत होती. राजसोबत लग्न करायची तिची इच्छा होती. परंतु राज कपूर विवाहित होते!

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी

राज कपूर हा सदैव चित्रपटाचा विचार करणारा कलावंत होता. त्याच्या डोक्यात कायम सिनेमाचे विचार चालू असायचे. एक चित्रपट सेटवर असताना तो पुढच्या चित्रपटाचा विचार करत असायचा. 'बरसात'च्या सेटवर असतानाच त्याच्या डोक्यात त्याच्या आगामी 'आवारा' या चित्रपटाची जुळवाजुळव चालू होती. बऱ्याचदा तो नर्गिस सोबत या विषयावर बोलत असे. नर्गिसला या चित्रपटात काम करण्याची मनोमन इच्छा होती. परंतु त्याचवेळी नर्गिसच्या घरातील व्यक्तींना राजकपूरकडे तिचा वाढणारा ओढा त्यांना पसंत नव्हता. एकतर राजकपूर त्यांच्या धर्माचा नव्हता आणि दुसरी गोष्ट तो विवाहित होता. त्यामुळे नर्गिसच्या घरवाल्यांना राजकपूर सोबतची तिची मैत्री अजिबात पसंद नव्हती. त्यामुळे त्यांनी तिला यापुढे राज सोबत काम करू नकोस असा आदेशच दिला होता. पण नर्गिसला मात्र काही करून राज कपूर सोबत काम करायचे होते. तिला मनोमन राज आवडला होता. यासाठी तिने घरच्यांना मनवण्याचा खूप प्रयत्न केला होता. पण 'जालीम' घरवाले त्यांच्या भूमिकेवर ठाम होते!

याच काळात शाळकरी शम्मी कपूर याचे 'बरसात'च्या सेटवर जाणे होत असे. नर्गिस त्याला खूप आपलेपणाने बोलायची. आपल्या छोट्या मित्रासोबत ती तासंतास गप्पा मारायची. एकदा ती खूप उदास होती. खिन्नपणे बसली होती. त्यावेळी शम्मी तिथे पोहोचला. शम्मीने तिच्या नाराजीचे कारण विचारल्यावर तिने सांगितले ,"मला राज कपूर यांच्या आगामी आवारा या चित्रपटात काम करायचे आहे. परंतु माझे घरातील लोक मला राज सोबत काम करायला नकार देत आहेत!" शाळकरी शम्मी कपूर तिला समजावण्याच्या स्वरात म्हणाला, "काळजी करू नकोस. तुझे घरचे लोक नक्की तुझ्या विचारांना

पाठिंबा देतील आणि तुला आवारा या चित्रपटात काम करण्याची परवानगी देतील!" लहानग्या शम्मीचे ते आश्वासक बोल ऐकून नर्गिस मनोमन खूष झाली ती म्हणाली, "तसेच जर झाले तर मी तुला एक 'किस' देईन!" शाळकरी शम्मी ते नर्गिसचे बोल ऐकून मनोमन लाजला आणि लगेच निघून गेला!

बरसात २२ एप्रिल १९४९ ला प्रदर्शित झाला... हिट झाला. राजकपूर-नर्गिस या जोडीला रसिकांनी स्वीकारले. नर्गिसचा सिनेमाच्या दुनियेतील भाव वाढला. पुढे तिच्या घरच्यांनी तिला 'आवारा' या चित्रपटात काम करायला परवानगी दिली! या चित्रपटाचे चित्रीकरण देखील सुरू झाले. आता शम्मी कपूरदेखील मोठा झाला होता कॉलेजला जाऊ लागला होता. त्याच वेळेला तो त्याच्या वडिलांच्या 'पृथ्वी' थिएटर सोबत काही नाटकातून कामे देखील करू लागला होता. एकदा 'आवारा' या चित्रपटाच्या सेटवर शम्मी कपूर जाऊन पोहोचला!

तिथे बऱ्याच वर्षांनी त्याची भेट नर्गीस सोबत झाली. त्याला त्यावेळेला नर्गिसने प्रॉमिस केलेल्या 'किस' ची आठवण झाली! त्याने त्या भेटीत नर्गिसला विचारले, "तुम्हाला तुम्ही दिलेल्या एका गोष्टीची आठवण आहे का?" त्यावर नर्गिसला शम्मीला किस करण्याच्या प्रॉमिसची आठवण झाली. ती म्हणाली, "हो तर आठवण आहे." मग शम्मी म्हणाला, "त्या कीस करण्याच्या प्रॉमिसचे काय?" ती म्हणाली, "अरे त्यावेळी तू खूप लहान होतास. आता मी तुला किस कसं करणार? तू आता मोठा झाला आहेस! त्याऐवजी मी तुला दुसरं काहीतरी गिफ्ट देते. काय गिफ्ट देऊ तुला?" त्यावर शम्मी कपूर म्हणाला, "मला एक चांगला ग्रामोफोन गिफ्ट म्हणून दे" लगेच नर्गिस शम्मी कपूर ला आपल्या गाडीतून घेऊन मार्केटमध्ये गेली आणि एक चांगला ग्रामोफोन आणि त्याला

आवडणाऱ्या भरपूर रेकॉर्ड्स त्याला गिफ्ट म्हणून दिल्या. अशा प्रकारे शम्मी कपूरला नर्गिसचा किस तर मिळाला नाही पण त्याच्या आवडता ग्रामोफोन मात्र त्याला मिळाला!

© धनंजय कुलकर्णी

♥

♥

लेख क्र. ४६



जेंव्हा पाच अभिनेत्रींनी यश चोप्रांच्या सिनेमात काम करायला चक्क नकार दिला होता!

यशराज फिल्मच्या 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे' या चित्रपटाची भारतीय सिनेमाच्या इतिहासातील सर्वाधिक काळ थिएटरमध्ये चाललेला चित्रपट म्हणून त्याची नोंद झाली आहे! २५ ऑक्टोबर १९९५ ला प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाची जादू अजूनही प्रेक्षकांच्या मनावर आहे. मुंबईच्या मराठा मंदिर या थिएटरमध्ये या चित्रपटाने ३० वर्षे उलटून गेली तरी अजूनही तिथे मुक्काम ठेवला आहे! या चित्रपटाच्या निर्मितीच्या काळातच यशराज फिल्मच्या 'दिल तो पागल है' या चित्रपटाची सुरुवात झाली होती. हा सिनेमा

३१ ऑक्टोबर १९९७ रोजी प्रदर्शित झाला. या चित्रपटाचे दिग्दर्शक यश चोप्रा होते. चित्रपटाला संगीत उत्तम सिंग यांचं होतं. याची प्रमुख स्टार-कास्ट शाहरुख खान आणि माधुरी दीक्षित होती. सुमधुर गीतांनी सजलेला हा चित्रपट देखील सुपरहिट ठरला. या चित्रपटात आणखी एक हिरोईन होती करिष्मा कपूर! पण तुम्हाला माहित आहे का या रोलसाठी तिचा विचार झालाच नव्हता! या भूमिकेतीला अभिनेत्रीला शोधण्यासाठी यश चोप्रा यांना खूप मेहनत घ्यावी लागली. यश चोप्रांच्या मनात सुरुवातीला या भूमिकेसाठी मनीषा कोइरालाला घ्यायचं होतं. त्या पद्धतीने त्यांनी मनीषाकडे विचारणा देखील केली. परंतु माधुरी दीक्षित सिनेमात असताना माझी भूमिका दुसऱ्या (म्हणजेच दुय्यम) अभिनेत्रीची असणार याची तिला जाणीव झाली आणि तिने ही भूमिका नाकारली. अर्थात नंतर तिने एका चॅनेलशी बोलताना या कृती बाबत पश्चाताप देखील व्यक्त केला होता. ती म्हणाली होती.... "चांगली भूमिका मी माझ्या मूर्खपणामुळे सोडून दिली!"!

मनीषा कोइराला नंतर या भूमिकेसाठी काजोल यांना विचारण्यात आले. चोप्रांच्या डीडीएलजे ची नायिका काजोलच होती तिने एक दिवसाचे शूट देखील केले पण नंतर तिने देखील भूमिकेचा मर्यादित आवाका लक्षात आल्यानंतर चित्रपट सोडला. त्यानंतर उर्मिला मातोंडकर यांना विचारण्यात आले परंतु ती देखील अन्य प्रोजेक्टमध्ये बिझी असल्याने तिने देखील नकार दिला. आता चोप्रा साहेब वैतागले. एरवी त्यांच्या सिनेमात काम मिळावे म्हणून जीव टाकणाऱ्या नट्या आता चक्क नकार देता होत्या. काय करावे? शेवटी यश चोप्रा यांनी करिष्मा कपूर हिला या चित्रपटातील या 'निशा'च्या भूमिकेसाठी विचारणा केली. करिश्माने तोवर शाहरुख खान आणि यश

चोप्रासोबत एकही चित्रपटात काम केले नव्हते. या दोन्ही गोष्टी तिला करायच्या होत्याच आणि त्या आपणहून चालून आल्या होत्या. तरी तिने चोप्रांकडे विचारासाठी चोवीस तास मागितले आणि त्यानंतर तिने चित्रपटात काम करायला होकार दिला.

अशा पद्धतीने निशाच्या भूमिकेसाठी करिष्मा कपूरची 'दिल तो पागल है..' मध्ये एंट्री झाली. या चित्रपटाची मुख्य नायिका माधुरी दीक्षित जरी असली तरी करिष्मा या सिनेमात कुठेही कमी पडली नाही. प्रेक्षकांची तिच्या भूमिकेला जबरदस्त दाद दिली. तिला या भूमिकेसाठी फिल्मफेअरचा पुरस्कार तर मिळालाच शिवाय सहाय्यक अभिनेत्रीचा राष्ट्रीय पुरस्कार देखील तिने पटकावला. तिला हा पुरस्कार जेव्हा जाहीर झाला त्यावेळी करिश्मा अमेरिकेत होती. रणधीर कपूरने तिला ही गुड न्यूज दिली. याशिवाय करिश्माला झी आणि स्क्रीन चे पुरस्कार मिळाले. थोडक्यात जी भूमिका पाच अभिनेत्रीनी नाकारली त्या भूमिकेचे करिश्माने सोने केले. या चित्रपटातील अक्षय कुमारची भूमिका सर्वांनाच सरप्राईज पॅकेज होती! कारण हा चित्रपट प्रदर्शित होईपर्यंत कुठेही पोस्टरवर, मुलाखतीत, मीडियामध्ये या चित्रपटात अक्षय कुमार भूमिका करत आहे असं सांगितलं गेलं नाही. ही गुप्तता ठेवण्यामागचं कारण म्हणजे त्यावेळी

अक्षय कुमारचे चित्रपट लागोपाठ अपयशी ठरत होते. एक फ्लॉप स्टार म्हणून त्याच्यावर शिक्का बसत होता. वितरक कुठल्याही प्रकारची रिस्क घ्यायला तयार नव्हते. त्यामुळे त्यांनी यश चोप्रांना स्पष्ट सांगितले, अक्षयकुमार जरी या चित्रपटाला असला तरी त्याला अजिबात प्रसिद्ध मिळता कामा नये. यश चोप्रांना खरं तर या भूमिकेसाठी जॅकी श्रॉफला घ्यायचे होते पण जॅकीचे वय पाहता तो या भूमिकेसाठी थोराड वाटला असता त्यामुळे अक्षयकुमारची या सिनेमासाठी निवड झाली. या सिनेमात शाहिद कपूरने एका डान्समध्ये नायकाच्या मागे उभे राहून काही स्टेप्स केल्या होत्या तसेच अमिषा पटेल हिने देखील एक छोटी भूमिका या चित्रपटात केली होती!

© धनंजय कुलकर्णी

♥

लेख क्र. ४७



अमिताभ आणि डॅनी यांना एकत्र काम करण्याचा योग यायला तब्बल १८ वर्षे लागली!

कधी कधी अगदी किरकोळ कारणावरून देखील दोन अभिनेते एकत्र काम करत नाहीत. किती वर्ष? तर चक्क १८ वर्ष! तसं म्हटलं तरी या दोघांमध्ये काहीच मतभेद नव्हते. काहीही थेट वादही नव्हता. पण या दोघांना एकत्र काम करण्याचा योग तब्बल अठरा वर्षानंतर आला. दरम्यानच्या काळात एका चित्रपटात हे दोघे एकत्र आले होते पण या दोघांचा एकत्रित असा एकही शॉट या चित्रपटात नव्हता. हे दोन अभिनेते म्हणजे अमिताभ बच्चन आणि डॅनी डेंझप्पा. खरंतर डॅनी आणि जया भादुरी हे पुण्याच्या एफटीआय मधील क्लासमेट्स. दोघांची चांगली मैत्री होती. किंबहुना एफ टी आय मध्ये असताना

डॅनीच्या रूपावरून, बोलण्यावरून तिथले मित्र त्याची खूप थट्टा करत असायचे. चीनी, नेपाळी म्हणून पाण उतारा करून नाउमेद करणारे देखील काही कमी नव्हते. जया भादुरी मात्र कायम त्याची बाजू घेऊन त्याला सांभाळून घेत असे. एकतर ईशान्येकडून आलेला हा कदाचित पहिला कलावंत होता. हिंदी भाषेसोबत त्याचा फारसा सलोखा नव्हता. त्याचे शब्द उच्चार देखील सदोष होते. या सर्व पार्श्वभूमीवर जया भादुरीने त्याला सांभाळून घेतले. त्याला उत्तम हिंदीची ट्युशन दिली. त्याचे 'टोलींग पेन्टसो डेंग्झोपा' हे नाव बदलून सुटसुटीत असे डॅनी केले. इनफॅक्ट डॅनीचा कम्प्लीट मेक ओव्हर जया भादुरीमुळे झाला. डॅनी देखील तिच्या या उपकाराने कायम कृतज्ञ असतो!

जया भादुरी आणि डॅनी यांनी १९७७ साली आलेल्या 'अभी तो जी ले' या चित्रपटात नायक नायिकेची भूमिका केली होती. या चित्रपटात 'तू लाली हे, सवेरे वाली..' हे गाणं खूप गाजलं होतं. पुण्याच्या एफटीआय मधून पास आउट झालेल्या स्टुडंट्सला घेऊन रोशन तनेजा यांनी हा चित्रपट बनवला होता. हा चित्रपट बनण्याची प्रक्रिया खूप वर्ष चालल्यामुळे रेंगाळत रेंगाळत हा सिनेमा १९७७ प्रदर्शित झाला. या सिनेमाची आठवण आता केवळ हे एकमेव गाणे आहे जया भादुरी आणि अमिताभ बच्चन यांचे १९७३ साली लग्न झाले त्यानंतर चित्रपटातून काम करणे थांबवले. अमिताभ बच्चनची अँग्री यंग मॅन ची इमेज इथूनच सुरुवात झाली याच काळात सुरू झाली.

आता येवूया मूळ विषयाकडे! डॅनीची खलनायकाची इमेज जोरदार चालू झाली. धुंद, कालीचरण, खोटे सिक्के, काला सोना, द बर्निंग ट्रेन, लैला मजनू..... खरं तर शोलेच्या गब्बरच्या रोलसाठी त्याचाही विचार झाला होता पण तो 'धर्मात्मा'च्या शूटिंगसाठी त्या काळात अफगाणीस्तानमध्ये होता.

अमिताभ आणि डॅनी यांना एकत्र आणण्याचा बराच प्रयत्न त्या काळात झाला! जया देखील या दोघांना एकत्र आणू इच्छीत होती. पण योग येत नव्हता! त्या काळात अमिताभ मनमोहन देसाई यांच्या सिनेमात कायम असायचा. एकदा मनमोहन देसाई यांनी डॅनीला त्यांच्या सिनेमात काम करण्यासाठी विचारले. त्यावेळी डॅनीच्या तोंडून बाहेर पडलेल्या एका वाक्याने गहजब झाला. डॅनी मनमोहन देसाई यांना म्हणाला, "माफ करा पण तुमचे सिनेमे अतार्किक असतात. भारतीय सिनेमाला ते दहा वर्षे मागे नेत असतात! बाकी निर्माते तुम्हाला फॉलो करतात आणि यात नुकसान भारतीय सिनेमाचे होते!" डॅनी चे विधान, कलावंत म्हणून जरी बरोबर असले तरी एक व्यावसायिक म्हणून विचार केला तर चुकीचे होते! झाले... यातून मिडीयात उलट सुलट बातम्या येवू लागल्या. आणि अमिताभ आणि डॅनी एकत्र येण्याचा मुहूर्त लांबू लागला. १९८३ साली टी. रामाराव यांचा 'अंधा कानून' हा सिनेमा आला. यात अमिताभ आणि डॅनी दोघे होते पण त्यांचा एकत्र एकाही शॉट सिनेमात नव्हता. (या सिनेमात प्राणने अनेक वर्षानंतर पुन्हा एकदा खलनायक

रंगवला होता!) १९८९ साली दिग्दर्शक मुकुल आनंद यांनी 'अग्निपथ' या सिनेमाची जुळवाजुळव सुरु केली आणि या सिनेमात पहिल्यांदा अमिताभ आणि डॅनी एकत्र आले. यात डॅनीने रंगवलेला 'कांचा चीना' जबरा होता. हे नाव त्यानेच दिग्दर्शक मुकुल आनंद यांना सुचविले होते. पुढे या दोघांनी हम, खुदा गवाह, अब तुम्हारे हवाले वतन साथीयो.. या आणि इतर सिनेमातून एकत्र भूमिका केल्या. पण त्यांना एकत्र काम करण्यासाठी तब्बल अठरा वर्षे वाट पहावी लागली!

© धनंजय कुलकर्णी

♥



लेख क्र. ४८

आशा पारेख का करत होती राजेश खन्नाचा सतत अपमान?

हा किस्सा आहे.. राजेश खन्ना सुपरस्टार व्हायच्या आधीचा आहे. एका टॅलेंट-सर्च मध्ये राजेश खन्ना पहिल्या क्रमांकाने निवडला गेला! त्यापूर्वी तो नाटकात कामे करत होता! रंगभूमीवर रमलेल्या राजेश खन्नाला चित्रपटात पहिल्यांदा ब्रेक मिळाला चेतन आनंद यांच्या 'आखरी खत' या चित्रपटाच्या वेळी! या सिनेमात त्याची नायिका इंद्राणी मुखर्जी होती. हा चित्रपट सुपर-फ्लॉप झाला! त्यानंतर दिग्दर्शक नासिर हुसेन यांनी एक चित्रपट बनवत होते ज्यासाठी राजेश खन्नाचा विचार झाला. मुळात नासिर हुसेन यांना एक कमी बजेटचा चित्रपट बनवायचा होता. हा चित्रपट कृष्णधवल असणार होता. त्यामुळे या सिनेमात त्यांना नवीन अभिनेता आवश्यक होता ज्याच्याकडे डेट्सचा प्रॉब्लेम नसेल आणि त्याला मानधन देखील कमी द्यावे लागेल! असा विचार करून

त्यांनी राजेश खन्नाला या सिनेमासाठी साइन केले. त्या काळात नासिर हुसैनच्या जवळपास प्रत्येक सिनेमाची हीरोइन ही आशा पारेखच असायची. (त्या काळात या दोघांच्या अफेअरची चर्चा देखील सिने वर्तुळात चांगलीच रंगली होती!)

ज्यावेळी आशा पारेखला तिच्या नवीन हिरोची ओळख करून दिली त्यावेळेला तिने नाक मुरडले! तिने सरळ नासिर हुसेन यांना सांगितले.. "मी याच्यासोबत काम करणार नाही!" तिच्या दृष्टीने बरोबर होते! कारण त्या काळातील ती आघाडीची नायिका होती! शम्मी कपूर, देव आनंद, जॉय मुखर्जी, मनोज कुमार, प्रदीप कुमार यांच्या सोबत तिने हिट सिनेमे दिले होते. त्यामुळे राजेश खन्ना सारख्या नव्या अभिनेत्या सोबत काम करणे तिच्या करीयर मध्ये अडथळा आणणारे होते! पण नासिर हुसेन यांनी तिला हरतऱ्हेने समजावून सांगितले.. "हा कलाकार रंगभूमीवरील कलाकार आहे. चांगला अभिनय करतो आणि एका मोठ्या टॅलेंट-सर्च मध्ये तो निवडला गेलेला आहे!" एवढे सांगूनही आशा पारेखचा नकार कायम होता. कारण त्यावेळेला आशा पारेख वरच्या श्रेणीची अभिनेत्री म्हणून सिद्ध झाली होती! तिचे अनेक चित्रपट सुपरहिट झाले होते. असे असताना एका नवोदित नायकासोबत काम करण्यात येईल तिच्या करिअरमध्ये बाधा येईल असे वाटत होते आणि ते साहजिक देखील होते. परंतु कसं तरी करून नासिर हुसेन यांनी आशा पारेखला पटवले आणि ती सिनेमात काम करायला तयार झाली.

परंतु 'बहारो के सपने' या सिनेमात काम करत असताना ती राजेश खन्नाचा पदोपदी अपमान करत होती. त्याचा सतत पाणउतारा करत होती. त्यामुळे राजेश खन्ना आणखीन चुका करत होता. त्या काळात त्याच्या

चेहऱ्यावर तारुण्यपिटीका आल्या होत्या. त्यावरून देखील आशा पारेख त्याचा अपमान करीत होती. सेटवर आशा पारेख त्याला सर्वांसमक्ष 'गुरखा' म्हणून बोलवत होती. राजेश खन्नाने सर्व अपमान गिळून मन लावून चित्रपटात भूमिका केली. चित्रपट पूर्ण झाला. चित्रपटाला माफक यश मिळाले. पण राजेशच्या अभिनयाची धमक अनेकांच्या लक्षात आली. पुढच्या दोन वर्षातच राजेश खन्नाचा भाग्योदय झाला. शक्ती सामंत यांचा 'आराधना' हा चित्रपट सुपरहिट ठरला. राजेश खन्नाचे नशीबच पालटले. तिथून सलग १६ सुपरहिट त्याने रसिकांना दिले. (हा विक्रम आजही अबाधित आहे.)

कुणी कुणाला कधी कमी समजू नये! दिवस बदलायला वेळ लागत नाही! आधी त्याला नाकारणारी त्याचा सतत अपमान, पाणउतारा करणारी, त्याला 'बदसूरत' म्हणणारी आशा पारेख देखील पुढे राजेश खन्ना सोबत काम करण्यासाठी निर्मात्याकडे खेटे घालू लागली. 'कटी पतंग', 'आन मिलो सजना' आणि 'धरम काटा' या चित्रपटात राजेश खन्ना आणि आशा पारेख यांनी एकत्रित काम केले. 'आजा पिया तोहे प्यार दू.. ' (बहारो के सपने), 'प्यार

दिवाना होता है..', 'ये शाम मस्तानी..' (कटी पतंग), 'अच्छा तो हम चलते है..' (आन मिलो सजना) ही या दोघांवर चित्रित गाणी लगेच आठवतात!

© धनंजय कुलकर्णी

♥



लेख क्र. ४९

शत्रुघ्न सिन्हा आणि रेखा यांच्यातील अबोला तब्बल तेवीस वर्षांनी मिटला!

साठच्या दशकाच्या अखेरीस हिंदी सिनेमांमध्ये अनेक नवीन चेहऱ्यांनी पदार्पण केलं त्यात एक चेहरा होता 'शत्रुघ्न सिन्हा'! त्यांनी पुण्याच्या एफ.टी.आय. मधून अभिनयाचे विधिवत शिक्षण घेतलं होतं, परंतु त्यांचा चेहरा त्या काळातील नायकांच्या प्रतिमेला साजेसा चिकना- चुपडा नसल्यामुळे त्यांना सिनेमात नायकाच्या भूमिका मिळणं दुरापास्त झालं! या रफ आणि टफ चेहऱ्याच्या अभिनेत्याने चित्रपटातून खलनायकाची भूमिका करायला सुरुवात केली आणि त्यांचा खलनायक प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला. सुरुवातीची सात-आठ वर्ष शत्रुघ्न सिन्हा हिंदी सिनेमाच्या पडद्यावर निगेटिव्ह भूमिका साकारू लागले! या काळातील त्यांचे अनेक चित्रपट सुपरहिट ठरले. गुलजार यांनी १९७१ साली विनोद खन्ना आणि शत्रुघ्न सिन्हा या दोन खलनायकाची

भूमिका करणाऱ्या अभिनेत्यांना एकत्र आणून 'मेरे अपने' या चित्रपटाची निर्मिती केली आणि इथून या दोघांच्याही अभिनययात्रेला एक निराळे वळण मिळाले. याच काळामध्ये अभिनेत्री रेखा हिचे देखील रुपेरी पडल्यावर आगमन झाले होते. सुरुवातीला सेक्स सिम्बॉल म्हणूनच ती जास्त लोकप्रिय झाली. १९७६ साली अमिताभ सोबत 'दो अंजाने' या चित्रपटात तिने भूमिका केली आणि तिथून तिच्या अभिनयाला वेगळे परिमाण मिळू लागले. १९७८ साली आलेल्या ऋषिकेश मुखर्जी यांच्या 'खूबसूरत' या चित्रपटातून तिच्यातील अभिनेत्रीला ऋषिकेश मुखर्जी यांनी रसिकांसमोर आणले. अशाप्रकारे रेखा आणि शत्रुघ्न सिन्हा हे दोघे समकालीन जरी असले तरी या दोघांचे सुरुवातीचा काळ हा संघर्षाचा तर होताच पण आयडेंटिटी क्रायसिसचा देखील होता. रुपेरी पडद्यावर मुख्य अभिनेता आणि अभिनेत्री म्हणून स्वत:ला सिद्ध करण्यासाठी त्या दोघांना मोठा संघर्ष करावा लागला. या दोघांनी अनेक चित्रपटात एकत्र कामे केली पण नायक-नायिका म्हणून त्यांचे खूप कमी सिनेमा आले. सुरुवातीला एक तर शत्रुघ्न सिन्हा खलनायक म्हणून चित्रपटात असायचे किंवा सत्तरच्या दशकामध्ये मल्टीस्टारर सिनेमाचे पेव फुटल्यामुळे या सिनेमात रेखा आणि शत्रुघ्न सिन्हा एकत्र जरी असले तरी ते नायक नायिका म्हणून क्वचितच दिसले! या दोघांचे गाजलेले सिनेमे सांगायचे झाले तर 'रामपूर का लक्ष्मण', 'जानी दुश्मन', 'मुकाबला' , 'कहानी किस्मत की', 'दुश्मन दोस्त', 'चेहरे पे चेहरा', 'दो यार'. 'कश्मकश', 'कहते है मुझको राजा', 'दोस्त और दुश्मन', 'परमात्मा'... इन शॉर्ट शत्रुघ्न सिन्हा आणि रेखा ही प्रणय जोडी म्हणून प्रेक्षकांना पाहायला मिळालीच नाही. पण या दोघांमध्ये खूप चांगले मैत्रीचे संबंध होते. शत्रुघ्न सिन्हाची पत्नी पूनम सिन्हा ही रेखाची चांगली मैत्रीण होती.

ऐंशीच्या दशकाच्या उत्तरार्धात राकेश रोशन यांनी या दोघांना घेऊन 'खून भरी मांग' या चित्रपटाची निर्मिती केली. हा सिनेमा देखील मल्टीस्टारर सिनेमा होता. या चित्रपटाच्या दरम्यान कोणत्या तरी कारणाने रेखा आणि शत्रुघ्न सिन्हा यांच्यात कडाक्याचे भांडण झाले. इतके की दोघांनी चित्रपटात काम करणार नाही अशी धमकी दिली! निम्म्याहून अधिक चित्रपट तयार झाला होता. राकेश रोशन यांनी दोघांसोबत स्वतंत्र मीटिंग केल्या. आणि "तुमच्या भांडणांमध्ये माझे आर्थिक नुकसान करू नका!" अशी विनंती केली! दोघांनी त्या विनंतीला प्रतिसाद देऊन चित्रपटात एकत्र काम करायचे ठरवले. परंतु

सेटवर शत्रुघ्न सिन्हा आणि रेखा एकमेकाशी अजिबात बोलत नव्हते. त्यांनी एकत्र डायलॉग बोलले पण शॉट झाला की दोघे आपापल्या रूममध्ये जात असत. कसातरी राकेश रोशन यांनी चित्रपट पूर्ण केला! चित्रपट प्रदर्शित झाला. सुपरहिट झाला! प्रीमियरच्या वेळी देखील दोघे उपस्थित होते पण दोघांमधील संवाद पूर्णपणे थांबला होता. चित्रपटसृष्टीतील त्यांच्या मित्र-मैत्रिणींनी या दोघांमधील अबोला भेटवण्याचे नानाविध प्रयास केले पण त्याला यश आले नाही. दोघांमधील संवाद थांबला तो थांबलाच! तब्बल तेवीस वर्ष हे दोघे

एकमेकांसोबत काहीच बोलत नव्हते. अनेक पार्ट्यांमध्ये, कार्यक्रमांमध्ये ते एकत्र असायचे पण एकमेकांना ते टाळत होते! हाय हॅलो देखील करत नव्हते! २००९ साली एका पार्टीमध्ये शत्रुघ्न सिन्हा आणि रेखा एकत्र येणार होते. शत्रुघ्न सिन्हाची पत्नी पूनम सिन्हा यांनी मनोमन ठरवले की कित्येक वर्ष दोघांमधील थांबलेला संवाद आपण पुन्हा सुरू केला पाहिजे! या दोघांमधील काही मतभेद असले तर ते दूर केले पाहिजे! हे असे ठरवूनच ती देखील त्या पार्टीला गेली. तिने रेखाची स्वतंत्र भेट घेऊन तिच्याशी संवाद साधला. तिच्या मनात असलेले गैरसमज दूर केले. शत्रुघ्न सिन्हाला तर ती घरूनच प्रीपेअर करून गेली होती. अशा प्रकारे या दोघांची या पार्टीमध्ये पुन्हा भेट घडवून आणली गेली. मतभेद मिटले! गैरसमजाचे गढूळ वातावरण दूर झाले. दोघांनी हसत हसत एकमेकांना हस्तांदोलन केले आणि गेले तेवीस वर्ष असलेला अबोला संपला. रेखाला तर किती बोलू आणि किती नको असे झाले होते. त्या आनंदातच शत्रुघ्न सिन्हाने त्याच पार्टीमध्ये आपल्या मुलाच्या येणाऱ्या चित्रपटाची बातमी रेखाला दिली. रेखाने शत्रुघ्न सिन्हाचे अभिनंदन करून, "या सिनेमात मी त्याच्या मुलाच्या आईची भूमिका करीन" असे तिथल्या तिथे आश्वासन दिले. २०१० साली शत्रुघ्न सिन्हाचा मुलगा लव सिन्हा याने हिंदी सिनेमाच्या पडद्यावर पदार्पण केले. या सिनेमात त्याची आई झाली होती रेखा! हा सिनेमा होता 'सदिया'! चित्रपट आणि लव सिन्हा दोघे फ्लॉप झाले पण तेवीस वर्षाचा अबोला या निमित्ताने मिटला!

© धनंजय कुलकर्णी

♥

लेख क्र. ५०

...जेंव्हा स्वाभिमानी फारुख शेख आणि शबानाने मिळालेले दहा रुपये पुन्हा कॉलेजला चक्क डोनेट करून टाकले!

पंचवीस तीस वर्षांपूर्वी देशातील तमाम अभिजन नाट्य रसिकांमध्ये 'तुम्हारी अमृता' या द्विपात्री नाट्यप्रयोगाने मोठे स्थान मिळवले होते. फिरोज अब्बास खान यांनी दिग्दर्शित या प्रयोगामध्ये शबाना आजमी आणि फारुख शेख यांच्या प्रमुख भूमिका होत्या. हे दोघे कलाकार नाट्यप्रेमींमध्ये लोकप्रिय ठरले होते. मूलतः हे दोघेही चित्रपट कलावंत असतानादेखील रंगभूमीची त्यांची आवड त्यांनी जपली होती. रंगमंचावरील त्यांचं प्रेम हे खूप वर्षापासूनच होते. १९६८ ते १९७० या काळामध्ये शबाना आजमी आणि फारुख शेख हे दोघेही मुंबईच्या सेंट झेवियर कॉलेजचे विद्यार्थी होते. तिथेच त्यांनी त्यांच्या नाट्य जीवनाची सुरुवात केली होती. हे दोघेही ते 'इप्टा' चे विद्यार्थी! दोघांवरील संस्कार हे साम्यवादी विचारांचे झाले होते. या दोघांना हिंदी आणि

उर्दू साहित्याची प्रचंड आवड होती. त्यावेळी सेंट झेवियर कॉलेजमध्ये पूर्णतः इंग्रजाळलेले वातावरण होते. इंग्रजी साहित्य, इंग्रजी नाटक, इंग्रजी सिनेमे यांचे वेगवेगळे क्लब तिथे होते. या क्लबला कॉलेजच्या मॅनेजमेंट कडून अर्थसहाय्य देखील होत होते. कॉलेजमधील विद्यार्थी याच क्लबमधून आपली कला सादर करत होते.

परंतु या सर्व प्रकारात हिंदी भाषिक कलाकारांची
गळचेपी होत होती. फारुख शेखने ही कोंडी फोडली! फारूख शेख हा शबाना आझमीला दोन वर्ष सीनियर होता. परंतु दोघांची आवड सारखी होती. त्यामुळे त्या दोघांनी हिंदीतून नाट्यकृती सादर करायला सुरुवात केली. हळूहळू यांच्या ग्रुप मध्ये आणखी काही मुले सामील होऊ लागली. मग वेगवेगळ्या स्पर्धांमधून हिंदी आणि उर्दू नाटके ते सादर करू लागले. त्याचप्रमाणे हिंदी कविता, मुशायरा अशा कार्यक्रमाच्या आयोजन देखील ते करू लागले. फारुख शेख आणि शबाना आजमी यांनीच सेंट झेवियर कॉलेजमध्ये हिंदी नाट्यमंचची स्थापना केली आणि या मंचातर्फे विविध नाट्य स्पर्धांना आपली नाटके ती सादर करू लागली. कॉलेजच्या वतीने जरी ही नाटकं होत असली तरी कॉलेजकडून एक पैसा देखील त्यांना अर्थसहाय्य होत नव्हते.

एका वर्षी त्यांच्या नाट्य कृतीला एका स्पर्धेत पहिले पारितोषिक मिळाले. मोठ्या अभिमानाने त्यांनी ते पारितोषिक महाविद्यालयाच्या प्राचार्यांना दाखवले आणि त्यांना विनंती केली की आपण इतकी वर्ष इंग्रजी भाषेतील क्लब्जना अर्थसहाय्य करीत आहात. पण आपल्या देशाची जी राष्ट्रभाषा आहे तिच्या सहाय्यासाठी आपण काहीतरी मदत करायला पाहिजे!" सेंट झेवियरच्या व्यवस्थापनाने यावर मीटिंग घेतली आणि दर महिन्याला दहा

रुपये द्यायला मंजुरी दिली. फारुख शेख आणि शबाना आजमी यांना एवढी तुटपुंजी रक्कम म्हणजे हिंदी भाषेचा अपमान वाटला. त्यांनी व्यवस्थापनाला पत्र लिहून आम्हाला 'अशी कुठलीही मदत आपल्याकडून नको!' असे स्वाभिमानाने सांगितले. आणि दिलेले दहा रुपये कॉलेजला पुन्हा नुसते परत न करता 'डोनेट' केले! त्यांच्या या स्वाभिमानी कृतीने लगेच फरक पडला नाही पण कालांतराने या दोघांनी स्थापन केलेल्या हिंदी नाट्यमंचला सेंट झेवियरमध्ये चांगले दिवस आले आणि आता तर या महाविद्यालयात हिंदी नाट्यकृतीला मोठा जनाधार देखील लागला आहे!

शबाना आणि फारुख रंगमंचावर अनेक वर्ष एकत्र होते. या दोघांची सुरुवात रंगमंचावरच झाली होती. पण सिनेमात मात्र ही जोडी काही जमली नाही. शतरंज के खिलाडी, लोरी, एक पल, अंजुमन या सिनेमात हे दोघे एकत्र होते पण यातल्या एकाही सिनेमाला व्यावसायिक यश मिळाले नाही!

© धनंजय कुलकर्णी

♥

♥

मन:पूर्वक आभार :

मुखपृष्ठ, ले-आऊट : 'डॉ. अनंत पावसकर'

निर्मिती : "ई साहित्य प्रतिष्ठान"

'सिनेमातील भन्नाट किस्से!' ♥© लेखक : धनंजय कुलकर्णी